आपला समृद्ध आणि प्रगत
मायदेश मागे सोडून
डॉ. आयडा वेलूरला आल्या.
धुळीने भरलेल्या, सततच्या
दुष्काळाने आणि म्हणून
दारिद्र्याने गांजलेल्या
भुकेकंगाल प्रदेशाला त्यांनी
आपलं म्हटलं. सलग पन्नास
वर्ष या प्रदेशाची दुखणी-खुपणी
निस्तरताना त्यांनी एक स्वप्न
उराशी बाळगलं. ते साकार
करीत असताना त्या या मातीत
मिसळून गेल्या.



**एक होता कार्व्हर**
या पुस्तकाच्या लेखिका
वीणा गवाणकर
यांचे एका दुर्लक्षित
विषयावरील पुस्तक -
**डॉ. आयडा स्कडर**




dr iyada skader
c1charitra aatmacharitr
₹ 110/- 17622 ABG

राजहंस प्रकाशन / पुणे

# डॉ. आयडा स्कडर

वीणा गवाणकर



# डॉ. आयडा स्कडर

वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात
पुन:प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही
लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

डॉ. आयडा स्कडर
वीणा गवाणकर

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन प्रा. लि.
१०२५, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
फॅक्स : २४४३३७१९
E-mail : rajhansprakashan1@gmail.com
Website : www.rajhansprakashan.com

मुद्रक
रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस'
सहवास सोसायटी
कर्वेनगर
पुणे - ४११ ०५२

Dr. Ida Skudder
Veena Gavankar

© वीणा गवाणकर
'राधा', भास्कर आळी
वसई (प.) ४०१२०१

अक्षरजुळणी
रेखा ढोले
प्रिंट लिंक
७६९/५, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४

मुखपृष्ठ : सतीश देशपांडे

आवृत्ती दुसरी : जून १९९९
आवृत्ती नववी : जानेवारी २०१२

ISBN 81-7434-146-3

**किंमत : ₹ ११०/-**

*या देशात ठिकठिकाणी*
*सेवातीर्थे उभारण्याच्या कामात*
*स्वत:ला झोकून देणाऱ्या जीवनव्रतींना -*

•

# वसई ते वेलूर

डॉ. आयडांचे चरित्र वाचेपर्यंत वेलुरात विसाव्या शतकात घडलेल्या महाभारताची कल्पना मला नव्हती. वाचायला सुरुवात केल्यावर मी आधी हे वेलूर भारताच्या नकाशावर कुठं येतं ते पाहिलं.

नकाशावरचा एक तीळ.

जसजसं वाचत गेले तसातसा तो तीळ तो ठिपका मोठामोठा होत गेला.

ठरवलं - या ठिपक्याच्या पोटात शिरायचं.

वेलूरला गेले.

तेच ते छोटंस रेल्वेस्थानक 'काटपाडी'. इथंच डॉ. आयडा रात्री-अपरात्री उतरत. इथून वेलूर चार मैल आत. मोटार येण्यापूर्वी डॉक्टर हे अंतर बैलगाडीने जात.

सत्तर - ऐंशी वर्षांपूर्वी कसा असेल हा रस्ता?

आपला समृद्ध आणि प्रगत मायदेश मागे सोडून डॉक्टर याच रस्त्याने वेलूरला आल्या. धुळीने भरलेल्या, सततच्या दुष्काळाने आणि म्हणून दारिद्र्याने गांजलेल्या या भुके-कंगाल प्रदेशाला त्यांनी जवळ केलं.

दिवसाचे अठरा-अठरा वीस-वीस तास जात. असं कष्टत असताना एक स्वप्न उराशी बाळगलं. ते साकार करता करता आपली उभी हयात इथं घालवली. याच मातीत मिसळून गेल्या!

वेलूर!

डॉ. आयडांची कर्मभूमी.

इथं आल्यावर वाटलं त्याच्या आयुष्याचे अधिक सुस्पष्ट आणि तपशीलवार दर्शन घडेल. त्यांच्या डायऱ्या, फोटो, वृत्तपत्रांतील कात्रणं, मुलाखती, लेख, त्यांचा सहवास लाभलेल्यांच्या मुलाखती असं खूप काहीसं वाचायला मिळेल, ऐकायला मिळेल अशी आशा बाळगून होते.

खरं तर फार मोठ्या आशा बाळगून मी गेले नसते तर बरं झालं असतं.

गेल्या वर्षभरात मी वेलूर ख्रिश्चन मेडिकल कॉलेजच्या जनता संपर्क अधिकाऱ्यांना तीन पत्रं लिहिली. एकाचंही उत्तर आलं नाही. तिथे M.D. करत असलेल्या पुण्याच्या डॉ. चारुदत्त आपटेंचा शोध लागला. त्यांच्याशी पत्रव्यवहार करून मी वेलूरला गेले. त्यांनीच माझी तिथं सारी सोय केली.



तिथल्या सिनियर मंडळींना माझ्या कामासंबंधी पूर्वसूचना देऊन ठेवल्या होत्या. त्यामुळे माझी धावपळ कमी झाली.

प्रथम भेटले डॉ. झकारिया, चेअरमन, प्रमोशन बोर्ड, यांना. तिथे समजलं डॉ. आयडांच्या डायऱ्या वगैरे काही राखलेलं नाही. त्या डायऱ्या स्कडर मंडळींनी परत जाताना नेल्या असाव्यात. वृत्तपत्रांची कात्रणं वा अन्य नोंदीही काही नव्हत्या. डॉ. आयडांचे तीन फोटो मिळाले.

तिथलं 'स्कडर मेमोरियल' पाहिलं; पण त्या टेबल-खुर्च्या किंवा सुवर्ण - कशिद्याची झाल किंवा त्यांनी वापरलेल्या वस्तू पाहून माहितीत काही नवीन भर पडत नव्हती. एक दुर्मिळ पुस्तक मात्र मिळाले. डॉ. पॉलिन जेफरीलिखित डॉ. आयडांचे चरित्र होते ते. एकूण, नवीन माहिती मिळाली नाही व उलट माझीच मात्र खोदून खोदून चौकशी झाली. केवळ डॉ. आयडांच्या शोधात एक स्त्री मुंबईहून थेट वेलूरला येते हे पटवून घेणे त्यांना जड जात होतं.

मग मी मोठ्या उत्साहाने कॉलेजच्या ग्रंथालयात गेले. माझी कल्पना, डॉ. आयडांचं जीवनदर्शन घडवणारा खास विभाग तिथं असेल. बरेच साहित्य वाचायला मिळेल; पण माझ्याकडे असणारीच पुस्तके तिथे होती. नवीन, अधिक असं काही नव्हतं.

नर्सिंग स्कूलच्या सेवानिवृत्त प्राचार्या श्रीमती कुरुविला उपचारांसाठी रुग्णालयात येऊन राहिल्या होत्या. त्यांची भेट घेतली. त्यांनी डॉक्टरांना पाहिलं ते त्यांच्या वृद्धावस्थेत, वयाची ऐंशी वर्षं उलटल्यावर. आठवणी अशा काही नव्हत्याच.

नंतर भेटले डॉ. कारमन यांना. हे अमेरिकन. ह्यांचे आई-वडील डॉ. आयडांचे सहकारी डॉक्टर्स. डॉ. कारमननी आपल्या बाळपणी डॉ. आयडांना पाहिलेले, नंतर ते शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. इथे रुजू झाले तेव्हा डॉक्टर स्वर्गवासी झाल्या होत्या. त्यामुळे त्यांच्याकडेही सांगण्यासारखे काही नव्हते; पण त्यांनी माझी एका महत्त्वाच्या व्यक्तीशी गाठ घालून दिली. मेरी टॅबर (सॅबॅस्टिअन) यांच्याशी. श्रीमती मेरी टॅबर (सॅबॅस्टिअन) म्हणजे डॉ. आयडांची दत्तक कन्या आता वय ऐंशीच्या घरात; पण स्मरणशक्ती शाबूत.

चार तास त्यांच्या सहवासात गेले. आठवणीमागून आठवणी सांगत होत्या. फोटो दाखवत होत्या. भूतकाळात हरवून गेल्या होत्या. त्यांचा निरोप घेण्यापूर्वी मनात डाचत असलेला एक प्रश्न मी त्यांना विचारायचे ठरवले. डॉ. आयडांचे वडील ख्रिश्चन धर्माची दीक्षा देत असत; डॉ. आयडांनी लक्ष्मीला देवदासी व्यवसायापासून वाचवण्यासाठी तिला ख्रिश्चन धर्मात घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला; डॉक्टरांच्या दर बुधवारच्या दौऱ्यात बरोबर धर्मशिक्षिका असे, असे उल्लेख डोरोथी विल्सन लिखित डॉ. आयडा चरित्रात सुरुवातीला आढळतात; पण पुढे कुठे त्यांनी तसा प्रयत्न केल्याचे आढळत नाही. तेव्हा डॉ. आयडांनी ख्रिश्चन धर्माच्या प्रचारासाठी धर्मांतराचे काही प्रयत्न केले होते का असे मी श्रीमती मेरी टॅबर (सॅबॅस्टिअन) यांना विचारले.

त्या म्हणाल्या - ''नाही. लक्ष्मीसाठी केला तसा प्रयत्न त्यांनी पुन्हा कधीही केलेला नाही. त्यांची ख्रिस्तावर श्रद्धा होती. प्रत्येक रुग्णात त्यांनी ख्रिस्त पाहिला, त्यांची सेवा केली. रुग्ण, रुग्णालय, दवाखाने, मेडिकल स्कूल, नर्सिंग स्कूल, मेडिकल कॉलेज यांचा व्याप एवढा की त्या पहाटे साडेतीन चारलाच उठत; रात्री झोपायला अकरा वाजत.

खरं तर हे वेलूर फक्त हिंदु-मुसलमानांचेच होते. अर्काट मिशनमुळे इथे ख्रिश्चन धर्म रुजला आणि वाढीस लागला. डॉ. आयडांनी मात्र तसा प्रयत्न केला नाही.

मेडिकल स्कूल आणि कॉलेजामधून शिकून बाहेर पडलेले ख्रिश्चन डॉक्टर्स खेडोपाडी गेले. मिशन रुग्णालयातून काम करू लागले. हे सगळं खरं; पण डॉ. आयडांनी कोणाच्या धर्मांतरासाठी प्रयत्न केलेला नाही. तेवढा वेळ तरी कुठं होता त्यांना!''

वेलूरहून मी मद्रासला आले. तिथले हिंदू वृत्तपत्र. जुने अन् जाणते. शंभरी गाठलेले. 'हिंदू' च्या त्या प्रचंड वास्तूत जरा दबकतच गेले. आधी रीतसर पत्रव्यवहार करून परवानगी घेऊन ठेवली होती, वाटलं इथल्या ग्रंथालयात वृत्तपत्रीय कात्रणांचा गठ्ठाच्या गठ्ठा हाती पडणार. दोन दिवस तरी लागतील तो संपवायला; पण इथेही निराशाच पदरी पडायची होती. अवघी



तीन कात्रणं. मद्रासहून केवळ शंभर मैलांवर घडलेल्या घडामोडींची 'हिंदू' ने ही एवढीच दखल घेतली होती.

अशा प्रकारे अपेक्षाभंगाचे दु:ख पचवत मी मुंबईला परतले.

आणि हे असं असूनही मी डॉ. आयडांचं चरित्र लिहायला बसले.

मुळातच डॉ. आयडांच्या चरित्राने माझ्या मनाला ओढ लावली होती. मी त्यांच्यासंबंधी अनेक डॉक्टर्सकडे चौकशी केली, तेव्हा लक्षात आलं की, त्यांपैकी बऱ्याच जणांना C. M. C. Vellore या नावापलीकडे काहीही ठाऊक नाही. डॉ. आयडांचं तर नावदेखील माहीत नाही. तेव्हा जे काही आपल्याला समजलंय, उमजलंय तेवढ्याचा तरी परिचय इतरांना करून द्यावा असं मनाने घेतलं.

'एक होता कार्व्हर' प्रसिद्ध करताना, हे असं आदर्शवादी जीवन वाचकांना कितपत रुचेल, पटेल याची शंका मनात होती; परंतु ज्या उत्साहाने आणि अपूर्वाईने वाचकांनी कार्व्हरचं स्वागत केलं, ते पाहून 'आयडाला' ही ते आपलंसं करतील असा विश्वास वाटला.

जे काही हाती लागलंय ते समोर ठेवलंय. कदाचित मला न समजलेलं, हाती न लागलेलं बरंचसं काही असेलही-

**वीणा गवाणकर**

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

'डॉ. आयडा स्कडर' प्रथम प्रकाशित झालं १९८४ साली. ती प्रथम आवृत्ती संपून काही वर्षं झालीत. दरम्यान या पुस्तकाचा हिंदी अनुवाद (एक महान साधिका की कहानी : अनु. प्रतिमा डिके) प्रकाशित झाला. संदर्भ साधनांच्या अभावी काहीसं अपुरं असं हे चरित्र. तरीही वाचक फोनवरून वा पत्र पाठवून त्यांची विचारणा आजही करत असतात. या मागणीमागचं कारण शोधण्याचा प्रयत्न मी या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्तानं करते-

अल्लड, स्वप्नील, कलाविद्याविभूषित आयडा स्कडर. प्रगत संपन्न अमेरिकेत सुखी वैवाहिक जीवनाची स्वप्नं रंगवत, अमेरिकेतच राहण्याचा निश्चय करत शंभर वर्षांपूर्वी भारतात आईवडिलांना भेटण्यासाठी येते. कुटुंबातले बहुतेक सर्वजण मिशनरी झालेत. आपण मात्र ते जीवन स्वीकारायचं नाही असंच ती स्वत:ला बजावतेय. पण एकाच रात्रीत तीन हिंदी स्त्रिया प्रसूतीच्या वेळी केवळ महिला डॉक्टरच्या अभावी मृत्युमुखी पडताना ती पाहाते... आणि ती आपला निर्णय बदलते... वृत्तीत नसतानाही जिद्दीनं वैद्यकीय शिक्षण घेते... नि भारतात परतते.

१९०३ सालापासून ही महिला डॉक्टर वेलूरजवळच्या खेडोपाडी साध्या छकड्यात बसून गेली. रणरणत्या उन्हात, धुळीनं भरलेल्या रस्त्यानं फिरली. वस्तीवस्तीवर जाऊन औषधोपचार केले. हे करत असतानाच तिला इथले बालविवाह, बालमाता, बालमृत्यू, बालविधवा, अनारोग्य, अंधश्रद्धा या साऱ्यांनी टोचणी लावली... अस्वस्थ केलं. डॉ. स्कडरनी अत्यंत डोळसपणे यावर उपाय योजले. आपलं ज्ञान मानवी जीवनाची सेवा करण्यासाठी, ग्रामीण आरोग्याचा स्तर उंचावण्यासाठी राबवलं. ग्रामीण विभागात डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न जगात प्रथमच केला तो डॉ. आयडा स्कडरनी.

त्या म्हणतात- "भ्रामक समजुती, अंधश्रद्धा, रूढी यांनी घेरून असणाऱ्या परंपरेला बळी पडणाऱ्या लोकांना दोष देण्यात काय अर्थ? दोष असतो त्यांचा, ज्यांना उपाय माहीत आहेत पण ते अंमलात आणण्यासाठी जे दक्ष नाहीत त्यांचा."

असे उपाय करत असताना त्या कोणाच्या उपेक्षेनं अडखळल्या नाहीत की कोणाच्या धन्यवादासाठी खोळंबल्या नाहीत. आत्मविश्वासाने, कर्तव्यनिष्ठेने त्या पुढे जात राहिल्या.



कोणतीही परिस्थिती बदलायला कठोर परिश्रम लागतात. त्यासाठी शास्त्रशुद्ध विचारांचंही बळ असावं लागतं. तात्कालिक उत्तरे शोधून जुजबी बदल घडवण्यापेक्षा मूलगामी विचार आणि डोळस प्रयत्न हितकारक ठरतात हेच डॉ स्कडर यांच्या जीवनापासून समजतं.

तसं पाहिलं तर प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात काही ना काही निर्णय घेऊन वाटचाल करत असते. त्या निर्णयाचे परिणाम भोवतीच्या समाजावर, परिस्थितीवर काय घडून येतात यावरच त्या निर्णयाचं ऐतिहासिक वा सामाजिक मोल ठरतं. आयडा स्कडरच्या 'डॉक्टर' होण्याच्या नि दक्षिण भारतातल्या एका ग्रामीण प्रदेशात कार्य करण्याच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम ठळकपणे दिसतात. ज्ञान हे सेवाभावी झालं की काय घडू शकतं याची इथे फलनिष्पत्तीही दिसते.

डॉ. आयडा स्कडर यांच्या खाजगी जीवनावर मी प्रकाश टाकू शकले नाही हे प्रथम आवृत्तीच्या प्रस्तावनेत नोंदवले आहेच, त्यामुळे त्याची पुनरावृत्ती करत नाही. पण तसं पाहिलं तर डॉ. स्कडरना स्वतंत्र खाजगी आयुष्य उरलं होतं का?... दिवसाचे वीस वीस तास काम करणारी ही व्यक्ती. तिच्या परिश्रमातून उभं राहिलेलं कार्य हेच तिचं जीवनदर्शन. तिच्या निष्ठेचा, कार्यप्रवणतेचा आविष्कार. त्या जीवनातून कार्य वजा केलं तर काय उरतं?... कर्तृत्व हाच तिच्या जीवनाचा गाभा.

डॉ. स्कडर यांच्या जीवनाचा गाभा, त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख समजून घेण्यासाठी वाचक त्यांच्या चरित्रपुस्तकाची मागणी करत असावेत. त्यांच्यासाठीच ही दुसरी आवृत्ती.

१८ मार्च १९९९ **वीणा गवाणकर**

# अनुक्रम


मीही अंती / ११

तयारी / २७

हरवलेल्या रांगा / ३५

सुरुवात / ५३

ताशेच ताशे / ६७

दवाखान्याला फुटले पाय / ७२

लागण / ८४

इलाज / ९६

'निधी'ध्यास / १०२

आजोबा, जरा धीर धरा! / १०६

वारसा / ११२

लाख मोलाची भेट / ११८

संदर्भ / १२५




# मीही अंती

एक आचका देऊन गाडी थांबली.

आता पुन्हा एकदा तिला बाहेरच्या जगापासून सुटका नव्हती. तिने डोळे गच्च मिटून घेतले होते तरी पापण्यांवर साचलेला लाल धुळीचा दाट थर तिला जाणवत होता. उष्ण झळा तिच्या कोमल त्वचेची लाही लाही करत होत्या.

गाला-कपाळाची नुसती आग आग होत होती.

'बघ आयडा' तिचा भाऊ हॅरी आगगाडीच्या खिडकीतून बाहेर पाहात म्हणाला, 'आपण पश्चिम तर केव्हाच मागे सोडली. हा खरा हिंदुस्थान. इतक्या वर्षांनी परतत आहोत; पण हे सारं कसं ओळखी ओळखीचं वाटतंय. सगळं काही होतं तस्संच आहे बघ.'

'ओळखीचं म्हणे! हं. चांगलंच ओळखीचं.' आयडा कुचकुचली.

> फार फार वर्षांपूर्वी अनुभवलेलं तेच ते दु:स्वप्न. आजही तेच. दु:स्वप्न नव्हे उघडंवाघडं कुरूप ओंगळ सत्य.

ती आता काही पूर्वीची आठ वर्षांची बबडी राहिली नव्हती. चांगली विशीतली युवती 'आयडा स्कडर' झाली होती. पदवीधर तरुणी. आणि हेही काही त्या वेळचं १८७८ साल चालू नव्हतं. आज तारीख २० सप्टेंबर १८९०. काही आठ-वड्यांपूर्वी ती आपला भाऊ हॅरी याच्यासोबत न्यू यॉर्कहून बोटीनं निघाली होती. काही तासांपूर्वीच मद्रासला येऊन पोहोचली होती. त्यांना उतरून घ्यायला वडील बंदरावर आले होते. आता ते तिघं मिळून पुढचा प्रवास आगगाडीने करत होते.

बंदरावर आयडाने आपल्या बाबांना पाहिलं त्यापेक्षा ते तिला आता अधिक जवळचे आणि परिचित वाटू लागले होते-

> तेच ते पूर्वीचे लंबू टांग शिडशिडीत बाबा. आता त्यांची लांब दाढी पांढरी दिसतेय. ती पूर्वी काळीभोर होती. आपण त्यांच्या मांडीवर बसून त्या दाढीची वेणी घालत असू. डोळे मात्र तेच. पूर्वीचेच. तेजस्वी अन् काळेभोर!
>
> ते पाणीदार डोळे आयडावर स्थिरावले होते - माझी छकुली! आता कशी मोठी झालीय. दिसते पण किती छान! तिचे डोळे निळे

निळे... आकाशाची आठवण देणारे...अथांग पण हसरे. आणि हिचे केस सोनेरी रेशमी आहेत हे आपण विसरूनच गेलो होतो, नाही!

'तुला मोठी होत जाताना पाहायला तुझ्या आईला आणि मला काही मिळालंच नाही. आठ वर्षं... किती काळ गेला तुला शेवटचं पाहिलं त्याला!'

वडिलांच्या या बोलण्यावर आयडानं जरा घुश्शातच मान फिरवली.

हा दोष कुणाचा? याचा बोल कुणाला? मला, माझ्या भावंडांना आणि आईला आठ वर्षांपूर्वी नेब्रास्कात ठेवून हिंदुस्थानात परतले ते काय माझ्या मर्जीने? आणि त्यानंतर दोन वर्षांनी हेन्रीकाकांच्या घरी मला सोडून आईही एका रात्री हिंदुस्थानात यायला निघाली, तीही काय माझ्याच मर्जीनं?

त्या आठवणींनी आजही आयडाच्या मनात कालवाकालव होत होती. चौदा वर्षांच्या आयडाचं दु:ख आजही हृदयात कळ उठवत होतं. आईला निरोप देण्यासाठी तिला कोणी स्टेशनवरही जाऊ दिलं नव्हतं. आयडाचे हात आपल्या गळ्यातून सोडवून आईने जेव्हा उंबरठा ओलांडला तेव्हा आयडा धावत आपल्या खोलीत गेली होती. आईची उशी छातीशी कवटाळून किती तरी वेळ हमसत रडत होती. काका-काकी दोघंही प्रेमळ अन् दिलदार; पण आयडानं स्वत:ला खोलीत बंद करून घेणं आणि वाढलेलं ताट दूर ढकलणं हे समजून घेणं त्यांना जमलं नव्हतं. कालांतरानं त्या दु:खाची धार कमी झाली असली तरी आजवरचा एकाकीपणा त्याची ठसठस जाणवून देत होताच.

तिच्या आईच्या एका पत्रात होतं,

'हिंदी लोकांना मी माझी सहा मुले तिकडे ठेवून इकडे एकटी कशी आले हे काही उमजत नाही. ते लोक असं कधीच करू धजणार नाहीत. मला वाटतं मीही पुन्हा असं कधी करू धजावणार नाही.'

ह्या समोर बसलेल्या पिताजींनीच आम्हा मायलेकींची ताटातूट केली नव्हती का?

आयडाला जाणवलं - गेली काही वर्ष आपण वडिलांचा रागरागच करीत आलो आहोत.

'ही तुमची जन्मभूमी. तुम्हाला इथं परकं परकं वाटायला नको. तुमचं बाळपणही इथंच गेलं.'

वडिलांच्या या बोलण्यावर आयडा मुकाट बसली. तिनं रागानं आपला ओठ किंचित दाबला.



माझी जन्मभूमी म्हणे! छे. काही दिवसच तर मी इथं राहणार आहे. आई आजारी असल्याची तार केलीत म्हणून तर मी तिच्या शुश्रूषेसाठी इथं आले. तिला बरं वाटलं की परतणार मी. अमेरिका हाच माझा देश. या खातेऱ्यात कोण रे राहील? अशक्य...

स्टेशनच्या कोलाहलाने तिला आपल्या तंद्रीतून जागं केलं. आरडाओरडा करून आपले जिन्नस खपवणारे हातगाडीवाले... डोंगराएवढं सामान वाहून नेणारे ते हमाल.. ते अर्धे उघडे आळशी लोक... ते भिकारी.

'अम्मल, पासी! पासी!'

पासी.

काळजाचा ठोका चुकवणारा भयानक शब्द. बाळपणी शिकलेलं तामीळ ती विसरली होती तरी हा शब्द जन्मात विसरू शकली नसती.

'पासी! पासी!'

उपाशी. उपाशी.

पूर्वीच्या त्या दु:स्वप्नानं तिला पुन्हा घेरलं.

तेव्हा ती आठ वर्षांची होती. अशीच कुठे तरी चालली होती... खिडकीतून आत घुसणारे ते असंख्य छोटे छोटे हात... छोट्या पंजाप्रमाणे भासणारे. पावाचे बारीक बारीक तुकडे करून ती त्या हातावर टाकत होती; पण ते पंजे संपतच नव्हते.. पासी... पासी...

१८७५ चा तो भयंकर दुष्काळ.. नंतरच्या काळात तिनं त्या आपत्तीचे वृत्तांत वाचले होते. एक वृत्तान्त तर तिच्या वडिलांनीच लिहिला होता. अगदी आकडेवारीनिशी. त्या वेळी तिच्या त्या इवल्या इवल्या डोळ्यांपुढं त्या आकडेवारीतील असंख्य शून्य भुकेनं वासलेल्या तोंडागत दिसत होती.

'तीन वर्ष मद्रास आणि इतर दक्षिण भागाला भीषण दुष्काळाचा तडाखा... २,५७,००० चौरस मैल प्रदेश दुष्काळग्रस्त... तेथील लोकसंख्या ५,८५,००,०००... ५२,५०,००० भूकबळी!

दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून मद्रासहून गाड्या भरभरून तांदूळ आणि कपडे येत होते. वेलूरच्या मदतकेंद्राची व्यवस्था आयडाचे आईवडील पाहात होते.

'रोज असंख्य दुष्काळग्रस्त येतच होते. वेलूरच्या आमच्या केंद्राभोवती आम्ही बांबूचे आवार कुडले होते. उपाशी मुलांना रांगेने बसवून त्यांना दूध, पाव, कांजी देत होतो. माझी मुलंही या अन्नवाटपात मदत करीत...'

तिथे मिळणारी कांजी आणि पाव आपली नजर चुकवून त्या मुलांनी बाहेर नेऊ नये म्हणून आयडाला किती सावध राहावं लागे. त्या मुलांना बाहेर सोडलं की त्यांचे ते उपासमारीनं हैराण झालेले आईबाप त्या मुलांनी आपल्याला काही उरवून वाचवून आणलं की नाही याची झडती घेत...

□

'तुला खूप उकडत असेल नाही? पण तू अशी धास्तावलेली का ग दिसतेस?' हॅरी तिला विचारत होता. भावाच्या प्रश्नाने आयडाची पुन्हा एकदा तंद्री मोडली. खाऊन उरलेली तीन केळी तिच्या हातात तशीच होती. खिडकीतून आत पुढे पसरलेल्या पंजावर तिने ती टाकली. ते पाहून डॉ. जॉन स्कडर - आयडाचे बाबा - मान मागे फेकून हसले. हसता हसता त्यांच्या डोळ्यात पाणी आलं. म्हणाले, 'माझी मुलं खरोखरच परतलीत हे आत्ता मला पटलं!'

आयडा मात्र स्वत:ला पुन्हा पुन्हा बजावत होती.

> हा देश आपल्याला मुळीच आवडत नाही. आपण काही फार काळ इथे थांबणाार नाही आहोत. या खातेऱ्यात कोण राहील? शीऽऽ कसली ही धूळ! घाणेरडा घामट कुबट दर्प. माणसंच माणसं नुसती... तिथं अमेरिकेत कशी मज्जाच मज्जा... मित्रमैत्रिणी. गमती-जमती. सौंदर्य, समृद्धी. इथं? काय आहे इथं? रिकामी, तोंड वासलेली शून्यं नुसती?

आयडा अमेरिकेहून यायला निघाली तेव्हा तिला निरोप द्यायला आलेल्या एका मैत्रिणीनं तिला विचारलं, 'तू हिंदूस्थानात गेल्यावर तुझ्या घराण्याच्या रीतीप्रमाणे मिशनरी होणार का ग? तू आता पुन्हा आम्हाला दिसणारच नाहीस म्हणायची!'

'ए, मी नाही हं.' रागानं पाय आपटत आयडा उत्तरली, 'मी काही मिशनरी व्हायला जात नाहीए तिकडं. कधीच तशी होणार नाही मी. मुळीसुद्धा नाही.'

'मग काय करणार आहेस ग तू मोठेपणी?'

'मी नं?... सूर्य डोक्यावर येईपर्यंत मस्त ताणून द्यायची. मग पत्र, वर्तमानपत्र वाचत कॉफी घ्यायची. दुपारी भोजनानंतर कथा-कादंबऱ्या वाचत लोळायचं. संध्याकाळी ड्रायव्हिंग, मग टेनिस आणि प्रत्येक रात्री कुठे ना कुठे मेजवानी झोडायची. चांगली मध्यरात्र उलटून गेल्यावर घरी परतायचं. असं मस्त आयुष्य जगणार मी!',

'पण मिशनरी होण्यातही काही वेगळी झिंग असेल नाही?'

'झिंग? हं... मी जे लहानपणी पाहिलंय ते तू स्वप्नातही पाहिलेलं नाहीस म्हणून असं म्हणतेस. मी सहा वर्षांची होते बघ तेव्हा... केवढा भीषण दुष्काळ पडला होता. मी माझ्या छोट्याशा हातांनी किती तरी अशक्त दुबळ्या मुलांना भरवलंय. अन्न गिळण्याइतकीसुद्धा ताकद नसायची त्यांच्यात. आणि काय सांगू; लहान मुलांची मृत शरीरं अशी रस्त्यात पडलेली... भिकाऱ्यांनी भरलेले रस्ते.... नकोच ती आठवण.

'आणि सांगायचंच तर आमच्या घरात आधीच पुष्कळ मिशनरी झालेत. त्यांत आणि मी कशाला?'

पण सारेच जण असं का म्हणत होते? साऱ्यांनीच काय, तिच्या आईबाबांनीसुद्धा असंच गृहीत धरलं होतं. त्यांच्या पत्रातही असायचं –



'आम्ही एक छोटा ऑर्गन न्यू यॉर्कहून आणवलाय. तुला तो इथं उपयोगी पडेल. ऑर्गन वाजवण्याचा तुझा सराव कायम ठेव. आयडा, मिशनचं काम करताना संगीताचा किती उपयोग होतो म्हणून सांगू!'

□

'आईची तब्येत ठीक नाही. भेटायला ये' अशी तार तिला आली तेव्हा आपली आई भेटणार याचा तिला कोण आनंद झाला; पण ही भेट आयडा हिंदुस्थानात जाऊन पोचल्यावर व्हायची होती. तार हाती आली त्या दिवशी आयडा रात्रभर टकटकीत जागी होती. आईच्या काळजीने व्याकूळ झाली होती. निदान थोड्या दिवसांपुरतं तरी तिला हिंदुस्थानात जाणं भाग होतं आणि म्हणून ती निघाली होती.

आपण काही इथं कायमचे राहायला नाही आलोय, हे पुन्हा पुन्हा आपल्या मनाशी घोकल्यावर तिला हायसं वाटलं. मग मोकळ्या मनानं ती आजूबाजूच्या गोष्टींची दखल घेऊ लागली. वडिलांवरचा रोषही बराच कमी झाला.

एकाएकी तिचं मन वडिलांवरच्या प्रेमानं भरून आलं. साठ वर्षं...! आता तिला ढसाढसा रडावंसं वाटू लागलं... त्यांच्या मऊशार दाढीच्या स्पर्शाच्या आठवणीनं तिची बोटं हुळहुळली...

□

तिदीवनम्

अर्थात चिंचबन.

गेली पाच वर्षं तिच्या आईवडिलांच्या पत्रांतून सातत्यानं हे नाव येत होते. मद्रासच्या दक्षिणेस आठ मैलांवरचं हे खेडं. नकाशावरचा तिळाएवढा ठिपका. तो ठिपका आता तिच्यासमोर विस्तृत होऊन साकारत होता.

कौलारू छपरं, ताडवृक्ष, देवळाचे कळस, अगम्य गोंगाट, एकसारखे दिसणारे ते काळे चेहरे.

काळीज घशाकडे सरकत होते. फलाटावर उतरल्यावर समोर आई दिसेल का?

अहं. त्या गर्दीत ती नव्हतीच!

> म्हणजे आई इतकी का आजारी आहे? का... बाबा काही लपवत तर नाहीत ना?

'आपण अपेक्षेपेक्षा खूप आधी येऊन पोहोचलो आहोत. आपल्याला एखादी बैलगाडी ठरवूनच पुढं जायला हवं,' बाबा म्हणाले.

बैलगाडी दाराशी थांबली.

सहा वर्षांच्या ताटातुटीनंतर प्रथमच आई नजरेस पडत होती.

'मार्मी! मार्मी!!' किती वर्षांनी ती ही साद घालत होती.

एकाच झेपेत आयडा आपल्या आईकडे-मार्मीकडे-झेपावली. ते परिचित हात तिच्या गळ्यात पडले. तीच ती ऊब. मधली सहा वर्षं, तो कडवट एकाकीपणा कुठच्या कुठं हरवला. बऱ्याच वर्षांनी चरत गेलेली जखम आसवांनी भरून निघत होती, बुजत होती.

□

आयडाचे वडील डॉ. जॉन स्कडर (दुसरे) हे साती भावंडांत धाकटे. मोठ्या तीन स्कडर बंधूंनी दक्षिण हिंदुस्थानात स्थापलेल्या 'अर्काट मिशन'मध्ये ते १८६१ साली दाखल झाले. त्यांची नेमणूक चित्तूर भागासाठी झाली होती. ते नंतर राणीपेटला आले. तिथेच आयडाचा जन्म (९ डिसें. १८७०) झाला. आताशी ते तिंदीवनम्‌ला येऊन मिशनचं काम पाहात होते. अर्काट मिशनचं दक्षिणेतील हे शेवटचं केन्द्र अगदी उपेक्षित. म्हणूनच डॉ. जॉन स्कडर (दु.) यांनी निवडलं होतं.

अगदी उपेक्षित खेडं, वारंवारच्या दुष्काळानं ग्रासलेलं. कॉलरा-मलेरिया, प्लेग-नारू. अगदी हवे ते रोग. मानवाची शारीरिक आणि मानसिक दु:खं दूर करू पाहणाऱ्याला इथं भरपूर संधी. डॉ. जॉन स्कडर (दु.) यांच्या धर्मप्रसाराच्या कार्यास अनुकूल अशी परिस्थिती.

मद्रास-त्रिवेंद्रम् लोहमार्गावरचं हे तिंदीवनम् खेडं. या इवल्याशा खेड्याच्या एका टोकाला रेल्वे स्टेशन आणि दुसऱ्या टोकाला मिशनचं आवार, यांना जोडणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा बाजार. नव्वद टक्के हिंदू व बाकीचे मुसलमान असलेली वस्ती. दक्षिण हिदुस्थानातील मुसलमान हे बव्हंशी मूळचे हिंदू. त्यामुळं त्यांच्यावर अजूनही हिंदू संस्कारांची छाप होतीच. हिंदू आणि हे धर्मांतरित मुसलमान यांच्यात सांस्कृतिक संघर्ष फारसे नसल्याने विशेष झगडे नसत.

डॉ. जॉन स्कडर (दु.) यांचे एक वसतिगृह होते. शंभरएक मुलं होती. अर्धी हिंदू आणि बाकीची आजूबाजूच्या खेड्यांतील धर्मांतरित ख्रिश्चन. डॉ. जॉन (दु.) पाद्रीही होते. त्यांनी एक चर्चही बांधून घेतलं होतं. चांगलं प्रशस्त चर्च. एका वेळी शे-सव्वाशे माणसं बसतील एवढं. ते डॉक्टर असल्यानं त्यांना गावातून सारखी बोलवणी असत; पण त्यांचा अधिक वेळ जाई तो ख्रिश्चन धर्मप्रचाराचं कार्य चालू आहे अशा खेड्यात. अशा खेड्यांतून दौरा काढायचा म्हणजे सोळा दिवस लागत. तेही अगदी तीन रविवार जमेला धरून. आत्यंतिक दारिद्र्य आणि बहुसंख्य अस्पृश्य समाज यामुळं धर्मांतर कार्याला या खेड्यांतून विशेष वाव असे.

धर्मांतर व्हायचं ते प्रामुख्यानं अस्पृश्यांतून. त्यांना इतरांचा विशेष त्रास होत नसे; पण उच्चवर्णीय धर्मांतरितांना मात्र सामाजिक बहिष्कार, छळ, जिवावर उठलेले नातेवाईक यांना तोंड द्यावं लागे.

□



आल्यावर काही आठवडे आयडाची धावपळच चालू होती. आईला सर्व कामांत मदत करावी लागे. आणि दुसरं म्हणजे आपण मिशनरी आयुष्य पत्करणार नाही हे सांगून आपल्या मातापित्यांना शेवटी दु:खच देणार आहोत, त्याचं थोडं पूर्वप्रायश्चित्त म्हणून तिनं मिशनच्या कामात भरघोस हातभार लावायला सुरुवात केली. हे काम काय थोड्या दिवसांपुरतंच तर करायचंय, असं मनाला निक्षून बजावत ती कामं पार पाडत होती.

आपल्या लेकीच्या येण्यानं सौ. सोफिया स्कडरची तब्येत खूपच सावरली. लेकीचं आपल्या अवतीभवती वावरणं आईला फार मानवलं. आयडाचे बाबा नेहमी दौऱ्यावर. गावातील एकमेव पाश्चात्य कुटुंब म्हणजे सरकारी अधिकारी. त्यांच्या भेटीगाठी तुरळकच. त्यामुळं सोफियाला तिंदीवनम्‌मध्ये फारच एकाकी वाटे. आता तिची मैनाराणी आयडा आल्यानं तिला तर किती बोलू आणि किती नको असं झालं होतं.

'ज्याच्याशी इंग्लिश बोलावं असं गेल्या तीन महिन्यांत इकडं कोणी फिरकलंच नव्हतं. कोणी तरी आपल्या आजूबाजूला बोला-बसायला असलं की कसं बरं वाटतं!' सेफियानं आयडाकडे मन मोकळं केलं.

आईची-सोफिया स्कडरची-कामं तिला दिवसभर पुरून उरणारीच असायची. तिच्या घरकामात प्रपंच सांभाळण्याबरोबर अध्यापनाचाही अंतर्भाव होता. आणि प्रपंच तरी केवढा! स्वत:चं कुटुंब, नोकरचाकर, वसतिगृहातील शंभर-सव्वाशे मुलं! आईच्या आजारपणात या साऱ्यांची जबाबदारी आयडावर पडली. बंगल्यामागे धान्याची कोठी होती. त्यातून रोज मोजका शिधा काढून द्यायचा, स्वयंपाकघरात सूचना द्यायच्या, बाजारसामानासाठी पैसे द्यायचे. किराणा भरायचा. वसतिगृहातील मुलांच्या कपड्यालत्त्याची निगराणी ठेवायची, धान्याची साठं साफ-सूफ ठेवायची, किडा-मुंगी-झुरळांचा बंदोबस्त करायचा, शाळेची देखभाल करायची. या सर्व कामांत ती आईला मदत करायची आणि मग वाड्या-देवड्यांच्या भिंतीआड एकाकी आयुष्य जगणाऱ्या उच्चवर्णीय हिंदू आणि मुसलमान स्त्रियांच्या भेटीला आईसोबत जायची. त्या खेड्यात मुलींसाठीही मिशनची एक शाळा होती. तिथं आयडा खेळ, शारीरिक शिक्षण आणि इंग्रजी शिकवायची.

सर्व कामांत आयडाचं आवडतं काम म्हणजे मुलींच्या शाळेत शिकवणं. तिथल्या लहान मुलींच्यात ती मनोमन रमून जायची. तिची आई तयार करायची, त्याच बाहुल्या समोर नाचताहेत असं तिला वाटायचं. त्यांचे ते परकर, छुमछुमणारे पैंजण, केस नीट विंचरून घातलेल्या घट्ट वेण्या, त्यांवर माळलेले गरजे हे सारं तिला भारी आवडायचं.

बघ बाई आयडा, या पोरट्यांत तू हल्ली फार गुंतत चाललीस.
बघ हो! तुला काही मिशनरी व्हायचं नाहीए!

□

आयडाचे एक चुलते जेअर्डकाका आपल्या पत्नी-मुलीसह वेलूरच्या मिशनकेन्द्रात राहात. डॉक्टर होते ते.

'शुभ वर्तमान' देणाऱ्यांसाठी (इव्हॅंजेलिस्ट्स्) डॉ. जॉन स्कडर (दु.) एक खास शिबिर एका खेड्यात भरवणार होते. त्यात सहभागी होण्यासाठी डॉ. जेअर्ड स्कडर आपल्या मुलीसह-डिक्सीसह - आले होते.

लहानपणी आयडाच्या मनावर उमटलेलं जेअर्डकाकांचं प्रतिबिंब आजही फारसं काही बदलायला तयार नव्हतं. करारी अन् करडा चेहरा आणि घरगुती शिळोप्याच्या गप्पांतून मिळणारे दाखले यांवरून त्यांच्या रुक्ष स्वभावाची कल्पना आयडाला होतीच. त्यामुळं ती जरा त्यांना दबकूनच असे.

डिक्सी आयडोपक्षा सहा वर्षांनी मोठी; पण तिचा आयडाला खूप लळा होता. सुंदर, नाजूक, देखणी अन् हसरी डिक्सी आयडाला आवडायची. ती शिबिरात चालली होती म्हणून आयडाही निघाली.

एका खेड्यात मोठ्या डेरेदार वृक्षाखाली त्यांनी आपले तंबू ठोकले.

थोडीफार मौजमजा करता आली असती तर गावंढ्या गावात थोडासा वेळ तरी मजेत गेला असता; पण इथं बघावं तर आजूबाजूच्या खेड्यातनं चकरा मारा, 'उपदेश' करा, नामकरणविधी, औषधपाणी करा यांतच अवघा दिवस सरायचा. रविवारीसुद्धा उसंत नाही. सकाळच्या प्रार्थना आटोपल्या की, हे दोघं बंधू आपल्या दाढ्या गुंडाळून दवापाणी करायला सुरुवात करायचे. गळवं काप, मोडलेली हाडं सांध, मोतीबिंदू काढ, ट्यूमर काढ. आपलं चालूच. आणि गंमत म्हणजे जेअर्डकाकांना डिक्सी कायम हाताशी लागे. त्यामुळं हे सारं कोपऱ्यात उभं राहून मुकाटपणे पाहाणं आयडाला भाग पडे.

आजूबाजूचे दु:ख-दैन्य पाहून, ती पीडित शरीरं पाहून आयडाला रात्री झोप लागत नसे; पण दिवसभर काम करून शिणलेली डिक्सी मात्र पाठ भुईला टेकताक्षणी मंद लयीत श्वासोच्छ्वास करीत झोपी गेलेली असे.

आईच्या सूचनेप्रमाणे आयडा वडिलांच्या हाताशी हजर असे. नामकरणविधीत मदत करणे, बाप्तिस्मा देण्यात मदत करणे ही तिची महत्त्वाची कामगिरी. खेड्यातील लहान बालकं कायम खोबरेल तेलानं माखलेली. नामकरणविधीच्या वेळी किंवा बाप्तिस्मा देताना एखादं सुळसुळीत बालक डॉ. जॉन स्कडर यांच्या हातून निसटायची भीती. म्हणून सौ. सोफियानं एक छानसं कापडी पांढरं दुपटं शिवलं होतं. ते दुपटं बालकाभोवती गुंडाळून मग आयडा वडिलांच्या हाती बालक देत असे. हे काम तिला फार दक्षतेनं करावं लागे.

एका रात्री पडल्या पडल्या डिक्सीच्या आणि आयडाच्या गप्पा सुरू झाल्या.

'वडील सांगत असतात ते सारं ऐकण्यात तुला धन्यता वाटते का? स्वत:हून काही वेगळं करावं असं नाही वाटत?' आयडानं डिक्सीला टोकलं.

'हो वाटतं ना!' डिक्सीचे डोळे चमकले. ती पुढं काय सांगते हे ऐकायला



आयडा उत्सुक झाली.

> काय हृदगत असेल बरं हिचं? हिला आपल्याबरोबर अमेरिकेत परतायचं असेल? एवढी रूपवती ही! धनवान नवरा, संपत्ती काहीही अशक्य नाही हिला!

'काय करायला आवडेल तुला?'

'मला नं? मला या खेड्यांपाड्यातून जायला खूप आवडेल. अगदी दरिद्री आणि घाणेरडं आडगाव मी निवडेन. तिथंच राहीन. तंबू किंवा साधी झोपडीसुद्धा चालेल मला. बायकांच्यात काम करीन. त्यांना स्वच्छता, शिवण, बालसंगोपन शिकवीन. तिथलं काम संपलं की, दुसऱ्या खेड्यात हे असं काम करत राहायला आवडेल.'

बिच्चारी आयडा! घोर निराशा झाली तिची!

हंऽ. या स्कडर घराण्याचं रक्तच असं!

'स्कडर' या नावाचं वैशिष्ट्य काय? अर्थ काय? लॅटिनमधून scutari हा शब्द आला आहे असं मानलं तर त्याचा अर्थ होतो बिरुद धारण करणारा, शस्त्रधारी. अँग्लो-सॅक्सन भाषेतून scudari हा शब्द आला आहे असं मानलं तर त्याचा अर्थ होतो भर वादळात मुसंडी मारून घुसणं (to scud along before the wind). तात्पर्य हे नामाभिधान शूरांचं.

आयडाचे आजोबा डॉ. जॉन स्कडर (पहिले) हे न्यू यॉर्कमधील नाणावलेले डॉक्टर. १८१९ साल चालू होतं. आपल्या एका रुग्णाला तपासायला त्याच्या घरी गेले होते. त्याच्या दिवाणखान्यात पडलेल्या एका पुस्तिकेवर त्यांची नजर पडली. 'The claims of six hundred millions. ती पुस्तिका वाचल्यावर तिथल्या तिथं त्यांनी निर्णय घेतला. वडिलांचा विरोध असतानाही डॉ. जॉन स्कडर (पहिले) मिशनरी बनले.

आयडाचे पणजोबा म्हणजे न्यू जर्सीतील बडं प्रस्थ! भरपूर जमीनजुमला. पदरी गुलाम. त्यांचा शब्द म्हणजे हुकूम. श्रीमंतीला वळसा खानदानीपणाचा. आपल्या मुलानं आपलं काही एक न ऐकता न्यू यॉर्कमध्ये छान जम बसलेली प्रॅक्टिस सोडून खुशाल मिशनरी बनावं आणि तेही दूर कुठे तरी सिलोनसारख्या ठिकाणी जाण्यासाठी, हे त्यांना कसं मान्य व्हावं?

'हे खूळ डोक्यातून काढलं नाहीस तर या इस्टेटीचा वारसदार म्हणून तुझं नाव मला ठेवता येणार नाही.' पणजोबा आजोबांवर ओरडले.

□

७ जून १८१९. डॉ. जॉन स्कडर (पहिले) यांनी आपल्या पत्नी-मुलासह बॉस्टन बंदर सोडलं. अमेरिकेतून बाहेर जाणारे ते पहिले मिशनरी डॉक्टर.

साडेदहा महिन्यांचा जलप्रवास करून ते सिलोनमधील जाफन्याला पोहोचले. तिथे गेल्या-गेल्याच त्यांच्या मुलाचा अंत झाला. बिचाऱ्याला प्रदीर्घ सागरी प्रवास आणि उष्ण हवामान सहन झाले नाही. नंतरच्या अठरा महिन्यांत त्यांची आणखी दोन अपत्ये मृत्युमुखी पडली.

सिलोनमधून अमेरिकेला पत्र जाऊन उत्तर यायला वर्ष लागायचं, म्हणून डॉ. जॉन प्रदीर्घ पत्र लिहायचे; पण ती पत्रं न वाचताच वडील त्यांना केराची टोपली दाखवायचे. पाळतीवर असलेली आई ती पत्रं बरोबर शोधून काढायची आणि मग वडिलांना ऐकू जाईल अशा खणखणीत आवाजात मुलाची पत्रं वाचायची. जे कानावर पडायचे ते ऐकून वडिलांचे मन हळूहळू पालटलेच. एवढे की अमेरिकेत यादवी युद्ध सुरू होऊन गुलामगिरी नष्ट करण्याचा कायदा जारी होण्यापूर्वीच त्यांनी आपले सर्व गुलाम मुक्त केले. मुलाला जवळ केले.

डॉ. जॉन स्कडर (प.) जाफन्याहून लवकरच दक्षिण हिंदुस्थानातील मदुरेत आले. तिथे त्यांनी दवाखाना उघडला. मिशनरी कार्य सुरू केले.

त्यांना नंतर दहा अपत्ये झाली. ८ मुलगे २ मुली. या दहांपैकी एक अल्पायुषी. बाकीच्यांनी आपले शिक्षण अमेरिकेत जाऊन पुरे केले अन् पुन्हा हिंदुस्थानात परतून वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून सेवाव्रत घेतले. हेन्री, विल्यम, जोसेफ इझेकेल, जेअर्ड, सिलास, जॉन (दुसरा). जॉन स्कडर (प.) हिंदुस्थानात आले त्या वेळी त्यांच्या दिमतीला घोडागाडी वगैरे वाहन नव्हतेच. नेहमी पायी पायी किंवा क्वचित मेणा-पालखी. एकदा तर ते निलगिरी पर्वत ओलांडून पलीकडच्या म्हैसूरच्या जंगलात उतरले होते. वन्य श्वापदांच्या तोंडातून दैवाने वाचले. तरी जंगली तापाने (Jungle fever) त्यांचा ताबा घेतलाच. त्यांच्या पत्नीला ही बातमी कोणीतरी दिली. तिला कुठला धीर निघायला? ती निघाली. धाकट्याला काखोटीला मारलं, हमालांच्या डोक्यावर तंबू अन् धान्यसाठा चढवला, निघाली.

जंगलातून रात्रंदिवस वाटचाल केली. मध्येच एका रात्री भार वाहणारे हमाल तिला एकटीलाच सोडून सामान टाकून गेले. रात्रभर सोबतीला श्वापदांच्या डरकाळ्या. जीव मुठीत घेऊन माऊली जागत बसली. सुदैवानं सारे हमाल परतले. मग सगळे पुढे निघाले.

डॉक्टरसाहेबांचा शोध लागला. त्यांना डोलीत घालून परत आणलं.

असे हे स्कडरलोक. आयडाचे आजोबा, काका, वडील, आई, चुलत भावडं सारे कसे एका मुशीत घडलेले! एका माळेचे!

पण आयडाला या मुशीत किंवा माळेत अडकायचं नव्हतं. कोणत्या प्रकारचं बिरुद धारण करायचं हे ती स्वत:च ठरवणार होती. कोणत्या झंझावाताला सामोरं जाऊन मुसंडी मारायची याचा निर्णय तिचा तीच घेणार होती. ती ढाल, ते बिरूद, ते तुफान कोणतंही असेल; पण धुळीने, पावसाने आणि शेकोट्या-चुलींच्या धुराने भरलेला, हा हिंदुस्थान तर नक्कीच नसेल! तिनं मनाशी पक्का निर्णय घेऊन ठेवला



होता. येथे कोणत्याही परिस्थितीत राहाणे नाही!

१८९२ साली वेलूरचे जेअर्ड स्कडर अमेरिकेला मोठ्या सुट्टीवर जायला सहकुटुंब निघाले. त्यांचे काम पाहायला डॉ. जॉन स्कडर (दु.) वेलूरच्या मिशन बंगल्यात सहकुटुंब येऊन दाखल झाले. वेलूरमध्ये गोऱ्यांची बरीच घरे होती. त्यामुळे सोफिया आणि आयडा यांचा बराच वेळ जायचा.

एके रात्री आयडा आपल्या अमेरिकेतील मैत्रिणीला- ॲनी हॅन्कॉकला- पत्र लिहायला बसली होती- ''...तू म्हणतेस की तुला माझ्यासारखं (?) मिशनरी व्हायचंय; पण असं नको म्हणूस. कारण उभ्या जन्मात मी मिशनरी होणार नाही. कुणास ठाऊक तुला इथं यायला कदाचित आवडेलही. इथल्या जनान्यातून तू जाशील. तिथल्या अल्पवशीन नवऱ्यामुलींना भेटशील. बिचाऱ्या कायम चार भिंतीत कोंडलेल्या. काहीकाही जणी तर इतक्या लहान की, आपण त्यांच्याहून खूप मोठ्या...''

तेवढ्यात दूरवर कोणाची तरी चाहूल लागली. आयडाने इथे आल्यापासून भुताखेतांच्या चिक्कार गोष्टी ऐकल्या होत्या; पण तिला भीती वगैरे काही वाटत नसे. शिवाय तिच्या वडिलांकडे रात्री अपरात्री रुग्ण येणे ही काही तिला नवीन गोष्ट नव्हती.

हातात कंदील घेऊन आयडा दरवाज्याकडे आली. उंच, गोरटेला अन् पोशाखावरून उच्चवर्णीय ब्राह्मण वाटणारा एक तरुण उभा होता. त्याच्या गळ्यातील जानव्याचा अर्थ तिला माहीत होता. त्या तरुणाचा चेहरा फारच गंभीर वाटत होता.

'काय हवंय? काही मदत हवीय का?'

त्याने नमस्कारासाठी जोडलेले हात थरथरत होते.

'होय अम्मा!' त्याचे इंग्लिश उच्चार सफाईदार होते. 'मला तुमच्या मदतीची गरज आहे. माझी चौदा वर्षांची पत्नी प्रसूतिवेदनांनी तळमळतेय. गावची सुईण तिची सुटका करायला असमर्थ आहे. मला कळलं की तुम्ही नुकत्याच अमेरिकेतून आला आहात. तेव्हा मृत्यूच्या दारात घोटाळणाऱ्या माझ्या पत्नीला वाचवा. फार उपकार होतील.'

'अरेरे!' आयडा सहानुभूतीनं उद्गारली, 'क्षमा करा, मी नाही; पण माझे डॉक्टरवडील तुमच्या पत्नीला वाचवू शकतील. त्यांनाच बोलावून आणते मी.'

आयडाचं हे बोलणं ऐकून त्या अगतिक हिंदू नवऱ्यानं आपला अवतार बदलला. तो क्रोधित ब्राह्मण गरजला- 'काय? माझ्या पत्नीवर इलाज करायला मी एका परपुरुषाला नेऊ? माझ्या घरच्या पुरुषमंडळीखेरीज अन्य कोणा पुरुषाची नजर आजवर तिच्यावर पडलेली नाही. तुम्ही काय सांगताहात ते तुम्हाला उमजलेलं दिसत नाही!'

'पण तिचा जीव वाचवायचा असेल तर-'

'परपुरुषाची नजर तिच्यावर पडण्यापेक्षा ती तशीच मेलेली परवडली!'

आयडा बघतच राहिली.

'तुम्ही काय बोलताहात!... ठीक आहे. आपण असं करू- मी माझ्या वडिलांच्या सोबत येते. ते सांगतील त्याप्रमाणे मी इलाज करते. ते नाही तिला स्पर्श करायचे. मग तर झालं?'

काहीही उत्तर न देता तो भला गृहस्थ पाठ फिरवून चालू लागला.

'थांबा, जाऊ नका. तुमचं तुमच्या पत्नीवर प्रेम आहे ना? तिची तुम्हाला काळजी वाटते ना?'

तो तरुण परतला.

आयडा आपल्या वडिलांच्या शयनगृहात गेली. हलक्या आवाजात त्यांना तिनं सारं सांगितलं. त्यांना घेऊन ती दरवाज्याकडे आली. दोघांनीही त्या तरुणाची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. उपयोग झाला नाही!

'मग अम्मल, तुम्ही येत नाही तर?' तो तरुण विकल आवाजात म्हणाला.

'काय उपयोग होणार आहे मी येऊन तरी? मला तर त्यातली काडीइतकीही अक्कल नाही.'

गावठी सुइणीइतकंही ज्ञान आपल्याला या बाबतीत नाही हे तिला नाही म्हटलं तरी जरा लागलंच.

तो तरुण निघून गेला. अंधारात नाहीसा झाला.

'मुली, ह्या अशा आहेत इथल्या अडचणी. त्यांची बंधनं ते पाळणारच. त्या रुढिबंधनांचं उल्लंघन कधीच करणार नाहीत हे लोक.' डॉ. जॉन म्हणाले.

रूढी! बंधनं!

आयडाला हिंदुस्थानातील रीतिरिवाज, रूढिबंधनं आता नवखी राहिली नव्हती. इथली जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्यव्यवस्था तिला समजली होती; पण तिला सर्वांत दया यायची ती इथल्या स्त्रीवर्गाची. जनान्यात कोंडल्या गेलेल्या, चार भिंतीत बंदिस्त झालेल्या स्त्रीची.

असूर्यपश्या स्त्रीची!

वडिलांच्या सोबत तीही कधीकधी रुग्णांच्या घरी जायची तेव्हा तेथील दृश्य पाहून तिला केवढं आश्चर्य वाटायचं! रुग्ण स्त्री एखाद्या पडद्याआड झोपलेली असायची. पडद्याच्या भोकातून ती हात बाहेर काढायची. मग डॉ. जॉन त्या हाताची नाडीपरीक्षा करून औषध द्यायचे. अधिक चिकित्सा करणं त्यांना शक्यच नसे.

जीवन-मरणापलीकडे, नव्हे वेळप्रसंगी त्यांची किंमत देऊनही ही रूढिबंधनं काटेकोरपणे पाळली जात.

'हा तरुण धार्मिक वृत्तीचा आहे. त्याच्या भावनांचा आदर आपण राखला पाहिजे.' जॉन स्कडर आपल्या मुलीची समजूत घालू लागले.

'हां, आदर दाखवायला पाहिजे. किशोरवयीन पत्नीला मरण यातना भोगायला लावतोय हा. याचा आदर?'



'कदाचित आम्ही केला नसू एवढा त्याग तो आपल्या धर्माचं पालन करण्यासाठी करत असेल. त्याच्या बोलण्यावरून त्याचं पत्नीवरचं प्रेम तर उघड दिसत होतं. जा, सगळं विसर आणि झोप झालं.'

'विसरू?'

'हो विसर! हा धडा फार पूर्वी शिकलोय मी. आणि हा धडा मी गिरवला नसता तर या नैराश्यपूर्ण वातावरणात मी टिकाव धरू शकलो नसतो. जेव्हा एखाद्या वाईट गोष्टींवर तुम्ही इलाज करू शकत नाही तेव्हा ती गोष्ट विसरून जाण्यातच शहाणपण असतं.'

आयडा आपल्या खोलीत परतली. ॲनीला लिहीत होती ते पत्र तसंच अर्धवट राहिलं होतं, ते ती पुरं करायला बसली. हिंदुस्थानात का राहायचं नाही, मिशनरी का बनायचं नाही ते तावातावानं ती लिहू लागली.

पुन्हा बाहेर चाहूल लागली.

आयडा चटकन उठली. मघाचा तो ब्राह्मण तरुण आपल्या बाबांना घेऊन जाण्याचा सुविचार करून परतला असावा, असा एक आशादायी विचार तिच्या मनात डोकावला. ती घाईघाईनं दाराशी आली. दार उघडून बोलू लागणार तोच तिला दिसलं- हा तो नव्हे... दुसराच!

'काय हवंय आपल्याला?'

'माझी पत्नी... इतकी बाळंतपणं सुखरूप पार पडली. या खेपी मात्र अडलीय. त्या सुईणीला काही जमत नाही. मरणाच्या दारात पडलीय. मी ऐकलंय की अमेरिकेतून कोणी डॉक्टर...'

'हो, हो.'

देव पावला. एकीचा नाही तरी दुसरीचा जीव वाचतोय. हा मुसलमान. म्हणजे स्पृश्यास्पृश्यतेचा तरी काच नसेल.

'थांबा हं.'- असं म्हणून ती आत गेली. वडिलांना घेऊन दाराशी आली.

'तुम्हाला हवे होते ते डॉक्टर, हवी तर मीही सोबत येते.'

'पण मेमसाहेब,' तो नम्र पण दृढ आवाजात म्हणाला, 'आमचे रीतिरिवाज माहीत नाहीत तुम्हाला. मुस्लिम स्त्रीच्या खोलीत फक्त निकटच्या नातेवाईक पुरुषांनाच जाता येतं. मी तुमची मदत मागायला आलोय; पुरुष डॉक्टरांची नव्हे!'

आयडा हताशपणे बघतच राहिली.

'पण मी तर काहीच करू शकत नाही. कळत नाही ते तुम्हालाच. मी साधी परिचारिकासुद्धा नाही. मी काही मदत करू शकले असते तर मलाच फार फार आनंद झाला असता!'

'तर मग आता माझी पत्नी मरण्यापलीकडे काहीच करू शकत नाही... अल्लाची मर्जी!'

पाठ फिरवून चालू लागलेल्या त्या मुसलमानाकडे आयडा किती तरी वेळ पाहात होती. तो दिसेनासा झाला. वडिलांकडे नजर उचलून न पाहताच ती आपल्या खोलीत निघून गेली. पत्र पुरं करायला बसली.

'...हिंदुस्थानात मिशनरी होऊन येणं फार कठीण ग बाई! शक्य तेवढ्या लवकर परतणार आहे मी, काय सांगू; इथल्या लोकांना मदत करायला जावं तर तेच तोंड फिरवून चालू लागतात. त्यांना हवीच आहे कुठं आपली मदत? त्यांच्या बायकामुली अल्पवयीन असल्या, सुंदर असल्या, त्यांच्यावर प्रेम असलं तरी ते त्यांना खुशाल मरू देतात...'

'माई! अम्मल!' बाहेरून हाक आली.

कोणत्याही आशेला मनात थारा न देता आयडा दाराशी आली. तरी मन आपलं म्हणतच होतं- मघाच्या दोघांपैकी कोणी तरी असू दे. एक तरी जगेल बिचारी!

हा तिसराच. गावातील मान्यवर मुदलियार. याच्या घरीही ती एकदा जाऊन आली होती.

'माझी पत्नी मृत्यूशी झगडतेय. मेमसाहेब कृपा करतील तरच तिचा जीव वाचू शकेल!' असं म्हणत तो गुडघ्यावर बसला. तिच्यासमोर डोकं जमिनीवर टेकवलं. दयेची याचना करू लागला.

'नको, नको. असा नमस्कार करू नका. मी येऊन तरी काय करणार? काय फरक पडणार? मी काही डॉक्टर नाही. डॉक्टर आहेत माझे वडील. त्यांनाच बोलावते, फक्त तुम्ही त्यांना...'

तो मुदलियार उठून उभा राहून त्याच्या चेहऱ्यावरची नापसंती आणि विद्ध मनोवृत्ती दिसण्यापूर्वीच तिनं त्याचं उत्तर ताडलं हातं. याआधीचे दोन अनुभव जमेला होतेच, त्यामुळं हा अनुभव शब्दांत व्यक्त होण्याची गरज नव्हती.

'मेमसाहेब येतील तर बरं.' तो पुन्हा एकदा आशाळभूत होऊन म्हणाला.

'माफ करा!' ती खोल आवाजात उत्तरली, 'मी येऊन काहीही उपयोग नाही, हे का उमजून घेत नाही तुम्ही लोक? माझ्या हाती काही म्हणजे काहीसुद्धा नाहीए!'

या वेळी मात्र ती आपल्या वडिलांना उठवण्याच्या भानगडीत पडली नाही. तो मुदलियार निघून गेल्यावर तिनं दार लावून घेतलं.

झोपेची आराधना करत बिछान्यावर ती पडून राहिली.

झोप येईना.

> एखाद्या वाईट गोष्टीवर इलाज करू शकत नसाल तर ती विसरून जाण्यातच शहाणपण आहे.



> -पण इलाज करू शकत नसाल तर!
>
> -मग मी करावं असं काय आहे?
>
> -नाही कसं? महिला डॉक्टरच्या अभावी एका मैलाच्या परिसरात एकाच रात्रीत तीन स्त्रिया मरणोन्मुख अवस्थेत आहेत.
>
> -नाही... नाही, तसं होणं जमणारच नाही मला...

पहाट झाली.

दूरवरून ऐकू येणाऱ्या वाद्यांचे आवाज आता जवळजवळ येत होते. अशी वाद्यं कोणत्या प्रसंगी वाजवतात ते तिला माहीत होतं. प्रेतयात्रा! आवाज दारावरून पुढे गेला.

एक.

दुसरी.

तिसरी.

तीन?

आयडानं आपल्या नोकराला हाक मारली. रात्री येऊन गेलेल्या तिघांची तिनं त्याला माहिती दिली. त्या तिघांच्याही घरी जाऊन खबर घेऊन यायला सांगितलं.

तिघीही देवाघरी गेल्या होत्या.

आयडा आपल्या खोलीत परतली. दार बंद केलं. उशीत तोंड खुपसून आपल्या बेचैनीचा आवाज दाबून टाकण्याचा प्रयत्न करू लागली.

> -हाताच्या अंतरावर तीन मृत्यू. केवळ पुरुष डॉक्टरांचा स्पर्श होऊन द्यायचा नाही म्हणून!
>
> -नाही, नाही. मला त्याच्याशी 'काहीही' कर्तव्य नाही.
>
> -परमेश्वरा! काय करू मी? काही समजत नाही! मन द्विधा झालंय माझं.
>
> -मित्र-मैत्रिणींची पत्रावर पत्रं येतायत. अमेरिकेला परतायला सांगताहेत. मला इथं राहायचं नाहीए.
>
> '- Cure it. God gives us the means.'
>
> - means? इलाज करता येण्यासारखा असताना तो न करणं म्हणजे-?
>
> - 'Ye are dead and your life is hid with Christ in God'- Amen.

विचारांच्या गर्तेत सापडलेली आयडा बऱ्याच वेळानं सावरली. रात्रभर डोळ्याला डोळा लागला नव्हता.

आयडा उठून बाहेर आली. तोंडावर पाण्याचे हबके मारले. चांगली ताजीतवानी झाली.

ॲनी हॅन्कॉकसाठी लिहिलेलं अर्धमुर्ध पत्र तसंच टेबलावर पडून होतं. तिनं ते उचलून एकदा वाचलं. मग सावकाशपणे त्याचे बारीक बारीक तुकडे केले. दोन्ही हातांनी वर उधळले. तरंगत खाली येणारे तुकडे ती पाहात राहिली.

-मॅसाच्युसेटमधला हिमसेक असाच दिसतो नाही?

-अंहं. हिमसेक नव्हे हा. पांढरे परागकण. इतस्तत: पसरणारे.

नव्याला जन्म देणारे. त्यासाठी स्वत: मृतावस्था पत्करणारे.

ती खाली वाकली. कपटे गोळा करून कचऱ्याच्या टोपलीत टाकले. आई-बाबा अभ्यासिकेत न्याहारी करत होते. तिथं ती गेली.

'मी अमेरिकेला परततेय. डॉक्टर होणार आहे.' धीम्या पण खंबीर आवाजात आयडा बोलत होती-

'माझं शिक्षण संपल्यावर इथं परत येऊन इथल्या स्त्रियांची सेवा करू शकेन मी!'

आईबाबांना आपल्या मुलीच्या निर्णयानं मनस्वी आनंद झाला.

□□



# तयारी



आयडाला आता अमेरिकेला परतण्याची विलक्षण ओढ लागली होती. एक एक दिवस ती मोजू लागली. अखेरीस १८९४ मध्ये तिचे बाबा मोठ्या सुट्टीवर निघाले त्यांच्यासह ती निघाली.

न्यू यॉर्कमध्ये तिने वैद्यकीय शाखेची प्रवेशपरीक्षा दिली. १८९५ मध्ये 'विमेन्स मेडिकल कॉलेज, फिलाडेल्फिया', येथे प्रवेश घेतला.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी एलिझाबेथ ब्लॉकवेलने स्त्रियांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळावा म्हणून चळवळ केली पण अजूनही-१८९५ साल उजाडलं तरीही स्त्रियांनी वैद्यकीय महाविद्यालयातून प्रवेश मिळवणे धाडसाचे ठरत होते. लोकमत आजही प्रतिकूलच होते. इतकंच कशाला; आयडाच्या प्रॉटेस्टंट मिशन बोर्डाच्या विमेन्स ऑक्झिल्यरीच्या सदस्याही विरोधात होत्या. अविवाहित स्त्रीला डॉक्टर म्हणून मिशनरी कामावर पाठवण्यास त्यांचा विरोध होता.

या वादाची तड लावली एका बंडखोर स्त्रीनेच. केट फ्रेलिंगसेन. 'जर आयडाला या माध्यमातून जनसेवा करणे अगत्याचे वाटत असेल तर आपण तिचे शिक्षण पुरे केलेच पाहिजे. हे घ्या माझे दहा डॉलर्स!'

(त्या वेळी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या महागड्या वर्षासाठी १४१.५० डॉलर्स लागत. त्या संदर्भात १० डॉलर्स म्हणजे मामुली रक्कम नव्हे.)

महिला डॉक्टर्स तयार करणारी अमेरिकेतील ही आद्य संस्था. 'विमेन्स मेडिकल कॉलेज.' विरोधी वातावरणातही हे महाविद्यालय आपले अस्तित्व टिकवून होते. इथली पहिली डॉक्टर क्लारा स्वेन (१८६९). दहा वर्षांनंतर क्लाराच्या पावलावर पाऊल टाकून ॲन कग्लरही डॉक्टर बनून हिंदुस्थानात आली. पहिली हिंदी महिला डॉक्टर सौ. आनंदी जोशी. हिनेही ह्याच महाविद्यालयातून १८८० साली पदवी घेतली. १८९६ साली आयडा या महाविद्यालयात दाखल झाली, तेव्हा तिथे पदव्युत्तर अभ्यासक्रमाची (M.D.ची) सोय झाली होती. आयडाने वैद्यकीय शिक्षण घ्यायला सुरुवात केली. तेव्हा नुकतेच कुठे bacteriology ला महत्त्व येऊ लागले होते. सार्वजनिक आरोग्य, प्रतिबंधक औषधे वगैरेंच्या अभ्यासाला प्राधान्य मिळाले होते. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या कक्षा रुंदावल्या होत्या.

आत्यंतिक उत्साहाने आणि हुरूपाने शिकत असूनही आयडाला वैद्यकीय अभ्यासक्रम जडच जात होता. तिचं शिक्षण झालं होतं ते त्या वेळच्या फॅशनप्रमाणे लॅटिन,

इंग्लिशसारख्या भाषा आणि वाङ्मयाचा अभ्यास. रसायनशास्त्र किंवा शरीरशास्त्र यासारखे विषय तिला अपरिचित. त्यामुळे हे सारे समजून घेताना तिला सतत परिश्रम करावे लागले. फार सायास पडले.

डॉक्टरी व्यवसायातील संभाव्य द्रव्यप्राप्तीचा मोह तिला नव्हता. तिला नीटपणे माहीत होते- हिंदुस्थानात तिला जेमतेम ५० ते ६० डॉलर्स मासिक वेतन मिळणार होते. हिंदुस्थानातून येणारी पत्रं किंवा अर्काट मिशनचे वार्षिक अहवाल यांतून तिला तिथे दंड थोपटून उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा प्रचंडपणा जाणवे. या किरकोळ वेतनाच्याच आधारे ती हिंदुस्थानात पाय रोवून उभी राहणार होती. आव्हानाला सामोरी जाणार होती. तिथं अव्याहत चालू असलेल्या जीवनमृत्यूच्या झगड्यात स्वत:ला झाकून देणार होती.

'Ye are dead.'

□

आयडा शिकत होती त्याच सुमारास तिची भावंडंही जवळपासच्या शहरांतून आपापले अभ्यासक्रम पार पाडत होती. चार्ल्स, हॅरी आणि वॉल्टर हे तिघे धर्मोपदेशक होण्याच्या दृष्टीनं अभ्यास करत होते.

सर्व स्कडर परिवार शेल्टर बेटावरच्या त्यांच्या घरात उन्हाळ्याच्या सुट्टीत गोळा झाला होता. या घराला स्कडर कुटुंबीयांच्या जीवनात एक आगळे स्थान होते. सर्व कुटुंबाने एकत्र जमावं अशी या भूतलावरची एकमेव जागा. हसावं, खेळावं, गावं, पोहावं, आनंद लुटावा.

सप्टेंबर महिन्यात स्कडर आई-बाबा हिंदुस्थानात जायला निघाले तेव्हा आयडालाही त्यांच्याबरोबर निघण्याची जबरदस्त इच्छा झाली; पण आताशी कुठे अभ्यासक्रमाची दोन वर्षंच पार पडली होती. तिचा चुलतभाऊ डॉ. ल्यू स्कडर याच्या विनंतीवरून कॅनेडियन महिला डॉक्टर लुइसा हार्ट राणीपेटला जायला निघाली तेव्हा तर आपल्यासारख्याच तरुण, उघड्या डोळ्यांनी आयुष्याचा अर्थ समजून घेणाऱ्या या डॉक्टरबरोबर आपणही निघावे असे तिला वाटू लागले; पण अभ्यासक्रम अपुरा ठेवून जाण्याने काहीच साधणार नव्हते.

१८९८ मध्ये न्यू यॉर्कच्या कार्नेल मेडिकल कॉलेजने पुरुषांबरोबर स्त्रियांनाही प्रवेश खुला केला तेव्हा, वैद्यकीय शास्त्राचे अधिक विस्तृत अन् सखोल ज्ञान मिळवण्यासाठी आयडा आणि तिच्या काही वर्गमैत्रिणी शेवटच्या वर्षासाठी या कॉलेजात दाखल झाल्या.

आयडा फिलाडेल्फियाहून न्यू यॉर्कला गेल्याचे दु:ख कोणाला झाले तर ते बर्चफील्ड मिलिकेनला. पुरुषांच्या वैद्यकीय महाविद्यालयात तो शिकत होता. चांगलाच खटकला होता. तिला म्हणालाही-

'आताच तर कुठे आपला परिचय झाला होता. मला वाटलं होतं-'



'न्यू यॉर्क काही खूप लांब नाही. तिथं ये की भेटायला.' तिनं त्याला दिलासा दिला.

आयडाला बर्चफील्ड आवडला होता. त्याचा अदबशीर स्वभाव, सभ्य वर्तन तिच्या पसंतीस उतरलं होतं. त्याचं व्हायोलिन आणि पियानोवादनातील कौशल्य तिला भुरळ पाडत होतं; पण 'इतर मित्रांप्रमाणेच हाही एक' एवढीच भावना ती ठेवून होती, मैत्रीची खास प्रेम वगैरे काही वाटलं नव्हतं; पण आपल्याकडे टक लावून राहणाऱ्या त्याच्या नजरेची मात्र अलीकडे तिला जाणीव होऊ लागली होती.

□

आयडा न्यू यॉर्कला आल्याचा आनंद झाला तो मीरा मोफॅट आणि कॅथेराइन व्हान नेस्ट या दोघींना. या दोघी अविवाहित. स्कडर कुटुंबीयांच्या घनिष्ठ मित्रपरिवारातल्या. त्यांनी तिला आपल्या प्रशस्त घरात राहायला बोलावलं. कॅथराइन ही प्रॉटेस्टंट धर्मपंथाच्या स्त्री-मदतगार संघटनेची हिंदुस्थान विभागाची सचिव होती. तिने आयडाला आपली बहीणच मानले होते.

कार्नेल कॉलेजमध्ये दाखल झाल्यावर मात्र आयडा कायमची धास्तावलेली असे. शेवटच्या वर्षात अपयश पदरी घ्यावं लागणार की काय या भीतीनं ती ग्रासलेली असे. त्यात इथं अटीतटीची स्पर्धा. मागच्या अभ्यासक्रमापेक्षा अधिक वेगळा अभ्यासक्रम. आणखीही एक काळजी- अमेरिकेतील वैद्यकीय अभ्यास उष्ण कटिबंधातील आजारांवर इलाज करताना अपुरा ठरायचा. इथे कुष्ठरोग, हिंवताप, कॉलरा, प्लेग, नारू, खरूज, हगवण इत्यादींवरचे औषधोपचार शिकवले जात नसत. तिकडे दक्षिण हिंदुस्थानात तर प्लेगने थैमान मांडले होते. त्यावर नवीन औषधोपचार शोधण्यासाठी, अभ्यासपूर्ण संशोधन करण्यासाठी डॉ. हाफकिन् पॅरिसहून हिंदुस्थानात आले होते. प्लेग आणि कॉलऱ्यावर त्यांनी नवीन लस शोधली होती. स्वत:वर आणि नंतर इतरांवर या लशीचा प्रयोग करून तिची परिणामकारक प्रतिबंधकशक्ती जगापुढं ठेवली होती.

अहिंसावादी हिंदू लोकांचा, प्राण्यांच्या पेशीत तयार केलेल्या प्रतिबंधक लशीला विरोध राहील हे ध्यानात घेऊन डॉ. हाफकिन् यांनी तुपात ही लस तयार केली.

आयडाच्या वाचनात या बातम्या येत होत्याच. प्लेग आता वेलूरमध्येही घुसला होता. तिच्या वडिलांनी आणि अन्य मिशनऱ्यांनी ही लस टोचून घेण्याचा पहिला मान मिळवला होता. आयडाला आता धीर निघत नव्हता. तिथे प्रतिबंधक इलाजांचा पायंडा पाडला जात असताना आपण मात्र इतक्या दूर आहोत याचं तिला वाईट वाटलं. तिनं मनाशी ठरवलं- शिक्षण पूर्ण होताच अधिक कार्यानुभवासाठी न थांबता सरळ हिंदुस्थानात जायचं. नाहीतरी उष्ण कटिबंधातील रोगराईवर करायचे उपचार तिच्या बाबांइतके अन्य कोणास माहीत होते?

इथे अभ्यासलेल्या प्रसूतिविज्ञानाचा मात्र तिला हिंदुस्थानात खूपच फायदा होणार होता- विशेषत: न्यू यॉर्कमधील प्रसूतिगृहात तिने दोन आठवडे काम केले त्याचा.

तिथे तिने ७१ गर्भवती स्त्रिया तपासल्या, २३ जणींची प्रसूती तिच्या देखरेखीखाली पार पडली, १७ जणींची सुटका तिने स्वत: केली. गंमत म्हणजे अवघड अवस्थेतील प्रसूतीविषयी अभ्यास नसतानाही तिने अशा काही केसेस हाती घेऊन जबाबदारीने पार पाडल्या. आयडाला मनातून एक खात्री होतीच की, हिंदुस्थानात गेल्यावर तिच्या बाबांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तिला भरपूर अनुभव मिळेल.

दोन आठवड्यांचा रुग्णालयीन अनुभव घेऊन ती बिन्हाडी परतली तेव्हा खूपच थकली होती. शरीरापेक्षा मनानं. न्यू यॉर्कमधील झोपडपट्टीतील दैन्य आणि दुरवस्था पाहून ती विषण्ण झाली होती.

हिंदुस्थानातील दैन्य आणि दु:ख तिला कशी काय झेपवणार होती कुणास ठाऊक!

□

बर्चफील्ड मिलिकेन आयडाला भेटायला मधूनमधून येत असे. एका भेटीत त्याने तिला मागणी घातली. त्यालाही स्वत:ला मिशनरी कार्याला वाहून घ्यायचं होतं. आयडाचंही ध्येय तेच. तरीही ती त्याला म्हणाली,

'मला वाटतं आपली पुरती ओळख झालेली नाही, नाही का? एकमेकांची पुरती ओळख होईपर्यंत याबाबत घाई नको असं मला वाटतं.'

बर्चफील्डनं मान्य केलं.

त्याच्या नजरेत आयडाला आपल्याविषयीची ओढ जाणवे. त्याने घाईने पुढचे पाऊल उचलू नये असं तिला वाटायचं. आयडाला लग्न तर निश्चितच करायचं होतं. मुलाबाळांची विलक्षण हौस तिला. आपल्या आईलाही तिनं एकदा लिहिलं होतं-

'...आत्ताच बर्चफील्डचं पत्र आलंय. त्यानं माझ्या बाबतीत बऱ्याच गोष्टी गृहीत धरल्यात. त्याच्याविषयी मला खास आकर्षण नाही हे मी वारंवार सूचित करते; पण तो ते ध्यानातच घेत नाही... मला लग्न नक्कीच करायचं आहे. मी जशी तुझ्यावर प्रेम करते तसं माझ्यावर प्रेम करणारी मुलं मला हवीत.'

□

डॉ. आयडा स्कडर.

आईचं पत्र. तिच्या त्या खास तिरप्या अक्षरांवरून आयडानं लगेच ओळखलं. आईचं पत्र उघडून अधीरपणानं वाचलं.

आईला खात्री होतीच आपल्या लेकीच्या यशाची. तिकडे बाबांनी नवा घोडा घेतला होता. नवीन सायकलही घेतली होती. त्यांची पायपीट आता बरीच कमी झाली होती.

आयडा आता हिंदुस्थानात जायला अधीर झाली होती. चिंचबनाचा गंध तिला बेचैन करत होता. तिने जायची तयारी सुरू केली होतीच. नवीन कपडे शिवून घेतले



होते. दवाखान्यासाठी लागणाऱ्या सामानाची जमवाजमव चालू होतीच. शिवाय आपली मैत्रीण ॲनी हॅन्कॉक हिलाही आपल्यासोबत येता यावं यासाठी खटाटोप ही चालू होता. ॲनी मिशनरी बनली होती. नोव्हेंबरमध्ये अमेरिका सोडण्याच्या विचारात त्या दोघी होत्या, तशात एक निरोप आला.

प्रॉटेस्टंट धर्मसंप्रदायाचे सचिव डॉ. कॉब आयडाला म्हणाले- 'आपल्याला डॉ. लुईसा हार्टचं पत्र आलंय. ती म्हणते वेलूरमध्ये महिलांसाठी एक रुग्णालय आवश्यक आहे.'

'खरोखरच तिथे तशी गरज आहेच. त्या परिसरातील हजारो स्त्रियांसाठी रुग्णालय हवंच.'

'आणि त्यासाठी तू निधी उभारावास असंही तिनं कळवलंय-' डॉ. कॉबनी स्पष्टपणे सांगितलं.

'कोणी? मी?'

'हं. बोर्डानंही या गोष्टीला आपला रुकार कळवलाय!'

'किती?' मुद्यावर येत आयडानं विचारलं.

'बोर्डाला वाटतंय कमीत कमी-'

'पन्नास हजार?'

'जवळपास-'

'लागणारच. चांगलं रुग्णालय उभारायचं म्हणजे तेवढे तर हवेतच.'

'आम्हाला वाटतं, तू आठ हजारांची जबाबदारी घ्यावीस. तू मनावर घेतलंस तर विमेन्स ऑक्झिल्यरीच्या मदतीने तेवढा निधी सहज उभारू शकतेस.'

डॉ. कॉबशी बोलणं संपवून आयडा निघाली तेव्हा तिच्या डोक्यात योजनांची गर्दी उसळली होती. दिवस मावळण्यापूर्वीच तिनं विमेन्स ऑक्झिल्यरीच्या सदस्यांशी बोलणी केली. याद्या केल्या. मुलाखती घेतल्या.

वेलूरमध्ये महिलांसाठी रुग्णालयाची आत्यंतिक आवश्यकता आहे हे खरंच; पण आपल्याला हे आधी कसं बरं सुचलं नाही म्हणून आयडा नाही म्हटलं तरी जरा खंतावलीच.

□

प्रयाणाचा दिवस जवळ आला.

आयडाच्या पदरात आश्वासनाखेरीज काहीच पडलं नव्हतं. ज्यांच्याकडे देण्यासारखं काही होतं त्यांना तिच्या मागणीमागचं गांभीर्य उमगत नव्हतं. ज्यांना उमगत होतं त्यांच्याकडे देण्यासाठी काही नव्हतं.

'मला एक सुचतंय बघ,' कॅथेराईन व्हान नेस्ट आयडाला एके दिवशी म्हणाली, 'कॉलिजिएट चर्चमध्ये आपल्या मिशनरी सोसायटीची सोमवारी सकाळी बैठक आहे. सोसायटीची अध्यक्षा श्रीमती टॅबर इथे जवळच राहाते. तिला भेट. कदाचित

त्या सभेत तुला आपलं म्हणणं मांडायची संधी मिळेल!'

आयडा ताबडतोब निघाली.

'श्रीमती टॅबर, मी डॉक्टर आयडा स्कडर. मला आपल्याशी काही महत्त्वाचे बोलायचे आहे.'

'अशा आत या' दिवाणखान्यात एका कोपऱ्यात खुर्चीत वाचत बसलेल्या एका वयस्क गृहस्थाकडे निर्देश करीत श्रीमती टॅबर म्हणाली-

'हे माझे मेव्हणे श्री. शेल. श्री. शेल, आम्ही आत जाऊन बोलतो' असे म्हणून ती आयडाला घेऊन आपल्या अभ्यासिकेत गेली. मधलं दार उघडंच होतं.

आयडाने आपले म्हणणे श्रीमती टॅबरसमोर मांडले. खुलासेवार सांगितले. महिला डॉक्टरअभावी दक्षिण हिंदुस्थानात मृत्युमुखी पडलेल्या आणि पडत असलेल्या अभागी स्त्री जीवनाचे वर्णन केले. दक्षिण हिंदुस्थानातील जनान्यांना दिलेल्या भेटी, तिथल्या स्त्रियांचे आरोग्य, मुसलमान स्त्रियांचे चार भिंतींआडचे जीवन, डॉ. हार्टने अंधाऱ्या खोल्यांची कौले काढून त्या तशा अपुऱ्या प्रकाशात केलेल्या शस्त्रक्रिया, तिथल्या अडाणी दाया-सुइणी इत्यादी सारे जीव तोडून सांगितले. महिला रुग्णालयाची निकड किती आहे हे परोपरीने सांगितले.

श्रीमती टॅबरने सारे शांतपणे ऐकून घेतले. समजून घेतले. आयडाला सोमवारी सकाळी मिशनरी सोसायटीच्या सभेसमोर हे विचार मांडायला परवानगी दिली. तिचा निरोप घेऊन आयडा उठली. अभ्यासिकेतून दिवाणखान्यात आली. तिथं कोपऱ्यात वाचत बसलेल्या श्रीयुत शेलनी पुस्तकातून डोकं वर काढलं. म्हणाले- 'तुमची ओळख झाली ते एक बरंच झालं.'

दुसऱ्या दिवशी सकाळी आयडा न्याहारी करत होती तेवढ्यात मोलकरणीनं तिला एक चिठ्ठी आणून दिली. तिनं ती उघडून वाचली. श्रीयुत शेलनी कळवलं होतं की सोमवारी सभेला जाण्यापूर्वी डॉ. आयडा स्कडरने त्यांना भेटून जावे.

श्री. शेल आपल्या टेबलाशी बसून कसलीशी आकडेमोड एका चतकोर कागदावर करत होते. कागदावरची आकडेमोड इतकी बारीक बारीक होती की, तसूभरही कागद कुठे कोरा नव्हता. फारच काटेकोर गृहस्थ. आयडा थोडीशी नाउमेद झाली.

'तुम्ही श्रीमती टॅबरना जे सांगत होतात ते मला बाहेर नीट ऐकू येत होतं. त्याबाबतीत अधिक जाणून घेण्यासाठीच मी तुम्हाला बोलवून घेतलंय.'

त्यांनी आयडाला नाना प्रश्न विचारले. तिनं सर्वांना समर्पक उत्तरं दिली. या गृहस्थाचं काम भावनेपेक्षा विचारावर अधिष्ठित आहे हे तिनं ताडलं. सारी काही चौकशी करून झाल्यावर त्यांनी तिला शेवटचा प्रश्न विचारला-

'तुम्ही तर नुकत्याच डॉक्टर झालात. अनुभवी नाही. तेव्हा असं रुग्णालय चालवण्याची पात्रता तुमच्यात आहे असं तुम्हाला खात्रीनं वाटतं का?'

आयडानं विनयपूर्वक उत्तर दिलं- 'या घटकेला मी पात्र नाही ही गोष्ट खरी; पण माझे वडील निष्णात डॉक्टर आहेत. तिथला अनेक वर्षांचा अनुभव त्यांच्या गाठीशी



आहे. तेव्हा इथं internship करण्यापेक्षा मी तिथे त्यांच्या हाताखालीच अनुभव घेईन. तोपर्यंत रुग्णालयाची इमारतही बांधून पूर्ण होईल. माझ्या शैक्षणिक पात्रतेविषयी शंका असेल तर कॉलेजकडे आपण चौकशी करू शकता.'

'ती मी आधीच केली आहे.'

'!'

इतका वेळ गंभीर भासणाऱ्या श्री. शेल यांच्या चेहऱ्यावर हास्य फुललं होतं त्यांनी चेकबुक जवळ ओढलं. लहान सुबक अक्षरात ते लिहू लागले.

आयडाचं हृदय धडधडत होतं...

'माझी प्रिय पत्नी मेरी टॅबर- शेल हिच्या स्मरणार्थ मी तुमच्या रुग्णालयाला देणगी देत आहे. तिला तुमचं हे कार्य नक्कीच आवडलं असतं. तुमची गरज आठ हजारांची आहे; पण मी दहा हजार देत आहे. कारण... कारण हे रुग्णालय एका सद्गुणी सदाचारी स्त्रीला साजेसं व्हावं...'

चेकबुकातून चेक काढून त्यांनी तो तिच्याकडे सरकावला. सरळ दृष्टिक्षेप टाकून तो वाचण्याची तिला हिंमत होईना.

एक रकमी दहा हजार डॉलर्सचा चेक!!

ठरल्याप्रमाणे सोमवारी सकाळी ती कॉलिजिएट चर्चमध्ये महिलांच्या सभेपुढे आपले म्हणणे मांडण्यासाठी गेली. तिथे तिनं नियोजित रुग्णालयासंबंधी तर सांगितलंच; शिवाय एक विनंतीही केली. हिंदुस्थानातील स्त्रीवर्गाला भेटून 'शुभ संदेश' पोहोचवण्याचं काम करणाऱ्या इव्हँजेलिस्ट्सना आर्थिक मदत करावी...

'एक पदवीधर युवती अशा कामासाठी माझ्याबरोबर हिंदुस्थानात येऊ इच्छिते. इथं उपस्थित असलेल्यांपैकी कोणी मनावर घेतलं तर-'

बोलत असताना आयडाचं लक्ष पुढच्याच रांगेत बसलेल्या तरुणीकडे वारंवार जात होतं. सर्वसाधारण चेहरेपट्टी. काळाभोर केशकलाप. भारी पण भडक नसलेला पोशाख. छोटी चण. विलक्षण चमकदार डोळे. गंमत म्हणजे आयडाची नजर तिच्याकडे वळे तेव्हा तेव्हा ते विलक्षण चमकदार डोळे आपल्यावर स्थिरावलेले आहेत हे आयडाला जाणवे.

आयडानं आपलं बोलणं संपवलं. खाली बसली. उपस्थितांत चर्चा झाली. थोडाफार निधीही गोळा झाला. तेवढ्यात ती चमकदार डोळ्यांची तरुणी आयडासमोर येऊन उभी राहिली.

'मी गर्ट्रयुड डॉड. तुमच्या सोबत निघू इच्छित असणाऱ्या स्त्रीच्या सर्व खर्चाची जबाबदारी मी घेते. तिला कळवा की तीही तुमच्याबरोबरच हिंदुस्थानात जायला निघेल!'

आयडा अवाक् झाली. काय बोलावं हे न सुचल्यानं तिनं गर्ट्रयुड डॉडचा हात हाती घेतला. कसंबसं म्हणाली-

'तुमचे आभार कसे मानावेत तेच कळत नाही.'

□

हाती घेतलेलं काम अर्धवट अवस्थेत बाजूला सारणाऱ्यातले श्री. शेल नव्हते. त्यांच्या पत्नीचं स्मारक हे असं तसं असून भागणार नव्हतं. तिचं नाव धारण करणारं रुग्णालय कसं सुसज्ज हवं, अद्ययावत् हवं!

प्रशस्त घोडागाडीत आयडाला बसवून श्री. शेल खरेदीला निघाले. रुग्णालयासाठी आवश्यक ती शस्त्रं, सामान विकत घेतलं. व्यवस्थित बांधाबांध करून घेतली. त्या तयार खोक्यांवर नावाच्या चिठ्ठ्या-लेबलं लागली. २२ नोव्हेंबर रोजी आयडाच्या सोबत जहाजातून जाण्यासाठी सामान तयार झालं. मगच श्री. शेल यांची देणगी सर्वार्थाने पूर्ण झाली.

□□



# हरवलेल्या रांगा

डॉ. आयडा स्कडर आणि ॲनी हॅन्कॉक वेलूरला दाखल झाल्या त्या वेळी नव्या वर्षाच्या पहिल्या दिवसाचं स्वागत करणाऱ्या जुन्या किल्ल्यातील तोफेनं त्यांचंही स्वागत केलं.

त्या सालच्या फॅशननुसार बेतलेले गुलाबी ऊनी कपडे त्यांनी उतरवले. ट्रंकेत व्यवस्थित बंद केले. कसर, झुरळांनी खाऊ नयेत याचा बंदोबस्त केला.

'कमाल आहे! जानेवारी महिन्यातही नुसत्या सुती कपड्यांवर भागतं म्हणायचं इथं! साधा स्वेटरही लागत नाही!' ॲनीला सगळंच आश्चर्य वाटत होतं.

'एप्रिलपर्यंत थांब!' आयडा अनुभवाचे बोल बोलू लागली, 'हे काहीच नाही. साधे सुती कपडे घालूनही तेव्हा कसं रसरसत्या भट्टीत असल्यासारखं वाटेल तुला. पण ॲनी, तुझी अगदीच निराशा नाहीना ग झाली?'

'माझी जिथे गरज आहे तिथे मी असणं यातच मला आनंद वाटतो आणि खास करून तूही सोबतीला असलीस म्हणजे तर आनंदीआनंद गडे!'

आल्या दिवशीच ॲनी तिथल्या इव्हँजेलिस्ट मेरी आयझॅक हेन्रीबरोबर गावातल्या स्त्रियांना भेटायला गेली. ॲनीच्या मनमोकळ्या स्वभावामुळं त्या साऱ्याजणी आपला बुजरेपणा सोडून तिच्या मैत्रीणी झाल्या. आठवडाभरातच तिनं त्या साऱ्यांना आपलंसं केलं. ॲनी रुळली. तट्टया लावलेला खटारा असो नाही तर घोडागाडी, ॲनी आपली आरामात सर्वत्र हिंडू लागली. आयडाबरोबर तीही तामीळ शिकू लागली. त्यामुळं तिला वेलूरात वावरणं सोपं जाऊ लागलं. गावच्या तुरुंगातील स्त्री-कक्षातही ती जाऊ लागली. ॲनीचं वेलूरमधील कार्य सुरू झालं. शिकवणं, 'उपदेश' करणं, मैत्रीचं- विश्वासाचं वातावरण तयार करणं वगैरे. या नाजूक तब्येतीच्या पण प्रखर निष्ठावान स्त्रीची सेवा वेलूरला पुढे सतत पाव शतक मिळत राहिली.

आयडाचे बाबा डॉ. जॉन स्कडर (दु.) यांची तब्येत आताशा म्हणावी तशी चांगली नव्हती. वार्धक्यानं खांदे झुकले होते. गाल, डोळे खोल गेले होते. त्यांना हल्ली गळवांचा त्रास होई. आयडा त्यांना मलमपट्टी करी. पुढं उद्‌भवलेल्या गंभीर आजारांची दुश्चिन्हंच होती ती. ही गळवं कशामुळं येत असावीत यावर आपल्या चुलतभावाशी- डॉ. ल्यूंशी तिने चर्चा केली. डॉ. हाफकिन्‌च्या नवीन लशीमुळं हा त्रास होत असावा अशी त्याची शंका होती; पण त्यात काळजी करण्यासारखं काहीही नाही असं म्हणून डॉ. जॉन त्यांचं बोलणं उडवून लावीत. मात्र बरेच वेळा

ओठावर दात दाबून आपल्या वेदना सहन करताना ते दिसायचे.

डॉ. जॉन भल्या पहाटे उठत. अभ्यासिकेत ठराविक वेळ वाचन–चिंतनात घालवत. आठ वाजता औषधोपचार करणं, 'उपदेश' करणं. इ. कामं सुरू होत. आयडा मदतीला असूनही हे सारं उरकायला दुपार व्हायची, मग दोन तास विश्रांती. उरलेला दिवस सायकलवर रुग्णांना तपासायला जायचं, चर्चच्या लोकांनां त्यांच्या घरी जाऊन भेटायचं, आपल्या अखत्यारीतील शाळांना भेट द्यायची, खेड्यातील धर्मोपदेशकांना भेटायचं, बाजारा- बाजारांतून धार्मिक पुस्तिका वाटायच्या अशी कामं चालायची.

तसं पाहिलं तर सकाळी औषधोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचा व्याप आयडा सांभाळण्याजोगी होती. विशेष गंभीर नसणाऱ्या किरकोळ दुखण्यांवर ती इलाज करू शकत होती; पण किरकोळ रुग्णही तिच्या ज्ञानावर, कौशल्यावर भरवसा ठेवायला तयार नव्हते. ती पुढं आली की मागं सरकून म्हणत–

'ताई, तुम्ही नाही. डॉक्टरसाहेब!'

'अरे बाबा, मी पण डॉक्टरच आहे.'

'कबूल; पण तुम्ही नकाच हात लावू!' असं म्हणत. साधं गळू झालेला रुग्ण दूर जाऊन उभा राहायचा. डॉक्टरांची वाट पाहात खोळंबायचा.

अशा प्रकारांमुळं नाराज झालेल्या आयडाला धीर देत डॉ. जॉन म्हणायचे-

'थोडा अवकाश लागणारच. धीर धर. बघ, मग तुला इतकं काम पडेल! आणि तुझं मुख्य कार्य आहे ते इथल्या स्त्रियांना मदत करणं.'

'कशा या स्त्रिया? मी कशी काय यांना मदत करणार? जाऊन काय त्यांची दारं ठोकत बसू की बाजारात रस्त्यावर उभी राहून जादुगारासारखी टोपलीतून औषधं काढून वाटू! करू तरी काय?'

पण शेवटी तीही संधी तिला मिळालीच.

'डॉक्टर अम्मल, घरात म्हातारी आजारी आहे. याल का?'

हा काय प्रश्न झाला?

मोतद्दाराला मागं बसवून ती स्वत: गाडी हाकायला बसली. रुग्ण म्हातारीच्या घरचा बोलावू आलेला मुलगा रस्ता दाखवायला पुढं बसला.

मिशनचे आवार व ते गाव यांतील अंतर दोन मैलांचंच; पण एवढं प्रदीर्घ कधीच वाटलं नव्हतं तिला. एका अरुंद बोळात रुग्णाचं घर होतं. त्या बोळात घोडागाडी शिरू लागल्याबरोबर शेजारी बसलेल्या मुलानं आरडाओरडीस सुरुवात केली. आयडाला काही कळेचना. लगाम खेचून तिनं गाडी थांबवली. मग कसंबसं इंग्रजी, तामीळ आणि हावभाव यांच्या मिश्र माध्यमातून तिला कळलं की मोतद्दार अस्पृश्य होता! त्याला त्या बोळात यायला मज्जाव होता.

वेलांट्या-वळसे घेत गेलेल्या त्या बोळातून आयडा त्या मुलाबरोबर एका वाड्यात शिरली. देवडी ओलांडून छोट्या बोळीत गेली. बोळीच्या दोन्ही अंगांना



खोल्या होत्या. ती बोळ पार करून आयडा मोठ्या चौकात आली. चौकाच्या चारी अंगांनी शाकारलेला व्हरांडा होता. तिथे काही स्त्रिया काम करीत बसल्या होत्या. त्यातलीच एक जण उठली. आयडाला नमस्कार केला. तिला एका काळोख्या खोलीत घेऊन गेली.

ती अंधारी कोंदट खोली पाहून आयडाला फार आश्चर्य वाटलं. आजाऱ्याला उजेडाचं आणि मोकळ्या हवेचं एवढं वावडं!

अंधाराला डोळे सरावल्यावर ती त्या रुग्ण वृद्धेच्या शय्येकडे गेली. चुकलं. शय्या नव्हे चटई. तिच्या शेजारी आयडा गुडघे टेकून बसली. तपासलं. एकूण लक्षणांवरून आयडाला जाणवलं की, ही वृद्धा मृत्यूच्या दारात आहे. अखेरच्या घटका मोजतेय.

आयडा विचित्र पेचात पडली.• तिला बोलावू आलेल्याला तर त्या वृद्धेची अवस्था नक्कीच माहीत असणार. आपली पात्रता, आपली लायकी सिद्ध होण्याची संधी मिळण्यापूर्वीच आपल्या पदरी अगदी घवघवीत अपयश घालण्यासाठीच हे पाचारण होतं की काय? आणि हे असंच काही तरी घडावं म्हणून वाट बघणारे वैदू, मांत्रिक, पंचाक्षरी, पुजारी, भगत आदी मंडळी होतीच की. ही वृद्धा मेली तर वेलूरमध्ये एकही व्यक्ती अशी आढळली नसती की, जिला अमेरिकन डॉक्टरणीची पहिलीच रुग्ण स्त्री मेली याची वार्ता त्याच रात्रीत कळलेली नसेल!

आयडाला वाटलं, झटक्यात इथून निघावं, म्हणजे कमीत कमी आपण काही करू शकत नाही एवढं तरी सांगता येईल. ती दारापाशी आली.

> पळून जायचं! एखाद्या भेकडासारखं? एका रुग्ण वृद्धेला मृत्यूच्या दारात टाकून!

आयडाच्या लहानपणी त्या प्लेगच्या साथीत मृत्यूचे केवढे भीषण थैमान पाहिलं होतं तिनं! त्यावेळी तिच्याा मातापित्यांनी ज्या धीरानं आणि नेटानं आपले कर्तव्य पार पाडले होते, त्याचा तिच्या मनावर खोल परिणाम झाला होता. मृत्यूच्या साक्षात दर्शनानेही बधिर व्हायचं नसतं. गलितगात्र व्हायचं नसतं. त्याच्याशी झुंजायचं असतं.

आयडानं आपला विचार बदलला.

आपल्याला बोलवायला आलेल्या त्या मुलाला तिने बोलावले. सांगितले की या वृद्धेचं आयुष्य सरत आलंय. कोणीही तिला वाचवू शकत नाही; पण आपण दिलेल्या सूचना आणि पथ्यपाणी घरातील लोकांनी पाळलं तर त्या आसन्नमरण स्त्रीला सुखाचं मरण येईल.

आपल्या मातेच्या अखेरच्या घटका सुखात जाव्यात म्हणून या मुलाने आयडाचे सर्व म्हणणे मान्य केले. रुग्ण वृद्धेला त्या अंधाऱ्या खोलीतून बाहेर आणले. उघड्या हवेशीर व्हरांड्यात चटईवर निजवले. थंड पाण्याच्या खुजाची सोय केली.

आयडाने आपला मोठा रुमाल पाण्याने भिजवून रुग्ण स्त्रीला स्वच्छ पुसून काढले. वृद्धेने डोळे उघडले. तिला आता थोडासा आराम पडल्याचे जाणवत होते.

चटईशेजारी बसून आयडा त्या मरणोन्मुख वृद्धेच्या अखेरच्या घटका सुसह्य करण्यासाठी धडपडत होती. या शुश्रूषेत बराच काळ गेला. आयडा थकली.

वृद्धेने शेवटचा श्वास घेतला.

त्या वृद्धेचे उघडे राहिलेले डोळे आयडाने हलक्या हाताने बंद केले.

आपण वाड्याबाहेर पडण्यापूर्वीच आपल्या या अपयशाची बातमी गावभर पसरलेली असणार याची आयडाला खात्री होतीच.

पण लवकरच आयडाला आपले कसब दाखविण्याची संधी मिळाली. तिचे वडील खेड्याच्या दौऱ्यावर गेले असताना तिला एका रुग्णाच्या घरी बोलावणे आले.

रुग्णाला तिने पाहिले. त्या रुग्णाच्या चेहऱ्यावर एवढी सूज की त्याला डोळेही उघडता येत नव्हते. वडील जवळ असते तर बरं झालं असतं असं तिला वाटलं. सूज येण्यामागची अनेक कारणं असतात. आता अमेरिकेतीलच कारणं इथंही असतील कशावरून?

रुग्णाच्या वेदना तरी कमी कराव्यात म्हणून आयडानं आपल्या आंगठ्यानं रुग्णाच्या सुजलेल्या पापण्या हलके हलके चोळावयास सुरुवात केली. मग जरा दाब वाढवला. सूज जिरत राहिली. थोड्याच वेळात त्या रुग्णाला आपले डोळे उघडता आले. रुग्णाच्या नातेवाईकांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. साऱ्यांना डॉक्टरीणबाईंच्या बोटातील जादूचे कौतुक वाटले.

बरीच धावपळ करून थकलेली आयडा घरी परतली. तिच्या अपयशाप्रमाणे या यशाची वार्ताही गावभर झालीच; पण यश मिळूनही आयडाच्या सुखाची चव कडवटच राहिली.

कोणतं उजवं? कोणतं डावं?

नाइलाजानं केवळ माणूसकीला जागून पत्करलेलं अपयश की, साध्या उपचारासाठी जादुगार म्हणवून घेणं?

□

डॉ. जॉन स्कडर (दु.) यांची तब्येत सुधारण्याची चिन्हे काही दिसेनात. फेब्रुवारीचा चढता उन्हाळा त्यांच्या खालावलेल्या प्रकृतीला अधिक त्रासू लागला. त्यामुळे स्कडरमंडळी या वेळी नेहमीपेक्षा आधीच आपल्या उन्हाळी सुट्टीवर कोडाईकनालला गेली. कडक उन्हाळ्याचे दोन महिने घालवण्यासाठी तिथल्या पलानी हिल्सवर दक्षिण हिंदुस्थानातील मिशन केंद्रातील मिशनरी येत. मिशनचे खजिनदार या नात्याने डॉ. जॉन यांच्यावर इथेही काही जबाबदाऱ्या असतच.

निळं निळं सरोवर. क्षितिजापर्यंत पसरलेला हिरवागार परिसर. अगदी स्वर्गीय



वातावरण! आयडाला खूप बरं वाटलं. तिच्या बाबांनाही खूप आराम पडला. गळवं गेली. मग खऱ्या अर्थानं आयडाची सुट्टी सुरू झाली.

दूरवरची घोडदौड. टेनिसचे सामने. छोट्या-मोठ्या सहली. साथीला दोघं भाऊ- हॅरी आणि वॉल्टर. शेल्टर बेटावरची मजा काही प्रमाणात इथंही आली.

मे महिन्यातला एक दिवस-

डॉ. जॉन (दु.) सायकलवरून घरी परतत होते. त्यांच्या सायकलचं पुढचं चाक दगडावर आदळलं. ते खाली पडले. आयडानं ते दुरून पाहिलं. ती त्यांच्या मदतीला धावली; पण त्यांना उठताच येईना!

हसण्याचा प्रयत्न करीत ते म्हणाले- 'पोरी, तुमच्या आनंदात मिठाचा खडा पडला ग!'

मिशनरी उतारू बंगल्यातील तरुण मदतीला धावले. जुजबी स्ट्रेचर तयार करून डॉ. जॉनना त्यांच्या बंगल्यात नेलं. सर्वांना बाजूला सारून डॉक्टर ल्यूने डॉ. जॉनचा ताबा घेतला. त्याने प्रथम त्यांच्या अंगावरचा कोट काढला. मग हलकेच शर्टाची बटणं काढून तोही बाजूला केला.

डॉक्टर ल्यूचा चेहरा एकदम गंभीर झाला. ते पाहून आयडा पुढे झाली आणि तिने पाहिले.

तिच्या मुखातून चीत्कार बाहेर पडला.

डॉ. जॉननी डोळे उघडून पाहिलं. म्हणाले-

'axilla glands ...बरेच दिवस झालेत त्यांना ...काखेत गळवं यायला सुरुवात झाली... वाटलं, साधीच सूज असेल ...पण चिघळत गेली ...फार झपाट्यानं वाढली!'

'का? का नाही सांगितलंत आधीच तुम्ही आम्हाला?' आयडाच्या कोरड पडलेल्या जिभेने शब्द पुढे रेटले; पण तिचं मन मात्र याचं कारण जाणून होतं. तिच्या बाबांना दुसऱ्याच्या सुखदु:खापुढे, हाती घेतलेल्या कार्यापुढे जिवाची तमा नव्हतीच.

डॉ. ल्यू आणि आयडा यांच्यात चर्चा झाली.

'ताबडतोब शस्त्रक्रिया होणं आवश्यक आहे.' डॉ. ल्यू म्हणाला.

'पण कुठे? कशी? जवळपास कित्येक मैलांच्या परिसरात इस्पितळ नाही. मदुरेला न्यायचं तर तेवढा प्रवास झेपला तर पाहिजे?'

'इथेच. तेही शक्य तेवढ्या लवकर. ही एकच आणि तीही अखेरीची संधी आहे त्यांना.'

सारी जमवाजमव करण्यात चार दिवस गेले. डॉ. ल्यू स्कडर (हा आयडाचाच चुलतभाऊ निष्णात डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होता.) काळजीपूर्वक पण त्वरेने सारी तयारी करत होता.

डॉ. जॉन आपली नित्याची कामे सरावाने पार पडात होते. हिशेब ठेवीत होते. सर्वांच्या समवेत जेवण करत होते. सार्वजनिक कामाची दखल घेत होते आणि

आपल्या वेदनाही बंद ओठांनी सहन करत होते.

कदाचित त्यांना आपल्या वडिलांच्या- डॉ. जॉन (प.) यांच्या आयुष्यातील प्रसंग आठवत असेल. त्यांच्या पायाला कर्करोग झाल्याचे त्यांना समजले तेव्हा त्यांनी स्वत:ला एका खोलीत बंद करून घेतलं होते. एक नोकर मदतीला घेतला. स्वत:च्या हातानेच आपल्या पायावर कापाकाप केली. असं करत असताना त्यांना किती वेळा म्हणून भोवळ आली.

आयडाला वाटलं हा रक्ताचा गुण थोडा अधिक आपल्यातही उतरता तर बरं.

ते चार दिवस आयडाने विलक्षण दडपणाखाली काढले. नंतरचे दिवसही तिने कसे काढले ते तिलाच माहीत! दोन जगांत ती जगत होती. दोन भूमिकांत वावरत होती. डॉक्टर म्हणून शांतपणे कर्तव्यदक्ष राहणारी आणि दुसरी- लहान भयग्रस्त मुलीची. दु:खापासून दूर पळून जाऊ पाहणारी. डॉक्टरच्या रूपात वावरताना तिला आपल्या आईला धीर द्यावा लागे; वडिलांशी नेहमीप्रमाणे हास्यविनोद करावे लागत आणि तिची तीच असे तेव्हा? तेव्हा सगळा मुखवटा झुगारून मोकळेपणी ढसाढसा रडावे असे तिला वाटे.

डॉ. ल्यू आणि आयडा यांनी उतारूबंगल्याच्या उघड्या व्हरांड्यात ऑपरेशन टेबलाची मांडामांड केली. भर दिवसा भरपूर उजेडात शस्त्रक्रिया करायची असे ठरले.

डॉ. ल्यूने शस्त्रक्रिया केली. आयडा, वॉल्टर यांनी शस्त्रं निर्जंतुक ठेवण्याची कामगिरी पार पाडली. मोठ्या टबात कापड उकळले. ओव्हनमध्ये ते कोरडे करून त्याचं ड्रेसिंग बनवलं. स्वयंपाकघरातील चुल्यावर पाणी सतत उकळतं ठेवलं.

डॉ. आयडा डॉ. ल्यूच्या हाताशी उभी होती. लागणारी शस्त्रे उकळत्या पाण्यातून काढून देत होती. वापरून झालेली पुन्हा निर्जंतुक करण्यासाठी उकळत्या पाण्यात टाकत होती.

जरी शस्त्रक्रिया खूप कौशल्यानं आणि काळजीपूर्वक केली जात होती तरी तिला खूप उशीर झालेला होता. ती गाठ समूळ काढून टाकणे धोक्याचे होते. डॉ. जॉन यांची तब्येत झपाट्याने खालावू लागली होती. कापून उघडा केलेला भाग मग घाईघाईनं बंद करण्यात आला.

'सारं संपलंय!' डॉ. ल्यू खोल आवाजात म्हणाला.

थोड्या वेळानंतर डॉ. जॉन शुद्धीवर आले; पण त्यांना वेदना खूपच होत असाव्यात. त्याच्या क्षीण आवाजातील शब्द अस्पष्टपणे ऐकू आले- 'हे देवा, हा दिवा आता मालवू दे!'

त्यानंतर त्यांना शुद्धच आली नाही. ३१ मे १९०० रोजी त्यांनी कोडाईकनाललाच या जगाचा निरोप घेतला. तिथल्याच दफनभूमीत त्यांचं दफन झालं.

त्यांच्या मृत्यूनंतर अनेकांचे शोकसंदेश आले. त्यांच्या सहकाऱ्याचा संदेश त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणाराच म्हणावा-



'His greatest fault, if it can be called such, was self depreciation.'

□

वडिलांच्या मृत्यूनंतर डॉ. आयडा स्कडर यांच्या अंगातील जणू सारी उभारीच गेली. आई, ॲनी हँकॉक आणि डॉ. आयडा वेलूरला परतल्या. बाबांच्याखेरीज सारं उणं-अपुरं वाटत होतं. त्यांच्या आधाराखेरीज डॉक्टरी कशी सुरू करायची? अमेरिकेत घेतलेल्या शिक्षणात उष्ण कटिबंधातील आजारांच्या अभ्यासाचा अंतर्भाव नव्हता. तिथे अमेरिकन निष्णात डॉक्टरांच्या हाताखाली Internship करायची सोडून त्या आपल्या वडिलांच्या हाताखाली अनुभव घ्यायला आल्या होत्या अन् वडील तर हे असे अचानक निवर्तले. दुहेरी हानी! प्रेमळ पिता हरपला. एकमेव कुशल मार्गदर्शकही गेला. डॉ. ल्यू स्कडर होता तो वेलूरहून बारा मैलांवर असलेल्या राणीपेटला. नेल आणि वॉल्टर हे दोघं भाऊ दुसऱ्या मिशनरी केंद्रावर. वेलूरमध्ये नवीन रुग्णालय उभं राहिल्याखेरीज डॉ. हार्ट येण्यासारख्या नव्हत्या. आजूबाजूच्या वैद्यकीय गरजांना कसं पुरून उरावं हे डॉ. आयडांना समजत नव्हते. अगतिक झाल्या होत्या. बेचैन झाल्या होत्या.

□

एके दिवशी डॉ. आयडांनी निर्णय घेतला. बंगल्याच्या व्हरांड्यातील कोपऱ्याकडची एक १०' x १२' ची खोली साफसूफ करून घेतली. सामानाची हलवाहलव केली. मनासारखी मांडामांड केली.

'माझा हा दवाखाना!' डॉ. आयडांनी जाहीर केलं.

'तुला एवढीशी जागा पुरणार नाही हे ध्यानात घे.' त्यांची धावपळ मुकाट्याने पाहाणाऱ्या त्यांच्या आईने त्यांना पुढे विचारले, 'ही खोली कशी काय पुरणार आहे तुला? आत्ताच ती टेबल, कपाट आणि अवजारं यांनी व्यापून टाकलीय. आता रुग्ण कुठे बसवशील?'

'तुला माझीपण खोली घे' ॲनीने डॉ. आयडांना सांगितलं. त्यांच्या कार्यात सहभाग म्हणून तिने गरज पडली तर व्हरांड्यातल्या दगडी फरशीवर चटई टाकून झोपणंही पत्करलं असतं.

'सध्या एवढीच जागा खूप झाली. बाहेर व्हरांड्यात रुग्ण बसतील, या खिडकीतून औषधाच्या बाटल्या देता येतील. कंपौंडरला ही खिडकी बरी आणि ही सोय किती दिवसांकरता? केवळ काही महिने. नवीन रुग्णालयाची इमारत उभी राहिल्यावर-' बोलता बोलता डॉ. आयडांचा गळा दाटून आला. नव्या रुग्णालयाची इमारत बघायला त्या किती आतुरल्या होत्या.

त्याच दिवशी त्यांनी गावात आपला नोकर पाठवला आणि मिशनच्या आवारात दवाखाना सुरू होत असल्याचे कळवले.

सुरुवातीसुरुवातीला दवाखान्याची खोली अगदी ऐसपैस वाटे. रुग्णच नसे कोणी. तरी डॉ. आयडा रोज सकाळी आठ वाजता आपला दवाखाना उघडायच्या. साफसफाई, औषध तपासणी करायच्या. मांडामांड करून रुग्णाची प्रतीक्षा करत बसायच्या.

> बाबांच्या वेळी व्हरांड्यात लागणाऱ्या रांगा कुठं बरं हरवल्या?
>
> बाबांच्या हाताखाली दोन महिने काम केलं त्यावेळी रुग्णांवर औषधोपचार केला नव्हता का? आपलं ज्ञान, कौशल्य हे त्यांपैकी कोणालाच जाणवलं नव्हतं? बाकी स्त्री-पुरुष समान लेखणाऱ्या अमेरिकेतही अजून महिला डॉक्टरांची उपेक्षाच होतेय. या अप्रगत देशाकडून तशी अपेक्षा तरी आपण कशी ठेवायची?

निराशेने आणि उद्वेगाने मग डॉ. आयडा व्हरांड्यात येरझारा मारत राहायच्या.

□

एक सकाळ उगवली.

मिशनच्या आवारात एक दिमाखदार घोडागाडी येऊन उभी राहिली. पडदा बाजूला सारून एक स्त्री खाली उतरली.

डॉ. आयडांचं हृदय क्षणभर थांबलं.

दागिन्यांनी मढलेल्या, सुरेख साडीत लपेटलेल्या त्या स्त्रीच्या डोळ्यांवर मात्र पट्टी होती. डॉ. आयडांनी मनातल्या मनात प्रभूची करुणा भाकली. आपल्याला इलाज करता येईल असेच काही तरी असू दे. मोतीबिंदूसारखी शस्त्रक्रिया न करावी लागो म्हणजे झालं!' 'सलाम माई, मी डॉक्टर आयडा स्कडर. तुम्ही मलाच भेटायला आला आहात काय?' डॉ. आयडा रोज मुन्शीजीकडून तामिळचे धडे घेत होत्या त्याचा त्यांना आता फायदा झाला.

'या, अशा आत या.'

मोतीबिंदू नव्हते. डोळे चांगलेच चिकटले होते. Critical case of conjunctivitis.

डॉक्टरांनी नीट तपासणी केली. मग त्या बंद डोळ्यांच्या पापण्यांवर सिल्व्हर नायट्रेटचे थेंब सोडले. बोरिक लोशन लावले.

'उद्या तुम्हाला यायला हवं. आणखी काही दिवस उपचार चालूच ठेवले पाहिजेत. तसं येणं जमणार नसेल तर मीच येईन. उपचाराखेरीज तुमचे डोळे वाचतील याची खात्री मी देऊ शकत नाही, 'डॉक्टर म्हणाल्या.

आपण तामीळमध्ये जे बोललो ते त्या स्त्रीला नीट समजले उमजले की नाही याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी आपली स्वयंपाकीण सलोमी हिला बोलावले. पुन्हा सारे समजावून द्यायला लावले. रुग्ण स्त्रीने रोज यायचे कबूल केले.

तरीही ती स्त्री निघून गेल्यावर, आपणच तिला तिचा पत्ता विचारून घेतला नाही याची चुटपुट डॉक्टरना लागलीच.



दुसऱ्या दिवशी दवाखाना उघडताना त्यांना कोण हुरूप! कोण उत्सुकता! आठ वाजले. बेचैन मनाने त्या व्हरांड्यात उभे राहून वाट पाहू लागल्या... नऊ वाजले. शेवटी न राहवून त्या आवाराच्या फाटकापाशी गेल्या. वाट पाहात उभ्या राहिल्या.

ती आली! ती आली!!

नंतर नेमाने ती रोज येतच राहिली.

तिचा डोळ्यांचा धोका संपूर्णत: गेला; पण दोन-चार दिवसांच्या तिच्या फेऱ्यांनंतर तिच्याबरोबर आणखीही एकीला तिने आणले. त्या दुसरीचेही डोळे आले होते. त्यावर इलाज करणं अर्थातच कठीण नव्हतं. एक पंधरवडा गेला असेल नसेल, डॉक्टर दवाखाना उघडायच्या तेव्हा व्हरांड्यात रुग्णांची रीघ लागलेली असे.

हरवलेल्या रांगा पुन्हा उगवल्या होत्या.

सर्व प्रकारचे स्त्री-पुरुष रुग्ण येऊ लागले. गळवं झालेले, डोळे आलेले, खरूजवाले, नायटेवाले, कृमीविकारवाले, असाध्य रोगवालेही. लवकरच त्या छोट्या खोलीत किरकोळ शस्त्रक्रियाही होऊ लागल्या. गळवं कापायची, मोडलेली हाडे सांधायची, ट्यूमर काढायची वगैरे.

स्वयंपाकघर सांभाळणारी सलोमी वेळप्रसंगी दवाखान्यातही डॉक्टरांच्या हाताखाली काम करायची. डॉक्टरांच्या लवकरच लक्षात आलं की सलोमीची स्मरणशक्ती चांगली आहे. बरीचशी औषधं तिच्या लक्षात असतात. एखाद्या औषधाचं नाव सांगितलं की ती ते नेमकं काढून देते. पुन्हा, डॉक्टरांच्या कडक शिस्तीनुसार राहायचीही स्वच्छ. शालेय शिक्षण पुरेसं मिळालेलं नव्हतं तरी सलोमीला तामीळ लिहिता-वाचता यायचं. इंग्रजीही ती उत्तम बोले. काम समजून घेण्याची तिची उत्सुकता आणि तल्लख बुद्धी यांमुळं डॉक्टरांच्या हाताखाली ती तयार होत होती. शेवटी डॉक्टरांनी तिला स्वयंपाकघरातून काढून आपल्या हाताखालीच घेतलं. औषधांच्या बाटल्या भरणं, जखमा साफ करणं, डोळे धुणं, मलमपट्टी करणं यांसारख्या कामात ती तरबेज झाली.

□

रुग्णांची संख्या वाढू लागली आणि दवाखान्याची खोली अपुरी पडू लागली. मग शेजारची गेस्ट रूम दवाखान्याला जोडून घेतली. तिथे अत्यावश्यक वैद्यकीय सेवेची गरज असणाऱ्या रुग्णांसाठी तीन खाटा टाकल्या. तरीही जागा पुरेना! सकाळी आठ वाजता उघडलेला दवाखाना दुपार टळली तरी बंद करता येत नसे. रीघ आपली चालूच! शिवाय गावात रुग्णांच्या घरी जाऊन त्यांना तपासायचे असे ते वेगळेच. जसजसा त्यांचा लौकिक वाढू लागला तसतसे त्यांचे कामही वाढू लागले. जबाबदाऱ्या वाढू लागल्या. आजूबाजूच्या खेड्यांतून मिळून पाचएक लाख स्त्रिया होत्या, त्यांच्यासाठी ह्याच एकमेव महिला डॉक्टर! १९०१ सालच्या त्या एका महिन्यात त्यांनी १७७ व्हिजिट्स केल्या!

□

डॉ. आयडा उपचार करीत होत्या. त्यातील बरेचसे आजार, त्या शिकत असताना अभ्यासलेले होते. अपुरे अन्न, कदान्न, सांडपाण्याची दुरवस्था यांमुळे क्षयरोग हिंदुस्थानात मुळं घट्ट रोवून बसला होता. किती क्षयरोगी रोज मरत होते त्याची गणतीच नाही. शुश्रूषा केंद्रे नसल्याने क्षयी रुग्णांची नक्की नोंद नसे. अंदाजही नसे. अगदी शेवटच्या अवस्थेत रुग्ण दवाखान्यात यायचा; पण त्यावर इलाज निरुपयोगी ठरत. कर्करोगही क्षयाच्या हातात हात घालून होताच. विशेषत: तोंडातील कर्करोग. सततच्या पान, तंबाखू, चुना, सुपारी इत्यादींच्या सेवनाने गालफडात व्रण होत. त्याचे परिणाम झाल्याशिवाय कसे राहतील? विषमज्वर, गरमी, उपदंश-साऱ्यांची उपस्थिती असायचीच!

या देशात माणसांचा नुसता पूर! इथले आजार, दुखणीखुपणीही त्याच प्रमाणात. विविध अन् विस्तृत. पायावर व्रण तर नित्याचेच. कदान्नामुळे आणि दूषित वातावरणामुळे त्वचारोगही असायचे. साबण ही गरिबांची स्वप्नातच पाहण्याची बाब. जखमांकडे अक्षम्य दुर्लक्ष. त्यामुळं त्या कायम चिघळलेल्या अवस्थेत, खोलवर चरत गेलेल्या असायच्या. प्रसंगी घोट्यापासून गुडघ्यापर्यंत कुठेही पाय कापावा लागे आणि हे सारे कमी म्हणून की काय नारू सातत्यानं साथ द्यायचा.

साधी गोष्ट डोळे येण्याची; पण त्यातही किती तऱ्हा! एखादा नवाच भयानक नेत्ररोग उद्‌भवलाय असं वाटावं इतकी त्याची लागणही. इथल्या मोतीबिंदूचा वार्धक्याशी संबंध नाही. अन्नघटकांच्या त्रुटीमुळं दृष्टी मंदावलेली. परिणामी अंधत्व. यात वयाचा संबंध कुठून? डोळ्यात फूल पडणं हे हिंदुस्थानात प्रचंड प्रमाणावर आढळणाऱ्या अंधत्वामागचं महत्त्वाचं कारण. लाखो लोक अंध. नेत्ररोगाच्या साथी वारंवार उद्‌भवायच्या. काही विशिष्ट जंतूंमुळं उद्‌भवणारा हा नेत्ररोग बोटे व कपडे यांनी संसर्ग वाढवायचा. जून महिन्यात पावसाच्या आधी चिलटं उडतात. ती डोळ्यांच्या पापण्यात अडकतात. त्या वेळी या रोगाचा प्रसार अधिक. याचा संसर्ग वारंवार झाला तर अंधत्व ठरलेलंच.

मुस्लिम स्त्रियांत खुपऱ्यांचे (Trachoma) प्रमाण अधिक. खुपऱ्याही अंधत्व आणायच्या. अन्नातील जीवनसत्त्वांचा अभाव डोळ्यांना दुबळेपणा आणायचा. बुबुळांवर पांढरा पडदा यायचा. डोळे निस्तेज व्हायचे. शेवटी ठरलेलं- अंधत्व!

आणखी एक भयानक रोग म्हणजे कुष्ठरोग. महारोग. प्राचीन काळापासून याची सांगड पापाशी. याचंही इथं प्रमाण महाप्रचंड! पुष्कळ कुष्ठरोगी इथं हाती करवंटी घेऊन भीक मागताना आढळायचे. ज्यांची रोगाची लक्षणे दृष्टीस येण्यासारखी नसत- म्हणजे कातडीवर चट्टे पडणं, कातडी दडदडीत होणं, हातापायाची बोटे झडणं वगैरे- ते आपल्या रोगाची वाच्यता न करता उघडपणे समाजात वावरत. कुष्ठरोग हा माणसांतून बहिष्कृत करणारा. म्हणूनच तो दडपण्याचा खटाटोप अधिक. त्या वेळच्या हिंदुस्थानात फारच थोड्या ठिकाणी कुष्ठरोग्यांसाठी आरोग्यकेंद्रे होती आणि त्या केंद्रांतून रोगी असायचे तेही हाताच्या बोटांवर मोजण्याइतके. या



रोगावर फार मोठ्या प्रमाणावर आणि परिणामकारक असा इलाज होत नसे. व्रणांना मलमपट्टी करणे, गळून पडणारे बोट कापून ड्रेसिंग करणे, थोडाफार औषधोपचार-इतपतच इलाज व्हायचे.

कॉलऱ्यावर मात्र डॉ. हाफकिन् यांच्या प्रतिबंधक लसीमुळे बराच आळा बसला होता. १८९३ साली प्रचारात आलेल्या लसीमुळे कॉलरा आटोक्यात आला होता. तरी अजूनही त्याची लागण झाल्यावर रोगनिवारक उपचार सापडला नव्हता. अशा साथी म्हणजे दैवी कोप अशीच ज्या समाजाची धारणा असते, यात्रा आणि उत्सव अशा ठिकाणींच या साथींचा अधिक प्रादुर्भाव होतो हे ध्यानी न घेता जो समाज या प्रतिबंधक उपायांना विरोध करतो, त्या समाजातील रोगराईचं समूळ उच्चाटन करणं अशक्यप्रायच असतं.

मलेरियावर परिणामकारक क्विनाइन निघाले होते. खरजेवर उत्तम मलमे निघाली होती. हगवणींच्या साथींना प्रतिबंध होत होता. हे सारं खरं असलं तरी अनारोग्याचे मूळच उखडून टाकणे मात्र जमत नव्हते. कितीही प्रयत्न झाले तरी या देशाचे आयुष्यमान सरासरी वय वर्षे सत्तावीसवर चढत नव्हते. दर चारांपैकी एक बालक आयुष्याचा पहिला वाढदिवस पाहायला जगत नव्हते!

डॉ. आयडांना पुष्कळ वेळा झगडावं लागे, ते रोगापेक्षा अधिक भयंकर अशा अंधश्रद्धेशीच. अंधश्रद्धा, भोळ्या समजुती आणि कुडमुडे वैदू यांचा अडाणी समाजमनावर केवढा तरी पगडा! निर्जळी उपवासाच्या दिवशी रुग्ण औषधाच्या थेंबालाही शिवत नसत. रोजे असले की मुस्लिम स्त्रिया दिवसभरात औषधाचाच काय पण पाण्याचाही थेंब पोटात जाऊ देत नसत!

कधीकधी रुग्ण एवढी घरं बदले की, काल तपासलेल्या रुग्णाला आज कुठे जाऊन तपासावे लागेल याची डॉक्टरांना चिंता असायची. घर बदलत राहण्यामागचं कारण काय तर घर भुताने पछाडलेले असे म्हणून किंवा रुग्णाचा बदललेला पत्ता भुताखेतांना कळू नये म्हणून. रोग जितका किचकट तेवढा भुताखेतांचा पगडा अधिक. अंत व्हायचा तो रुग्णाचाच.

चेहऱ्याचा पॅरॅलिसिस झालेली एक मुलगी. डॉ. आयडा तिला तपासायला तिच्या घरी गल्या, तर तिच्यावर उपचार चालू होते. कबुतर मारून त्याचे रक्त थेंब थेंब करून रुग्णाच्या मस्तकावर पडेल असे टांगून ठेवले होते.

दुसऱ्या एकाचा व्रण साफ करून पट्टी बांधली. जखम खोल होती म्हणून न चिघळू देण्याची काळजी घेणे आवश्यक होते. दुसऱ्या दिवशी पट्टी सोडली तर ती जखम उदी-अंगाऱ्याने भरून ठेवलेली. परिणाम कसा टळावा?

पण हेही तितकंच खरं होतं की पुष्कळ देशी औषधं परिणामकारक, अगदी रामबाण होती. पाश्चात्य औषधपद्धती उदयास येण्याआधीपासूनच भारतीय औषधपद्धती अस्तित्वात होती. इ.स.पू. १००० च्या सुमारास धन्वन्तरी चरक आणि शल्यकर्मविशारद सुश्रुत होऊन गेले. त्यांचीच काय पण संपूर्ण भारतीय वैद्यकशास्त्राची मुळं आयुर्वेदात.

आधुनिक वाटावं इतकं हे वैद्यकशास्त्र प्रगत होतं.

चरक संहितेत आहार, औषधोपचार, विविध विषांवर उतारे, वैद्याला लागणारी शस्त्रं, स्वच्छतेची व शुद्धतेची आत्यंतिक आवश्यकता, व्यावसायिक निष्ठा इत्यादींवर प्रकरणे आहेत, तर सुश्रुत शस्त्रक्रियेला लागणारे छोटे-मोठे चाकू, करवती कात्र्या, सुया आदींची माहिती देतो. त्यांचा वापर कसा करावा याचे कुशल मार्गदर्शन करतो. त्याने या साऱ्यांवर आपल्या अनुभवाचे बोल दिले आहेत. त्याने शवविच्छेदन केले, पोटावर शस्त्रक्रिया केल्या, हर्नियावर इलाज केले, कानाची फाटलेली पाळी दुसरीकडच्या त्वचेचे कलम करून शिवली. या साऱ्यांची तो माहिती देतोच; पण रुग्णाला भूल देण्यासाठी मद्यार्कांचा (medical wines) कसा उपयोग करावा तेही सांगतो. प्रसूतिगृहाबाबत सूचना देताना त्याने उकळत्या पाण्याच्या वापराला आणि हातांच्या आत्यंतिक स्वच्छतेला महत्त्व दिले आहे. बुद्धधर्माच्या उदयानंतर अहिंसेच्या तत्त्वापायी शवविच्छेदन, प्राण्यांची शरीररचना जाणून घेण्यासाठी त्यांच्या शरीराची चिरफाड वगैरेंवर बंधने आली. शरीररचना समजून घेण्यास अन्य मार्ग नसल्याने शस्त्रक्रियांवर हळूहळू मर्यादा येत गेल्या. कालांतराने ही शाखा खंडित झाली; पण सार्वजनिक मोफत रुग्णालये, विनामूल्य औषधोपचार, राज्य औषधालये, वैद्यकीयशाला, जन्ममृत्यूच्या नोंदी, औषधी वनस्पतींची लागवड यांना महत्त्व होतेच. मुस्लिम राजवटीत 'युनानी दवा' पुढे आला. तरीही आपली निर्विवाद उपयुक्तता सिद्ध करून असणारी जुनी औषधे आपले अस्तित्व आणि महत्त्व टिकवून राहिलीच. त्यांच्या सोबतीने, काही भोळ्या समजुतींनी, अंधश्रद्धेने जतन केलेली जडीबुटीही राहिली.

डॉ. आयडा अनुभवसिद्ध आणि प्रदीर्घ परंपरा लाभलेल्या काही देशी औषधांचा वापर करीत. उदाहरणार्थ, पांढऱ्या चाफ्याचा (पॅगोडा ट्री) दुधी रस, चंदनतेल आणि कापूर यांचे मिश्रण कंडेवर. चिंचेच्या पाल्याचे पोटिस गळवावर. आणखी एका झाडाच्या मुळीचा रस व्रणावर किंवा दंतमंजनासाठी इत्यादी कुष्ठरोग्यास सर्पदंश घडवणेसारख्या अघोरी उपचारांना मात्र त्यांचा प्रखर विरोध होता. परंतु Indian Medical Gazette मध्ये कर्नल चोप्रांच्या प्रयोगांची आलेली माहिती त्यांच्या वाचनात आल्यावर त्यांना सर्पविषाचे औषधी महत्त्व समजले. सर्पविषाच्या अभ्यासपूर्ण प्रमाणित मात्रेने कुष्ठरोगावर काबू ठेवता येतो हे मान्य असले तरी हे भयंकर औषध सांगोवांगीने वापरणे धोक्याचेच.

□

डॉ. आयडांना आपल्या वडिलांची अनुपस्थिती फार जाणवे. इथे वावरताना, या लोकांना समजून घेताना त्यांच्या अनुभवाचा किती उपयोग झाला असता! आता त्या साऱ्याची किंमत त्यांना अनुभवानेच द्यावी लागत होती. परभाषा, अनोखे रिवाज शिकताना त्यांच्याकडून चुकाही व्हायच्या. तशातच कधी न अभ्यासलेले आजार अपरिचित स्वरूपात सामोरे यायचे तेव्हा त्यांना फार विचित्र परिस्थितीतून पार व्हावं



लागायचं. मनावर विलक्षण ताण यायचा. कित्येकदा केवळ बुद्धीच्या किंवा कसबाच्या जोरावर निभाव लागणं कठीण असे तेव्हा विचित्र प्रसंग उभे राहात. अशा वेळी त्यांचा नर्म विनोद, मोहक हास्य किंवा हजरजबाबी सडेतोडपणा त्यांच्या उपयोगी पडे.

एक असाच अनुभव-

रणरणत्या उन्हाळ्यातील एक भर दुपार. सकाळपासून लागलेली रीघ संपवून आणि नंतर आठ घरच्या व्हिजिट्स संपवून उष्म्याने आणि श्रमाने थकलेल्या डॉक्टर एका खोलीत झालरीच्या पंख्याखाली नुसत्या लादीवर पडून विश्रांती घेत होत्या.

'एक मनुष्य घाबराघुबरा होऊन आलाय. तुम्हाला लगोलग यायला सांगतोय त्याच्या घरी-' सलोमीनं डॉक्टरना वर्दी दिली.

'छे:! आता घराबाहेर पडणं शक्यच नाही. त्याला जाऊन सांग... थांब. नको काही सांगूस... येतेय म्हणून सांग!' डॉ. आयडा उठत म्हणाल्या.

त्या भर उष्म्यात, पाश्चात्य पद्धतीच्या पायघोळ, बंद गळ्याच्या, लांब बाह्यांच्या, खळ मारलेल्या हवाबंद झग्यात डॉ. आयडा निघाल्या. घराचं दार उघडून बाहेर पडण्याआधीच त्या घामानं डबडबल्या. त्यांना वाटत होतं न जाणो – मागे त्या एका रात्रीत तीन जण बोलावून गेले. तशातलाच प्रकार असला तर?

'डॉक्टर अम्मा, माझी तरुण पत्नी प्रसूतिवेदनांनी तळमळतेय तुम्ही चलता का?'

म्हणजे त्यातलाच प्रकार होता.

'हो! हो!' आपण नकार दिला नाही याचे समाधान डॉक्टरना झाले.

बोलवायला आलेला माणूस सुशिक्षित उच्चवर्णीय हिंदू होता. त्याच्या घराण्यात बरेच वकील, उच्च पदाधिकारी वगैरे होते. डॉ. आयडा निघाल्या. या सुशिक्षित आणि सुसंस्कृत घरात आपले ज्ञान व कसब खऱ्या व पुऱ्या अर्थाने वापरता येईल म्हणून त्यांना समाधान वाटत होते.

प्रशस्त वाड्याची देवडी, चौक ओलांडून डॉक्टर एका अंधाऱ्या खोलीत पोहोचल्या. ना खिडकी ना उजेड. कोंदट अंधारी खोली. होय तीच ती. तशीच. अगदी तशीच. अंधारी अन् कोंदट खोली. बाळंतिणीची खास खोली! विटाळाच्या चुकीच्या कल्पनांनी अस्पर्श्य ठरलेली ती बहिष्कृत खोली. खोलीत गेल्यावर एखाद्या रसरशीत भट्टीत शिरल्यासारखं डॉक्टरांना झालं. चटईवर निजलेल्या बाईशेजारीच शेणानं सारवलेल्या नुसत्या जमिनीवर त्या गुडघे टेकून बसल्या.

'माई!' डॉक्टरांनी तया स्त्रीला हाक मारली.

जाग नाही.

'माई!'

डॉ. आयडा धास्तावल्या. ही आपण पोहोचायच्या आधीच गेली की काय? काही प्रयत्न करायला अवसर मिळण्यापूर्वीच यमदूतांनी हिचा ताबा घेतला की काय?

तिचा हात हाती घेऊन डॉक्टर तिची नाडी पाहू लागल्या. तेवढ्यात त्या आसन्नप्रसवा स्त्रीने डॉ. आयडांचा हात आपल्या ओठांशी नेला. जाड आणि उष्ण ओठ. डॉक्टरांनी हलकेच तिचे ओठ अलग केले. जीभ केवढी सुजली होती! तहानेने व्याकूळ झाली होती बिचारी. हजार मरणं भोगत होती. डॉक्टर ताडकन् उठून उभ्या राहिल्या. स्वत:वर ताबा ठेवणं त्यांना कठीण जात होतं. सोबत उभ्या असलेल्या वृद्धेला त्यांनी तामीळ भाषेत समजावलं- 'माझं औषध थोडं निराळं आहे. त्यासाठी पाणी लागेल. पाण्याशिवाय देता येणार नाही ते.'

आजीबाई होकार भरून मान हलवत निघून गेल्या. 'आक्रितच एकेक! बाळंतिणीला पाणी दिलेलं आजवर ऐकलं नव्हतं,' असं पुटपुटत पाणी आणून दिलं. चांगलं घोटभर.

'एवढंच? ...नाही पुरायचं. आणखी हवंय.'

आजीबाई गेल्या आणि कपभर पाणी घेऊन आल्या.

'आणखी पाणी आणा जा. भरपूर पाणी हवंय!'

आजीबाई मख्ख उभ्या. आता ही काही देत नाहीसं पाहून डॉक्टर बैठकीच्या खोलीत आल्या. तिथं घरातली पुरुषमंडळी कोंडाळं करून बसली होती. त्यात त्या अडलेल्या स्त्रीचा पतीही होता. डॉक्टरना बैठकीत आलेलं पाहून तो चटकन् उठून उभा राहिला.

'डॉक्टर, माझी पत्नी? मूल?'

'तुमची पत्नी मृत्यूच्या दारात आहे,' डॉक्टर जरा करडेपणानेच म्हणाल्या, 'तुमच्या घरातील स्त्रिया तिला पाणी प्यायला द्यायला घाबरतात.'

सगळी पुरुषमंडळी डॉक्टरांच्याकडे आश्चर्याने पाहू लागली. त्या सर्वांना इंग्लिश भाषा समजत होती. म्हणून डॉक्टर इंग्लिशमध्येच बोलत होत्या- 'तुम्ही पुरुषसुद्धा भिता की काय? कशासाठी? पृथ्वी सपाट आहे असं सांगणाऱ्या प्राचीन समजूती आजही उराशी बाळगून जगणार आहात की काय? नाही ना? तुम्ही सारे सुशिक्षित आणि समजूतदार आहात. जे करायला तुमच्या स्त्रिया घाबरतात ते तुम्ही करून दाखवा!' मग त्या नवरदेवाकडे वळून त्यांनी विचारलं- 'काय परवडतं?' खुळी समजूत की मृत पत्नी?'

नि:शब्द शांतता पसरली.

'आम्ही काय करावं म्हणता?'

'त्या स्त्रियांना सांगा, मी मागेन तेवढं पाणी मला आत्ताच्या आता मिळालं पाहिजे!'

पाणी मिळालं.

पाण्याअभावी तडफडणारा जीव वाचला. बाईची सुटका झाली. दिवसभराच्या श्रमांनी थकलेल्या डॉक्टरांच्या मनात उभारी आली.

□



प्रतीक्षा संपली. नव्या रुग्णालयाच्या नियोजित इमारतीचे पक्के आराखडे, नकाशे तयार झाले. ७ सप्टेंबर १९०१ रोजी कोनशिलासमारंभ पार पडला. दुर्दैवाने, त्या मुहूर्तावर पडला तेवढाच पाऊस. बाकी सारा ऋतू कोरडाठाक गेला! २,००,००० चौ. मैलांचा परिसर दुष्काळाच्या भीषण तडाख्यात सापडला. मिशनच्या आवारातील विहिरीही कोरड्या पडायची वेळ आली.

डॉ. आयडांच्या दवाखान्यापुढची रीघ दर दिवशी वाढतच होती. सर्वांवर अवर्षणाचे दुष्परिणाम झालेले जाणवत होते. जीर्णशीर्ण शरीरे, खप्पड चेहरे, खपाटीला गेलेली पोटं.

मिशनच्या आवारात अन्नछत्र उघडलं गेलं. अगदी भुकेकंगाल असत त्यांना रागीची कांजी देण्यात येई. मिशनच्या आवाराबाहेर पाऊल टाकलं की मोहोळ उठावं तसे सगळीकडे पसरेलेले हात पुढं यायचे. उघडी रिकामी तोंडं सामोरी यायची.

दुष्काळ म्हणजे प्रचंड भूक. महाप्रचंड रोगराई. दवाखाना अपुरा पडू लागला. रुग्ण तर दिवसेंदिवस वाढतच होते. शेवटी डॉक्टरांनी मिशनच्या आवारात विटा-मातीची एक साधी इमारत बांधून घेतली. सहा खाटांची सोय केली.

या काळात डॉ. आयडांच्यावर एवढा कामाचा ताण पडला की त्यांना क्षणाची म्हणून उसंत नसे; पण तशा धबडग्यातही वेळात वेळ काढून त्या आपल्या मैत्रिणींना पत्र पाठवत. एकीला त्यांनी आपला दिनक्रम कळवला होता-

'बैलगाड्यांच्या चाकांच्या खडखडाटाने मला भल्या पहाटेच जाग येते. प्रातर्विधी आटोपून न्याहारी उरकेपर्यंत सकाळ उजाडलेली असते. सूर्याची पहिली कोवळी किरणं जमिनीवर उतरलेली असतात, माझी हिंदी मदतनीस सलोमी तयार होऊन माझी वाट पाहात उभी असते. आठ वाजता दवाखाना उघडतो. त्यापूर्वी आम्ही गावातल्या व्हिजिट्स उरकतो. प्रत्येक वेळी आमची घोडागाडी रुग्णाच्या दारापर्यंत जाईलच असा सोयीचा रस्ता नसतो. बऱ्याच वेळा तर अरुंद गल्लीबोळातून पायी जावं लागतं. काही काही वस्त्यांत तर इतके उकिरडे असतात!

मी जेव्हा एखाद्या वाड्यात जाऊन रुग्ण तपासू लागते तेव्हा त्या वाड्यातील आणि आजूबाजूच्या स्त्रिया पटापट पुढं येतात. आपल्या हाताची नाडी पाहून निदान करायला सांगतात. ही नाडीपरीक्षा हे एक वेगळंच प्रकरण आहे. हाताची नाडी पाहून रुग्णाची प्रकृती वात, पित्त किंवा कफ या प्रकारात बसवावी लागते. तसेच रुग्णाला काय आजार झालाय हे डॉक्टरलाच ओळखता आले पाहिजे. रुग्णानेच आपल्याला काय होतंय ते सांगितले तर तो डॉक्टर कसला, अशी इथली समजूत आहे. त्यामुळे पाश्चात्य डॉक्टरांना इथे रुग्णाच्या विश्वासास पात्र व्हायचं असेल तर नाडीपरीक्षेचं निदान नाटक तरी जमावं लागतं. हे जमलं की रुग्ण आपल्याला काय होतंय ते सांगू लागतो. पुन्हा नाडी पाहताना पुरुषाच्या उजव्या आणि स्त्रीच्या डाव्याच हाताची नाडी पाहण्याचं धोरण सांभाळलं पाहिजे. कारण इथल्या स्त्रियांची एक समजूत आहे- उजव्या हाताची नाडी पाहून स्त्रियांच्या रोगाचं निदान होत नसते. मी जर त्यांच्या

डाव्याऐवजी उजवा हात हाती घेतला तर त्या मला अडाणी ठरवतात.

सकाळच्या या व्हिजिट्स संपवून आम्ही परततो तो दवाखान्यासमोर गर्दी जमलेली असते. मग नाव नोंदवणं, रोगचिकित्सा, औषधोपचार हे सारं इतकं किचकट आणि वेळ खाणारं असतं की, हाताशी कोणी प्रशिक्षित परिचारिका असती तर किती बरं झालं असतं असं वाटतं.

कोणाचं बोट कापलेलं असतं. कोणी भाजलं-पोळलेलं असतं. कोणाचं तान्हं मूल रडत असतं, तर कोणाच्या घशात माशाचा काटा अडकलेला असतो आणि तो गावठी वैदूने काढण्याच्या प्रयत्नात आणखीनच खोल रुतवून ठेवलेला असतो. या साऱ्यावर इलाज करताना होत नाही एवढा त्रास, हे लोक वाकून माझ्या जोड्यांची धूळ आपल्या मस्तकी लावतात तेव्हा होतो. पण हे टाळायचं कसं हे मात्र मला जमू लागलंय.

नेत्ररोग, कर्णशूल, चर्मरोग आणि ज्वर हे तर नित्याचेच; पण दर दिवशी एखादा अनोळखी आजार भेटीला येतोय.

माझी सध्याची जागा दवाखान्यासाठी आता खूपच अपुरी पडते. त्यातून प्रत्येक रुग्णाला औषध किती वेळा, केवढं आणि कसं द्यायचं, पथ्य कोणतं हे पुन्हा पुन्हा शांत डोक्यानं बजावावं लागतं.

काही रुग्णांनी माझ्याकडे येण्यात एवढा उशीर केलेला असतो की इलाजच उरलेला नसतो; पण तसं त्यांना सांगूनही पटत नाही.

न्याहारीची घंटा झाली तरी मला काम सोडून जाणं जमत नाही. जेवण घ्यायला मला दुपारचा एक वाजतो. जवळजवळ मीच एकटी शेवटची उरलेली असते. जेवण झाल्यावर मी माझ्या कार्यालयात जाते. काही परीक्षा, चाचण्या करायच्या असतात. रोगनिदान करायचे असते.

मग मी पुन्हा दवाखान्यात जाते. तिथल्या शेजारच्या खोलीत तीन रुग्ण स्त्रिया असतात. ही खोली हवेशीर, मोकळी आहे. इथे राहून जाणारी प्रत्येक स्त्री मला नेहमी म्हणते- 'इथे येऊन राहिलं की आजार आपोआप पळून जातो!'

या रुग्ण स्त्रियांची तपासणी झाली की मी घरी येऊन थोडीशी विश्रांती घेते. तेवढ्यात गावातून बोलावणं येतं. बरंच अंतर चालत जावं लागतं. एक तरुण क्षयी मुलगी शेवटच्या घटका मोजत असते. तिला रक्ताची उलटी झाल्यावरच घरच्यांनी शेवटचा उपाय म्हणून माझ्याकडे धाव घेतलेली असते. एक दिवस असा उगवेल की त्यांना माझा विश्वास वाटेल. त्यांना त्यांची चूक उमजेल ...मी वाट पाहिली पाहिजे.

परतायला संध्याकाळ उलटून जाते. भोजनाची वेळ झालेली असते. कपडे बदलून भोजनगृहात जाते. इथे शिळोप्याच्या गप्पांत मायदेशीच्या आठवणी निघतात. तुमच्या आठवणी येतात.

ता.क.- पत्राचा पूर्वार्ध लिहिल्याला दोन आठवडे झालेत. भाजलेलं पोर घेऊन एक बाई आली होती बघ! त्याची तब्येत चांगलीच सुधारली होती. आता त्वचा



कलम करू या म्हणून सुचवलं तर माऊली परत इकडे फिरकलीच नाही! वैदूकडे गेली. तो घशात माशाचा काटा अडकलेला म्हातारबा- त्याचा घसा चांगला बरा केला मी. बरेच दिवस बिचाऱ्याला अन्न गिळता येत नव्हतं. खायला यायला लागल्यावर जेवजेव जेवला. घटाघटा पाणी प्याला आणि मेला! ती क्षयी स्त्रीही वारली. फार वाईट वाटतं बघ!'

एवढी जिवापाड मेहनत करणाऱ्या डॉक्टरना कित्येकदा विचित्र उपेक्षेला सामोरे जावे लागे.

तातडीने बोलावणे आले म्हणून भर उन्हात डॉ. आयडा गल्ली-बोळ तुडवीत रुग्ण स्त्रीच्या घरी गेल्या. नेहमी आढळणारं दृश्य. आसन्नप्रसवा वेदनांनी तळमळते आहे. आठ दिवस एक न्हावीण तिची सुटका करायला धडपडत होती. अपयश आलं. शेवटचा प्रयत्न म्हणून डॉ. आयडांना बोलावणं आलं. रुग्ण स्त्रीजवळ एक विकेशा वृद्ध स्त्री होती फक्त. प्रसूतीचे काम म्हणजे घाणेरडे अशुद्ध काम. समाजाने अशुभ ठरवलेल्या उपेक्षित विधवेनेच ते करायचे; पण अशा कामासाठी उभ्या असलेल्या त्या विधवेनेही डॉ. आयडांना अस्पृश्य ठरवलं. आपल्या कडक सोवळ्याला, व्रतवैकल्याला आणि नेमधर्माला बाधा न येईल अशा पद्धतीने शिवाशिव पाळत, अंग राखून, डॉक्टरांना हवं-नको पाहात होती.

डॉक्टरांनी पाणी उकळून मागितलं. ती आपली मख्ख उभी राहिली. शेवटी हिच्या नादी कोणी लागा म्हणून, आपणच पाणी उकळून घ्यावं असा विचार करून डॉक्टरांनी तिच्याकडे काडेपेटी मागितली. तीही त्या वृद्धेने लांबून फेकली!

प्रसूतिवेदनांनी हैराण झालेली स्त्री शेणाने सारवलेल्या नुसत्या जमिनीवर तळमळत होती. तिला आराम मिळावा म्हणून डॉक्टरांनी आजूबाजूला थोडी साफसूफ केली. तिच्या अंगाखाली कडक भुईवर जरा नरमसं गवत तरी असावं म्हणून गवत मागितलं तर त्या वृद्धेने मूठभर आणून दिले. आणिक मागितलं तर म्हणाली- 'तेवढं परवडायचं नाही. गाईला कमी पडेल.'

मग कसंबसं गवत आणि फाटके- तुटके कपडे गोळा करून बाळंतिणीची सोय केली. डॉ. आयडांच्या सुदैवाने त्या घरात पुत्ररत्न जन्मले. आनंदीआनंद झाला. मग सगळ्यांनी डॉक्टरांचे परत परत आभार मानले!

□

१९०२ च्या एप्रिल महिन्यात बर्चफील्ड मिलिकेनचे पत्र आले. यापूर्वीही त्याची पत्रं आली होती. मैत्रीची. निरपेक्ष दोस्तीची. निरिच्छ. खरं पाहता ही पत्रं त्यांना कार्यशक्ती देत होती. त्यांच्या प्रेरणांना खतपाणी घालत होती.

या वेळच्या पत्रात मात्र दुःखद बातमी होती. त्याच्या फुफ्फुसाला क्षयाची बाधा झाली होती... त्याचं आयुष्य आता थोडंच उरलं होतं. रोगाच्या पूर्वलक्षणांकडे दुर्लक्ष केल्यानं, तब्येतीची हेळसांड केल्यानं रोग बळावला होता.

पत्र वाचून होताच डॉ. आयडा उत्तर लिहायला बसल्या. स्वत:च्या भावनांचा पडताळा न घेताच, स्वत:ची शहानिशा न करताच त्यांनी पेन हाती घेतलं. आपलं उत्तर त्याच्याकडे पोहोचायला विलंब होऊ नये म्हणून त्यांची घाई चालली होती. लिहून झाल्यावर त्यांनी एकदा वाचून काढलं. वाटलं आपण फारच त्रोटक लिहिलंय. धीराचे सहानुभूतीचे चार शब्द. जे आतून म्हणायचे होते ते कागदावर उतरलेच नव्हते; पण 'ते' तरी नक्की काय? सहानुभूती? सहृदयता? हे तर त्यांचे स्वभावत: गुण. यापेक्षा अधिक काही? अपराधाची भावना? त्यांना स्वत:च्या हृदयाची अधिक जाणीव असती तर कदाचित्-! प्रेम? त्यांना नेमकं काही उमजत नव्हतं. त्यांनी घाईघाईनं पत्र पाकिटात बंद केलं. पोस्टात टाकायला पाठवून दिलं.

आठवडे लोटले

भयानक उष्मा. अति कष्ट. काळज्या. त्यांना विचार करायला फुरसतच मिळत नव्हती. ह्या मिशनऱ्यांना तामीळ भाषेची परीक्षा द्यावी लागे. तो अभ्यासक्रम डॉ. आयडांनी पूर्ण केला.

जुलैत पुन्हा बर्चफील्डचं पत्र आलं.

जणू काही त्याचा पुनर्जन्मच झाला होता. ते पत्र वाचताना डॉक्टरांच्या मनात अनोख्या ऊर्मी दाटून आल्या.

'तुझ्या पत्राचं स्वागत करायला, तो आनंद लुटायला अजून मी जिवंत आहे... तू मला पाहू शकत नाहीस तेच चांगलं. माझा खोकला तुला ऐकवला नसता. हे पत्र तुला दु:खी न करो. मी धीर सोडला नाहीए. हताशही झालेलो नाही. माझा विचार करण्यासाठी फुरसत असेल तर माझ्या चिंतेने तू दु:खी होऊ नकोस. मी तर नेहमी तुझाच विचार करीत असतो. जे जे साध्य करण्याची तुझी इच्छा आहे ते ते सारं तुला लाभो!'

तुला जे जे साध्य करायचे आहे ते ते-?

काय?

तिला चाहणाऱ्या, तिच्यावर प्रेम करणाऱ्या माणसाविषयी प्रेम? दीनदुबळ्या दु:खितांसाठी रुग्णालय? दिवसरात्र पाठीचा कणा पिसून काढणारे कष्ट?

एक बरं होतं- या कामाच्या रगाड्यात हे असे विचार करीत असायला त्यांना उसंतच मिळत नव्हती.

□

दवाखाना उघडून दोन वर्षं झाली होती. त्या १०' x १२' च्या खोलीत दोन वर्षांत त्यांनी पाच हजारांहून अधिक रुग्णांवर औषधोपचार केले!

□□



# सुरुवात



'You are cordially invited to the opening of the Mary Taber Shell Memorial Hospital which will...'

I. S. Scudder, M.D.

•

१६ सप्टेंबर १९०२ रोजी भव्य आणि आनंदमय सोहळा वेलूरकरांच्या डोळ्यांसमोर घडला. पन्नास वर्षांनंतरही हयात असणारे गावकरी या सोहळ्याचे साक्षीदार म्हणून त्याची इत्थंभूत हकीकत सांगत.

केवढा प्रचंड जनसमुदाय जमला होता! ती नवी कोरी लाल विटकरी इमारत. नावीन्यपूर्ण वास्तू. कशी अगदी ऐसपैस. समोर छानपैकी बाग. भव्य मंडप. प्रतिष्ठित पाहुणेमंडळी.

उद्घाटनाचा शानदार भव्य सोहळा पार पडला आणि त्या प्रशस्त रुग्णालयाची सारीच जबाबदारी डॉ. आयडांवर येऊन पडली.

जुन्या मिशनरी बंगल्यापासून हे रुग्णालय मैलभर अंतरावर होते. रुग्णालयाच्या आवारात निवासी डॉक्टरसाठी, दुमजली बंगला बांधला होता. त्यात डॉ. आयडा आईसह येऊन राहिल्या. ॲनी हँकॉक जुन्या मिशनरी बंगल्यातच राहिली. तिची न चुकता रोज एक फेरी व्हायची.

उद्घाटनाच्या दुसऱ्या दिवसापासून रुग्णालयाचे कामकाज सुरू झाले.

नव्या पांढऱ्या लोखंडी खाटा. त्यांच्या त्या तारेच्या स्प्रिंगा. शेजारीच छोटी पांढरी कपाटं. त्यांच्यावर पांढरी स्वच्छ आच्छादनं. या शुभ्रतेचा आणि स्वच्छतेचा धाक पहिल्या-वहिल्या रुग्ण स्त्रियांना फार वाटायचा. जमिनीवर चटई टाकून, पाटाची उशी करून झोपण्यात सारा जन्म गेलेल्यांना त्या उंच अन् गुबगुबीत बिछान्यात झोपण्याची भीती वाटे. किती तरी वेळा डॉक्टरांनी समजावून सांगितले असेल; पण त्यांची पाठ फिरली की या बापड्या चादरी अंथरून खाटेखाली जमिनीवर झोपायच्या. खरी समस्या तर नंतरच निर्माण झाली. रुग्णालयात रुग्ण स्त्रियांची संख्या एवढी वाढली की त्या चाळीस खाटा कमी पडू लागल्या. पुष्कळदा एका खाटेवर दोघींची सोय करावी लागे. एक खाटेवर आणि दुसरी खाटेखालच्या जमिनीवर.

डॉ. लुईसा हार्ट यांनी या महिला रुग्णालयाची योजना आखली होती आणि

राणीपेट सोडून इथंच यायचं योजलं होतं; त्यांनाच प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळं अकस्मात अमेरिकेस जावं लागलं. त्यामुळं सारा भार आला तो आयडांवर. सलोमी हीच काय ती त्यांची मदतगार. बाकी एक बरं होतं, सलोमीही डॉक्टरांकडून समजून घ्यायला नेहमीच उत्सुक असायची.

□

एका सकाळी डॉ. आयडा धावतच आपल्या आईकडे आल्या. आई बंगल्यातल्या ओसरीवर नोकरांना शिधा काढून देत होती.

'आई शक्य नाही मला.'

'काय शक्य नाही?' तांदळाचं माप भरता भरता आईनं विचारलं.

'अग ट्यूमर आहे तो. पोटातला. फारच कठीण, त्यासाठी शस्त्रक्रिया करावी लागेल!'

'मग? जर त्या स्त्रीवर शस्त्रक्रिया होणं आवश्यक असेल तर ती योग्य ठिकाणीच आली आहे, नाही का?'

'पण आई, तुझ्या लक्षात कसं येत नाही? मी आजवर अशी केस हाताळलेली नाही. ही मोठी शस्त्रक्रिया आहे!'

'समजा आहे. पुढं?'

शिकत असताना मोठमोठ्या डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली अशा शस्त्रक्रिया केल्या आहेत तेवढ्याच. नंतर आजवर एकही नाही. समजा, माझ्या हातून काही कमी जास्त घडलं, काही चुकलं-!'

'आणि समज, तिच्यावर शस्त्रक्रिया करण्याचं धाडस असलेली, कुवत असलेली कोणी महिला डॉक्टर उपलब्ध नव्हती म्हणून ती मेली; तर अधिक वाईट नाही का?'

'खरंय!'

डॉ. आयडा रुग्णालयात परतल्या. नेहमीच्या आत्मविश्वासाने, खंबीरपणाने पावलं टाकत परतल्या. त्यांनी आपल्या छोट्या ऑपरेशन रूममध्ये ती शस्त्रक्रिया पार पाडली.

Hysterectomy ची कठीण केस. हाताशी अननुभवी अनेस्थेटिस्ट. मदतीस सलोमी. सुदैवाने सारे सुखरूप पार पडले. तसं झालं नसतं तर डॉक्टरांनी पुन्हा शस्त्र हाती घ्यायचं कधी धाडस केलं असतं की नाही याची शंकाच आहे.

ते वर्ष संपण्यापूर्वी त्यांनी २१ मोठ्या आणि ४२८ किरकोळ शस्त्रक्रिया यशस्वी रीत्या पार पाडल्या. १२,३५९ रुग्णांवर इलाज केले.

न होऊ शकलेल्या शस्त्रक्रियाच अयशस्वी ठरत होत्या.

एकदा एक पाच मुलांची माता आली. सहाव्या खेपी गर्भवती होती. सोबत नवरा आणि इतर कुटुंबीय. मंडळी लांबून आली होती. तातडीच्या ectopic शस्त्रक्रियेने



वाचली असती. स्त्री तयार होती; पण सोबतची माणसं तयार नव्हती. डॉक्टरांनी खूप समजावलं; पण ते ऐकेनात. शेवटी त्या स्त्रीला बैलगाडीत घालून घेऊन ते निघून गेले- आपल्याच हातून जणू तिला मृत्यूच्या स्वाधीन करायला!

पण काही वेळा असेही प्रसंग घडत की, त्यामुळे डॉक्टरांना समाधान मिळे.

एक छोटा छोकरा. उघडावाघडाच. डॉक्टरांच्याकडे आला. म्हणाला, 'माझ्या कानात खडा आहे.'

डॉक्टरांनी तपासलं. खडा मोठा होता. त्याच्या दोस्तानं खेळता खेळता त्याच्या कानात ढकलला होता.

'मी तो खडा काढीन ना त्यावेळी कान जऽऽरा दुखेल, बरं का; पण तू शूर मुलगा आहेस. सहन करणार ना?'

तो छोकरा खरोखरच शहाणा. डॉक्टरांच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहात साऱ्या वेदना त्याने मुकाट्याने सहन केल्या.

दुसऱ्या दिवशी डॉक्टरांच्या झग्याला मागून हळूच झटका बसला. पाहिलं तर तोच शूर मुलगा. सोबतीला दुसरा.

'याच्या पण कानात खडा आहे.'

तो छोटेराव घाबरून गप्प बसला होता. खडा काढून होईपर्यंत सर्जेराव त्याच्या शेजारी उभे राहून धीर देत होते. सांगत होते-

'घाबरू नकोस. बाई तुला अजिबात त्रास देणार नाहीत.'

कानातला खडा काढून झाल्यावर ती उघडी-वाघडी पोरं बाहेर पडली. रुग्णालयाच्या कर्मचाऱ्याला धर्मादाय पेटी कुठे आहे ते विचारलं. प्रत्येकाने एक एक पै त्या पेटीत टाकली. मग गेले!

डॉ. आयडांनी स्त्री-रुग्णांच्या मनात स्वत:विषयी विश्वास निर्माण केला होता. आपल्या आश्वासक स्वभावामुळे, सौम्य वृत्तीमुळे रुग्णांना समजून घेणे आणि समजावून देणे त्यांना सहज शक्य होत असे. रुग्ण स्त्रिया एकमेकींना धीर देताना म्हणत- 'घाबरू नकोस बाई. डॉक्टरीणबाई आपल्या आईसारखी. आपली किती काळजी घेते. आपल्या लेकराला आई कधी तरी दुखवते का?'

□

दुष्काळ सरला. वरुणराजाने कृपा केली. गेल्या दहा वर्षांत पडला नव्हता एवढा पाऊस त्या १९०२ साली पडला; पण हे सुख अल्पजीवी ठरले. १९०३ च्या जानेवारीत दक्षिण हिंदुस्थानात महामारी आली. गाठीचा प्लेग. त्याने यापूर्वीच्या अनेक भीषण संकटांवर ताण केली. १८९९ च्या प्लेगमध्ये जेवढे बळी गेले तेवढे १९०३ च्या जानेवारीत गेले!

पहिला उंदीर पडला आणि लोकांची धावपळ सुरू झाली. तांदूळ, फळं, फुलं, बकरे घेऊन वाजतगाजत निघाले. डॉक्टरांनी एका वयस्काला विचारले-

'कुठं चाललात तुम्ही हे सारं घेऊन?'
'मरीआईला नवस बोलायचा आहे म्हणून या भेटी नेतोय.'
'मग हा बोकड...?'
'देवीपुढे बळी द्यायला.'
'देवीपुढे हिंसा? निषिद्ध नाही का ते?'
'संकटकाळी नाही. मरीआईचाच कोप हा. तिला आधी शांत करायला हवी!'
'पण आता त्याची काय गरज? आम्ही डॉक्टरलोक आहोत ना तुमच्या सेवेला!'
'कोणी काही केलं तरी दैवी कोपापुढं काही इलाज चालत नाही बाई!'

झपाट्यानं लागण वाढत गेली. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणजे डॉ. हाफकिन्च्या लसीमुळे तिला थोडाफार अटकाव करणे शक्य झाले होते. सरकारी पातळीवरून प्लेगचा बंदोबस्त सुरू झाला.

पण या सरकारी बंदोबस्ताचा आम जनतेने धसकाच घेतला होता. लोक घरंदारं सोडून जाऊ लागले. आर्नी, राणीपेट, तिंदीवनम, वेलूर वगैरे गावं ओस पडली. आरोग्याधिकाऱ्यांची धास्ती एवढी पडली होती! त्यात त्यांच्या इंजेक्शनच्या भीतिदायक सुया! प्लेग त्यांना अपरिचित नव्हता. देवी, कॉलरा, प्लेग हे सारे मरीआईचेच कोप. वरून आदर दाखवून पोटात भीतीचा गोळा घेऊन त्यांचं स्वागत करायचं. मरीआईच्या, कालीमातेच्या देवळात पूजा करून त्यांना नैवेद्य दाखवून शांती करायची. त्याला आणि सुया कशाला हव्यात? मग अफवा उठल्या. सरकारला हिंदू माणसं खतम् करायची आहेत म्हणून औषधाच्या नावाखाली सुया मारणार. प्रत्येक मृतामागे डॉक्टरला पैसे मिळणार...

झालं. एका रात्रीत रुग्णालय ओस. सुयांच्या भीतीने भिकारीसुद्धा रुग्णालयात फिरकेनात.

पण म्हणून आयडाचं काम कमी झालं का? वेलूर म्युनिसिपल बोर्डाचा चेअरमन एक तरुण मिशनरीच होता. त्याच्या बरोबरीने डॉ. आयडा रात्रंदिवस खपत होत्या. घरोघर जायच्या. प्रतिबंधक लस टोचायच्या. स्वच्छतेचे, आरोग्याचे महत्त्व पटवून देत रहायच्या. पाठीचा कणा मोडणारं आणि कोणाच्याही आभारावाचून न खोळंबणारं हे काम. लोक लस टोचून घ्यायला विरोध करायचे. घर निर्जंतुक करण्यासाठी औषध फवारताना ते विस्कळीत करणाऱ्या अधिकाऱ्यांना ते विरोध करायचे. लागण लागलेल्या आपल्या नातेवाईकास दडवायचे. या घरातून त्या घरात नेऊन लपवायचे. गावाबाहेर उभारलेल्या खास छावणीत जायला ते तयार नसत.

मृत्यूने कब्जा घेतलेल्या त्या गावात हे दोघे मिशनरी दिवसच्या दिवस पायपीट करत राहिले. रस्ते तर ओसच पडले होते. क्वचित कोणी लस टोचून घ्यायला यायचा किंवा घरातील आजाऱ्याला बघायला विनवायचा. लागण लागलेल्या घराचा ताबा सरकारी आरोग्याधिकारी घ्यायचे. तोंडावर संरक्षक मुखवटे चढवून, उंच रबरी बूट घालून ते यायचे. मृताला हलवायचे. जिवंत असतील त्यांची पाठवणी दूरच्या



छावणीत करायचे. घरं रिकामी करून जमीन उखळून राब करायचे. कौलं उतरवून जंतुनाशके फवारायचे.

रुग्णालयाच्या आवारात दोन उंदीर पडले तेव्हा डॉक्टरांनी नोकरांच्या खोल्या रिकाम्या करून निर्जंतुक करून घेतल्या. स्वत:ची दैनंदिनी बदलली नाही. मरणाच्या खाईत पायपीट करीत राहिल्या.

तीन आठवडेपर्यंत प्लेगचा फार जोर होता. वेलुरात रोज सरासरीने १७ मृत्यू व्हायचे. साथ संपेपर्यंत एकूण ४००. एप्रिलमध्ये साथीने उसंत घेतली. आपला मोहरा दुसऱ्या प्रदेशाकडे फिरवला.

□

डॉ. आयडांनी बर्चफील्डला प्लेगच्या साथीविषयी, त्या भीषण दिवसांविषयी लिहायचं टाळलं होतं. त्याचाच आजार त्याला भारी होता. मोठ्या धीराने तो सारे सहन करीत होता; पण आता कंटाळला होता. आयुष्यासाठी आता त्याची धडपड नव्हती. जोपर्यंत जिवात जीव आहे तोपर्यंत जगण्यासाठी काही तरी कारण असावं यासाठीच तो धडपडत होता. आपण त्याची केलेली उपेक्षा डॉक्टरांच्या मनाला बोचत होती. त्यांनी त्याला मोठं पत्र लिहिलं. प्लेगच्या साथीचं आणि आपण त्या वेळी घेतलेल्या श्रमाचं वगळून बाकी लिहिलं. आपण बांधून घेतलेला पोहण्याचा बंदिस्त तलाव, त्याला पाणी पुरवणारी बैलांची मोट, इंग्लिश क्लबच्या टेनिस स्पर्धांतील आपले विजय, नवीन मदतनीस इत्यादी.

सौ. ज्ञानाम्मल ही डॉक्टरांची नवीन कंपौंडर. प्रशिक्षित. तीन पिढ्यांपूर्वी हिचे पूर्वज धर्मांतरीत ख्रिश्चन झाले. ही बाई कामसू आणि बुद्धिमान, हरकामात तरबेज. हीच नंतर डॉक्टरांची विश्वासू बनली. डॉक्टरांसोबत पुढे अर्धे शतक काम केले.

तशीच ती ज्ञानसुंदरम्. प्रशिक्षित परिचारिका. डॉ. आयडांच्या कसोट्यांना काटेकोरपणे उतरली.

मेरी आयझॅक हेन्री, इव्हँजेलिस्ट. रुग्णालयाची मेट्रन. काही मुलींना साधी साधी कामे शिकवून तयार करीत होती. सोफिया स्कडर तर आपल्या मुलीच्या मदतीला सदैव तयार असे. डॉ. आयडा हळूहळू आपल्या भोवती कुशल सहकारी तयार करत होत्या.

आणि तरीही कामाच्या व्यापातून सुटका होत नव्हती.

पूर्वी कडक उन्हाळ्याचे जे दोन महिने आयडा आपल्या आईसोबत थंड हवेच्या ठिकाणी घालवत ती सुट्टीसुद्धा त्यांना त्या वर्षी म्हणजे १९०३ च्या उन्हाळ्यात रुग्णालयाच्या व्यापापायी घेता आली नाही. दूरवरच्या खेड्यांतून अधिकाधिक रुग्ण स्त्रिया औषधोपचारासाठी येऊ लागल्या. रुग्णालयातील गर्दीला खळ नव्हता. रुग्णालयात फेरी टाकायला निघण्यापूर्वी रोज त्यांना जवळजवळ दीडशे रुग्ण तपासावे लागत. शिवाय शस्त्रक्रिया-व्हिजिट्स.

या असह्य उकाड्यात सुखाचे, विसाव्याचे क्षण असत ते ॲनी हँकॉकच्या सहवासाचे. बंदिस्त तलावात पोहोण्याचे. ॲनीही सुट्टी न घेता त्या वर्षी डॉक्टरांच्या सोबतीसाठी वेलूरलाच राहिली होती.

डॉक्टरांचं आयुष्य घड्याळ्याच्या काट्याला बांधलं गेलं होतं. दुसऱ्या दिवशी पहाटे शस्त्रक्रिया असेल तर आदल्या रात्री कापूस निर्जंतुक करून ठेवावा लागे. हे काम करणारी मदतनीस कितीही विश्वासू असली तरी डॉक्टर रात्रीतून अनेकदा उठायच्या. स्टरलायझरखालचा स्टोव्ह पेटता आहे की नाही याची खात्री करून घ्यायच्या. वर पुन्हा, रात्री कोणा गरजूला मदत लागली, कोणी हाकारलं तर त्यांना उठवलंच पाहिजे ही त्यांची सर्वांना सक्त ताकीद होती. मग प्रहर कोणताही असो. 'डॉक्टरीणबाई' 'डॉक्टर अम्मल' अशी हलक्या आवाजातील सादही त्यांची झोप उडवी.

काही स्त्री-रुग्णांना तर, जे काम एखादी परिचारिका सहज करू शकेल अशा कामासाठी ही डॉक्टरीणबाईच हव्या असायच्या. त्यांचा हातगुण चांगला म्हणून हटून बसायच्या. तासन्तास खोळंबून राहणाऱ्या अशा स्त्रियांना नाराज करणे डॉक्टरांना जमत नसे.

□

२१ सप्टेंबर १९०३ या दिवशी 'मेरी टॅबर-शेल' रुग्णालयात एक मुस्लिम स्त्री प्रसूत झाली. नवजात तान्हुली जरा अशक्तच होती. डॉ. आयडांनी जातीनं तिची शुश्रूषा केली. धोका टळल्यावर त्यांनी त्या बालिकेला मातेच्या स्वाधीन केलं. त्या मुस्लिम स्त्रीच्या सोबत तिची आई व बहीणही होती. प्रसूत स्त्रीखेरीज इतरेजन या नवजात बालिकेवर नाखूष होते. कारण एक तर ती मुलगी. त्यात पुन्हा कु-मुहूर्तावर जन्मलेली. डॉक्टरांना मात्र वाटायचं, थोडे दिवस गेले की ही छोकरी सर्वांना लळा लावेल. आपल्यावरचा रोष विसरायला लावेल.

डॉ. आयडा नेहमीप्रमाणे दवाखान्यात आपले रुग्ण तपासत बसल्या होत्या. का कोण जाणे एकाएकी त्यांना वाटलं, एकदा जाऊन त्या तान्हुलीला पहावं. त्यांनी आपल्या हातातलं काम थांबवलं. ती मुस्लिम स्त्री ठेवली होती त्या कक्षात त्या गेल्या. हा कक्ष होता तो पैसे भरून येणाऱ्या स्त्रियांसाठी. कक्षाच्या कोपऱ्यात पडदे लावून त्या मुस्लिम स्त्रीसाठी आडोसा केला होता. त्या कोपऱ्याकडे डॉक्टरांची नजर गेली. पडद्यामागं शांत होतं, फारच शांत. डॉक्टरांनी त्या कोपऱ्याकडे धाव घेतली. 'नाही! नाही!' असं ओरडत त्यांनी तान्हुलीच्या आजीला आणि मावशीला बाजूला ढकललं. एकीच्या हातात उशी होती. ती त्यांनी काढून घेतली. दूर फेकली. खाटेवर जिथे ती उशी त्या दोघी दाबत होत्या तिथे ती तान्हुली घुसमटून काळीनिळी होऊन पडलेली होती!

काही क्षणांचा उशीर झाला असता तर?



डॉक्टरांनी तिच्यावर तातडीने इलाज केले. सारं वातावरण नीरव, नि:शब्द झालं होतं.

तान्हीने अस्फुट किंकाळी फोडली. मग चांगलीच रडू लागली. डॉ. आयडांनी सुटकेचा श्वास सोडला.

त्या छोटीला छातीशी धरून जोजावत डॉ. आयडांनी त्या मुसमुसणाऱ्या मातेकडे आणि तिच्या त्या दोघी सोबतिणींकडे रागाने पाहिले. म्हणाल्या- 'खुनी कुठच्या! कसं धाडस करवतं तुम्हाला? इतकं छान लेकरू!'

'छी! मेलं असतं तर बरं. कु-मुहूर्तावर जन्मलंय!' मावशीबाई धुसफुसली.

'काय वेड्यासारखं बरळतेयस ग तू!' आजीबाई मोठ्या धूर्तपणे म्हणाल्या, 'डॉक्टर, पोरीनं माया लावली आहे नं? ती मरायला नको आहे नं? छान. मग घ्या की ती तुम्हालाच ठेवून!'

'पण मी असं कुठे म्हणतेय?'

'आवडलीय ना तुम्हाला? मग ठेवा तुम्हालाच!' तान्हीच्या मावशीने पेच मारला.

डॉ. आयडांनी तान्हुलीच्या आईकडे पाहिले. तिची नजर त्यांना मूकपणे विनवीत होती, 'खरंच हिला तुम्ही ठेवून घ्या, नाही तर-!'

डॉक्टरांनी ओठ घट्ट मिटून घेतले. क्षणार्धात निर्णय घेतला.

'ठीक आहे. ठेवून घेते मी हिला!'

तान्हुलीला छातीशी धरून डॉक्टर आपल्या बंगल्यात आल्या. व्हरांड्यात आई बसलेली होती. तिला मोजक्या शब्दांत सारी हकिकत सांगितली. तान्हुलीला तिच्या स्वाधीन केले.

'ही आता आपली झाली... पण आता हिचं काय करायचं ग आई?'

अवांछित म्हणून टाकून दिलेल्या अशा अनपेक्षित गाठोड्याचं काय करायचं असतं ते सोफिया स्कडरला आजवरच्या अनुभवातून माहीत होतं. अशी अनेक गाठोडी तिने जवळ केली होती. त्यांचं पालन-पोषण केलं होतं. ती शांतपणे म्हणाली- 'आधी हिला खाऊ-पिऊ घालायचं. मग बाकीचं; पण काय ग आयडा, हिला हाक कोणत्या नावानं मारायची?'

'बघ! मी कसलाच विचार केला नाही, आता ते काम तुझं. या पन्नास मैलांच्या परिसरात किती तरी ख्रिश्चन मुलांचं नामकरण केलं आहेस तू!'

'हं!' सोफिया स्कडरने क्षणभर विचार केला, 'हे मेरी टॅबर- शेल रुग्णालय हीच तिची माता, हिला आपण मेरी टॅबर म्हणू या!'

काही महिन्यानंतर हिंदुस्थाननिवासी स्कडर मंडळींच्या उपस्थितीत त्या छोकरीला बाप्तिस्मा मिळाला- 'मेरी टॅबर!'

मेरी टॅबर दिसामासांनी वाढू लागली. हसू-खेळू लागली. थोडी मोठी झाल्यावर डॉक्टर तिला एखाद्या हिंदी स्त्रीप्रमाणे कडेवर घेऊन रुग्णालयात, दवाखान्यात फिरत. 'माझी छोकरी' म्हणून ओळख करून देत. एकदा अशा अवतारात त्यांचा

कोणी फोटो काढला; तो त्यांनी बर्चफील्डला पाठवून दिला.

□

डॉक्टर शस्त्रक्रिया करण्यासाठी निघाल्या होत्या. तेवढ्यात नोकराने नुकत्याच आलेल्या डाकेचं पत्र त्यांच्या हाती दिलं 'ते' हस्ताक्षर पाहून त्या जागच्या जागी खिळल्या. ओळखीच्या हस्ताक्षरातील पत्ता; पण त्याने त्यांच्या काळजात कळ उठवली. काही आठवड्यांपूर्वीच बर्चफील्ड वारल्याची तार त्यांना आली होती आणि आता त्याने लिहिलेले अखेरचे पत्र त्यांच्या हाती येत होते.

ते पत्र उघडून वाचण्याचा धीर त्यांना होईना. ते उघडलं असतं तर त्यांना त्याचा आवाज ऐकू आला असता आणि मग-

नाही. त्यांनी ते पत्र उघडलं नाही. तसंच झग्याच्या खिशात सरकवलं. शस्त्रक्रियागृहात गेल्या. सलोमीला हाताशी घेऊन शस्त्रक्रिया पार पडली. आजची केस जरा किचकटच होती; पण नेहमीच्या धीम्या अन् शांत वृत्तीने पार पाडून त्या मग दवाखान्यात गेल्या.

तिथं रुग्णांची रीघ नेहमीपेक्षा जरा कमीच होती. नाही म्हटलं, तरी दवाखान्याची फी तीन पैवरून आठ आण्यांवर नेल्यावर रुग्णांची संख्या घटलीच होती. आज तर बरीच कमी होती; पण त्याला कारण वेगळं होतं. गावात एक स्वामी आले होते. त्यांच्याकडे मानवी दु:खहरण करण्याची शक्ती आहे असा गवगवा त्यांनी केला होता. विशेष म्हणजे ते स्वामी स्वत: कुष्ठरोगपीडित होते.

दवाखान्यातील काम भराभर उरकून सावकाशीने पत्र वाचू म्हणून त्या रुग्ण तपासू लागल्या.

एक स्त्री आपल्या वर्षाच्या मुलाला घेऊन आली होती. त्याच्या पायाला भलं मोठं गळू झालेलं. ते पाहून डॉक्टर शहारल्याच.

म्हणाल्या-

'काय ग बाई, आधीच का नाही आणलंस लेकराला?'

'काय सांगू? कसं आणणार? नाही जमलं....'

'पण का?' डॉक्टरांनी चढ्या आवाजात विचारलं. कारण त्यांना माहीत होतं. त्या हळव्या आवाजात बोलल्या असत्या तर त्यांना रडूच फुटलं असतं.

'कसं सांगू? सगळे म्हणाले देवाचीच करणी ती. त्याला मी काही हात लावू नये. दुसऱ्या कोणाला हात लावू देऊ नये.'

न बोलता डॉक्टर त्या मुलाला घेऊन शस्त्रक्रियागृहात गेल्या. गळू कापल्यावर त्यांच्या नजरेस जे पडले ते अनपेक्षित नव्हतेच. हाडसुद्धा सडून गेलं होतं. मूल जगायची आशा नव्हती. अज्ञानानं आपली वसुली केली होती.

दवाखाना बंद करून निघायला संध्याकाळचे पाच वाजले. अजूनही पत्र उघडून वाचायला हवा तो निवांतपणा मिळाला नव्हता. रुग्णालयातील फेरी बाकी होतीच.



फेरी झाल्यावर जेवणाची वेळ होईपर्यंत मध्ये तासभर अवसर होता; पण ही शेवटची 'भेट' त्यांना अशी घाईगर्दीत उरकायची नव्हती म्हणून त्या रुग्णालयाच्या बागेत गेल्या. गुलाबाचे ताटवे छान सजले होते. एक पूर्णपणे उमललेला सुरेखसा गुलाब त्यांनी अलगद खुडला. आपल्या खोलीत नेऊन टेबलावरच्या पुष्पपात्रात ठेवला.

रात्रीची जेवणं झाली. नंतरची नेहमीची प्रार्थना झाली. रुग्णालयात शेवटची फेरी टाकून डॉक्टर सरळ आपल्या खोलीत परतल्या. दिवा लावला. दरवाजा बंद केला. खिशातलं पत्रं काढून टेबलावर ठेवलं.

कपाटातून एक छोटीशी पेटी काढली. तिचं कुलूप उघडलं. आतली सारी पत्रं काढली. तारीखवार लावून ठेवलेली बर्चफील्डची पत्रं.

एक एक करून क्रमानं सारी वाचून काढली.

तार वाचली.

टेबलावर आज हाती आलेलं पत्र होतं. त्याच्या शेजारी पुष्पपात्रात गुलाब. डॉक्टर त्या दोन्हींकडे पाहात राहिल्या.

ते पाकीट त्यांनी उघडलं. बर्चफील्डचं शेवटचं पत्रं. शांतपणे त्यांनी ते वाचलं.

आणि शेवटी, तार आल्यापासून प्रथमच डॉ. आयडा मनसोक्त रडल्या.

□□

# ताशेच ताशे



गेल्या दोन वर्षांत रुग्णालयानं चांगलंच बाळसं धरलं होतं. डॉ. लुईसा हार्ट आपल्या बहिणीला- लिलियन हार्टला- घेऊन अमेरिकेहून परतल्या होत्या. लिलियन हार्ट ही प्रशिक्षित परिचारिका होती. दोघी मेरी टॅबर-शेल रुग्णालयात दाखल झाल्या तरी सातत्याने वाढणाऱ्या रांगांना पुरे पडण्यासाठी कमीत कमी पाच महिला डॉक्टर्स तरी हव्या होत्या; पण ते सारे काम डॉ. आयडा व डॉ. हार्ट या दोघींनाच पहावे लागे. रुग्णालयाचा लौकिक वाढत होता. पन्नास मैलांच्या परिसरातील स्त्री-रुग्ण इथंच यायचे. १९०६ या एका वर्षात ८०० स्त्री-रुग्ण शेल रुग्णालयात दाखल झाले. बाह्य रुग्ण विभागाची नोंद ३०,००० वर गेली.

परिचारिकांची संख्या ११ आणि कंपौंडर्सची २ झाली होती. तरुण हिंदी स्त्रियांना शिकवून तयार करीपर्यंत डॉ. आयडांनी इतर मिशनरी रुग्णालयांतून, सरकारी रुग्णालयांतून जमतील तया प्रशिक्षित परिचारिका बोलावून रुग्णालय चालवले. लिलियन हार्ट ही प्रमुख परिचारिका. त्यामुळे तिच्या खात्यावर काम भरपूर. त्यातून पुन्हा तिने परिचारिकांसाठी शिक्षण देणारे वर्ग सुरू केले. उष्ण कटिबंधातील आजारांइतकेच तिला इथले वातावरण आणि समाजजीवन अपरिचित, पण बाईची जिद्द मोठी. नेटाने आपले काम चालू ठेवले.

हिंदुस्थानात केवळ परिचारिका बनून येण्याने भागण्यासारखे नव्हते. इथल्या काही मुलींना प्रशिक्षण देऊन तयार करणे आवश्यक होते. परिचारिकेच्या खास जबाबदाऱ्या अंगवळणी पाडणं ही एक विशेष कामगिरी होती. रुग्णालयीन स्वच्छतेच्या आणि शिस्तीच्या सवयी इथं रुजवणं हेही एक कठीण कर्म. इथे रुग्ण- स्त्रिया पान खाऊन त्याची पिंक भिंतीवर किंवा सरळ फरशीवर मारणार. काथ-चुन्यानं खराब झालेली बोटं चादरी-भिंतींना पुसणार. बिछान्यावरील चादर लपेटून अनवाणी पायाने फिरणार. परत बिछान्यावर येताना पाय स्वच्छ करण्याची काळजी घेणार नाहीत. फळांची सालं, बिया आणि इतर कचरा पलंगाखाली जमिनीवर फेकणार. बसतील तिथेच खाकरून थुंकतील. रुग्ण-स्त्रीची नातेवाईक गरजेनुसार सोबतीसाठी रुग्णालयात राहायची. (जातीनुसार बदलणाऱ्या आहाराच्या कटकटी टाळण्यासाठी अशी परवानगी द्यावी लागे.) या सोबतिणी रुग्णांचे बिछाने सरळ तुडवत. त्यांचे भोजन बिछान्यावरच चाले. पुन्हा ती खरकटी भांडी तशीच बिछान्यावर पडून असत. असे करू नका असे सांगायला परिचारिका गेली तर तिच्यावरच खार खायच्या तो वेगळाच.



अध्यापनाच्या कामातही लिलियनला सुरळीतपणे काही करायला मिळणे कठीण व्हायचे. कारण ज्या विद्यार्थिनींना स्वच्छतेचे बाळकडू मिळालेले नसे, त्यांच्या सवयी जाता जाता नसत. निर्जंतुक करून ठेवलेल्या शस्त्रांना कसे हाताळावे हे त्यांना वारंवार सांगूनही जमत नसे. त्यातून बहुतेकींना उजवाच हात वापरायची सवय अडचणीत आणायची. शस्त्रक्रिया चालू असताना दोन्ही हातांनी शस्त्र कशी पुरवावीत हे शिकविण्यात बराच वेळ जायचा.

प्रत्येक रुग्ण-स्त्रीची नोंद करताना तिला स्वतंत्र क्रमांक दिलेला असायचा; पण अडाणी स्त्रियांना त्याचे काय? कोणताही क्रमांक पुकारला तरी तिघी-चौघी पुढे यायच्या. त्यांच्याबरोबर सोबत आलेल्या सख्याही. याहीपेक्षा अधिक म्हणजे एखादी गोषावाली मुस्लिम स्त्री आली की डॉक्टरना कन्सलटिंग रूम सोडून बाहेर यावं लागायचं. त्या पडदे लावलेल्या गाडीमागे जायचं. मग सोबत आलेले सर्व पुरुष नातेवाईक दूर गेले की पडद्याच्या आत डोकं घालायचं. तिथे आणखी दोघी-तिघी सोबतिणी दाटीवाटीने बसलेल्या असायच्या. त्या तशा अडचणीत आणि अंधुक अपुऱ्या प्रकाशात रुग्ण-स्त्री तपासायची. सकाळच्या घाईगर्दीत तर डॉक्टरांची धांदल विचारायला नको. तपासून, औषध घेऊन बाहेर पडलेल्या बिचारीला तेवढ्यानं समाधान व्हायचं नाही. ती पुन्हा माघारी यायची. विसरलेल्या शंकांचं निरसन करून घ्यायची. सर्व सूचना पहिल्यापासून समजावून घ्यायची.

'आम्ही पडलो बायका. आम्हाला सारं कसं जमणार? आणि ध्यानी तरी कसं राहणार? तुम्ही जरा आमच्या पुरुषमाणसांना समजावून द्या बरं का' हे आणि वर.

ह्या रुग्ण- स्त्रियांची कृतज्ञता व्यक्त करण्याची पद्धत हृद्य असली तरी वेळ खाणारी असायची. श्रीमंत स्त्रिया- विशेषत: मुस्लिम-रुग्णालय सोडून जाताना हार-तुरे काय द्यायच्या, मेवा-मिठाई काय वाटायच्या. छोटी मेरी टॅबर हे हार-तुरे, मेवा-मिठाई रुग्णालयभर वाटण्याचे काम मोठ्या हौसेने करी. विशेषत: आयडामावशीने लहान मुलांसाठी आणलेली चित्रं आणि खेळणी बाल-विभागात वाटण्याचे काम हिच्या फार आवडीचे.

ह्या झाल्या किरकोळ गोष्टी.

डॉक्टर आयडांना खरा त्रास, खरा मनस्ताप व्हायचा तो सामाजिक दुखण्यांचा. बाल-विवाह, बालमाता, अशिक्षित दाया, देवदासीपद्धती अशा खोलवर चरत गेलेल्या जखमांचा.

त्या लक्ष्मी देवदासीच्या कहाणीने डॉ. आयडांच्या मनाला असंच दु:खी करून सोडलं होतं–

तेरा वर्षांची किशोरी. तिच्या देवभक्त आई-वडिलांनी तिच्या बालपणीच तिला देवाला वाहिली होती. वयाच्या पंधराव्या वर्षी तिला रुग्णालयात दाखल व्हावं लागलं होतं. कारण तिला गुप्तरोगाचा संसर्ग झाला होता.

आपल्या अदबशीर अन् मोहक वागण्याने तिने डॉक्टर्स आणि परिचारिकांना

आपलंसं केलं होतं. ख्रिश्चानिटीच्या तत्त्वांनी, शुभसंदेशांनी ती भारावली होती. ख्रिश्चन धर्म तिने मनोमन स्वीकारला होता. तिला आता धर्मांतर करून घ्यायचे होते.

डॉ. आयडा मद्रासला गेल्या. वकिलाचा सल्ला घेतला. लक्ष्मी सज्ञान नसल्याने एवढ्यात धर्मातरास परवानगी देऊ नये असा वकिलांनी सल्ला दिला.

एके दिवशी सकाळी लक्ष्मी डॉ. आयडांबरोबर रुग्णालयात फिरत होती. एकाएकी लक्ष्मीचा चेहरा भीतीने काळवंडला. तिने डॉक्टरांचा हात घट्ट पकडला. 'डॉक्टर', लक्ष्मी खोल आवाजात कुजबुजली, 'ती बया आलीच पहा. देवळातली बाई. ती नक्कीच न्यायला आलीय मला. मला नेऊ देऊ नका हो!'

खरोखरच ती स्त्री लक्ष्मीला न्यायला आली होती. देवळातील मुख्य नर्तकी होती ती. डॉक्टरांनी तिचे मन वळवायचा खूप प्रयत्न केला. यश आले नाही. लक्ष्मी सज्ञान होईपर्यंत तरी देवळाच्याच अखत्यारीत असणार होती. आता नव्यानं लाभलेलं आरोग्य आणि तारुण्यसुलभ सौंदर्य यामुळे लक्ष्मीचं देवळातलं देवदासी म्हणून मोल वाढलं होतं.

डॉ. आयडांनी लक्ष्मीला एकवार छातीशी कवटाळून तिचा निरोप घेतला. डॉक्टरांच्या प्रदीर्घ आयुष्यातील सर्वांत दुर्दैवी प्रसंग हा!

नंतर कित्येक महिने डॉक्टरांनी लक्ष्मीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. अखेरीस एक दिवस एका देवदासीनेच डॉक्टरांना बातमी दिली- लक्ष्मीने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली!

□

हिंदुस्थानातील तरुण विवाहित स्त्रियांचं डॉक्टरना नेहमीच आश्चर्य वाटे आणि खेदही. हिंदी स्त्री ही केवळ पुरुषाची दासी. पती हाच तिचा परमेश्वर. सीता-सावित्रीचे धडे गिरवत ही उभं आयुष्य घालवणार. नवऱ्यापलीकडे कसला विचारच नाही. स्वतंत्र व्यक्तिमत्त्व तर नाहीच नाही. इति कर्तव्य एकच- नवऱ्याला जपणं, त्याच्या मुलांना जन्म देणं. हे नाही साधलं तर परित्यक्तेचं जिणं आहेच नशिबी. एकदा मुलाला जन्म दिला की नवऱ्याबरोबर वंशाच्या दिव्याची सेवा आलीच. वैधव्य आलं तर पुनर्विवाह वगैरे नाही. सासूच्या हाताखाली मोलकरीण बनून जगायचं. जर नशिबाने सासरी वडीलधारं पद पदरी आलं असेल तरच तिच्या मताला काही किंमत असायची. मग तीही प्रमाणिकपणे कुटुंबप्रमुख या नात्याने तीच परंपरा पुढे चालू ठेवायची.

आणखी एक सलणारी गोष्ट म्हणजे बालविवाह. या बालविवाहाबाबत येथील लोकांना काहीच गैर वाटत नसे. पुष्कळदा बालविवाहांचं स्वरूप साखरपुडा झाला एवढेच असे; परंतु या साखरपुड्यांना प्रत्यक्ष विवाहाइतकेच महत्त्व होते. त्यामुळे साखरपुडा झालेला नवरदेव दुर्दैवाने विवाहापूर्वीच वारला तर त्या वाग्दत्त वधूला उभा जन्म वैधव्यात काढावा लागे. बालविवाहामुळे मुलीच्या अंगावर मातृत्वाची



जबाबदारी फार लवकर पडे. मातेची कर्तव्ये, बालसंगोपन योग्य रीतीने पार पडायचे नाही. त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण अधिक असायचे.

या सर्व रूढीविरुद्ध करवादत न बसता डॉक्टर आपल्या परीने त्यावर उपाय शोधीत. बालमातांचे आयुष्य कसे वाचवता येईल, बालमृत्यू कसे टाळता येतील ह्या दृष्टीने प्रयत्न करीत. त्यामुळे कोणतीही वेळ असो, बोलावणे आले की त्या तातडीने निघायच्या. पण बहुधा त्यांना बोलावणे जायचे ते बाळंतीण अखेरच्या घटका मोजत असतानाच. अडाणी सुइणीचे सर्व उपाय थकल्यावर. या अडाणी दायांनी केलेल्या उपाययोजनेमागे हेतू कितीही उदात्त असला तरी कित्येकदा ती योजना प्राणघातक ठरायची.

उदाहरणार्थ- एक बालमाता. सहा दिवस प्रसववेदना सहन करत होती. सुटका होईना. मग सुइणीने उपाय केला. तिच्या पोटावर फळी ठेवून दोन्ही बाजूंनी दोन स्त्रियांना जोर द्यायला लावला.

दुसरी एक स्त्री. सुलभ रीतीने प्रसूत होऊन मोकळी होण्याच्या अवस्थेत होती; पण वेळ होती अशुभ. नेमक्या अशा कुमुहूर्तावर बालक जन्माला येऊ नये म्हणून सुइणीने मातेच्या घोट्यांना दोर बांधून तो वर आढ्याला अडकवून प्रसूतिसमय लांबवण्याचा प्रयत्न केला. त्या बालकाने शुभाशुभ काल पाहिलाच नाही. बाळ-बाळंतीण दोघंही प्राणास मुकले.

हे असले प्रकार अज्ञानातून जन्म घ्यायचे; पण नेहमीच असे घडत नसे. कित्येक सुइणी या कामात निष्णात असत. त्यांच्यामागे पिढीजात अनुभवांची परंपराही असे.

विटाळाच्या भ्रामक कल्पनेमुळे बाळंतिणीची खोली ही उपेक्षित असायची. स्वच्छतेकडे फार दुर्लक्ष व्हायचं. (फार पूर्वी बाळंतिणीची खोली ही इतर संसर्गापासून मातेचे व नवजात बालकाचे संरक्षण व्हावे म्हणून आरोग्याच्या दृष्टिकोनातून अलग राखली गेली; पण नंतर मात्र सुवेर, विटाळ वगैरे कल्पनांमुळे उपेक्षित म्हणून अस्वच्छ झाली असावी. -ले) प्रसूतीनंतर तीन दिवस बाईला पाणी पिऊ देत नसत. नाळ तोडण्यासाठी विचित्र आणि घातक पद्धतींचा वापर व्हायचा. हे अज्ञान फार महागात पडायचं. हे पाहून डॉक्टरांच्या मनाला फार क्लेश व्हायचे.

अशीच एक सकाळ.

रोजच्या ठराविक वेळी डॉक्टर आयडा रुग्णालयात फेरी टाकण्यासाठी गेल्या. आदल्या दिवशी मध्यरात्रीपर्यंत ज्या रुग्ण-स्त्रीपाशी त्या बसून होत्या तिची प्रथम चौकशी केली. रुग्ण स्त्री जिवंत होती; पण कमालीची थकली होती.

ही रुग्ण होती तीन दिवसांपूर्वीच प्रसूत झालेली स्त्री. तापाने नुसती फणफणली होती. रुग्णालय केवळ हाकेच्या अंतरावर असूनही घरच्या लोकांनी सुइणीची मदत घेऊन तिची सुटका केली. प्रसूत झालेल्या स्त्रीला एकाएकी ताप चढला तेव्हा घरच्यांनी तिला रुग्णालयात दाखल केले. तिला वाचवण्याचे डॉक्टरांनी खूप प्रयत्न केले. मग शेवटी काल त्यांनी तिच्या नातेवाईकांना कळवलं की तिची इच्छा असेल

तर शेवटचा श्वास सोडायला तिला घरी न्या. ती काही वाचत नाही. पण त्या आसन्नमरण स्त्रीने डॉक्टरांना जवळ बोलावून सांगितलं की आपल्याला रुग्णालयातच राहू द्या. डॉक्टरांनी ते मान्य केलं. कालची रात्र तिने काढली. कदाचित आता ही जगेल अशी आशा करून मध्यरात्रीनंतर डॉक्टर विश्रांती घेण्यासाठी उठल्या. तिचीच आज प्रथम त्या चौकशी करत होत्या.

'ठीक आहेस ना?'

'तुम्हाला काय वाटलं डॉक्टर, की कालच मी मरणार. नशिबाने आजचा दिवस दाखवला. मी तर मरणारच आहे; पण त्यासाठी मला घरी धाडू नका, इथंच सारं संपू दे!'

'बरं बरं, राहा हं.'

'माझ्या अखेरच्या क्षणी तुम्ही जवळ असावं ही माझी शेवटची इच्छा आहे. या मुलाला जन्म देताना किती यातना झाल्या मला! किती विनवलं मी घरच्यांना मला दवाखान्यात न्या म्हणून; पण कोणी ऐकलंच नाही. आता मी तिथं परतणार नाही.' 'ठीक! ठीक!' तिला आश्वासन देऊन डॉक्टर वळल्या तेव्हा मात्र त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू मावळून त्या जागी उद्‌विग्नता आली होती. या स्त्रीला वाचवणं किती सहज शक्य होतं. केवळ एका हाकेच्या अंतरावर रुग्णालय. बस! तरीही?

दुपारी दवाखान्यातील काम उरकून डॉक्टर जेवायला निघणार तोच प्रसूतिविभागातून त्यांना तातडीचे बोलवणे आले. ती रुग्ण-स्त्री पाहताच सकाळच्या उद्‌विग्नतेला आणखी एक वळसा बसला. रुग्ण होती एक किशोरवयीन ब्राह्मणकन्या. बारा-तेरा वर्षांची. प्रसववेदनांनी तडफडत होती. त्या इवल्या देहाच्या यातना कमी करण्यासाठी डॉक्टरांनी सतत तीन तास जिवापाड मेहनत घेतली. तो कोवळा देह त्यांनी वाचवला; पण शिकस्त करूनही मूल वाचले नाही.

सोफियाआईने डॉक्टरांची वाट बघून शेवटी रुग्णालयातच दुपारचं जेवण धाडलं; पण डॉक्टरांची अन्नावरची वासनाच उडाली. जेवण तसंच परत पाठवलं. रुग्णतपासणीची दुपारची वेळ झाली होतीच. सरळ त्या आपल्या कामाला लागल्या.

सारा वेळ डॉक्टरांच्या मस्तकात विचारांचं काहूर माजलं होतं. मेंदूला जसा भुंगा पोखरत होता. इंजेक्शन देताना, ड्रेसिंग करताना, डोळे साफ करताना, गळवं कापताना सारखा एकच विचार- हे चित्र कसं बदलावं? काय करावं? परदेशी डॉक्टर्स किंवा परिचारिका हे चित्र बदलू शकत नाहीत. यांनी स्वत:च स्वत:ला वाचवलं पाहिजे. यांचे पुरुष यांच्यासाठी काही करत नाहीत. या स्त्रियांनीच काही तरी केलं पाहिजे. पण काय? कसं?

डॉक्टरांच्या मस्तकात ताशे वाजत होते, लग्नाचे ताशे, मुलीबाळींचं पोरपण हिरावणारे ताशे. प्लेग, पटकी, देवी यांच्या देवतांना चटकन् घाबरवण्यासाठी ताशे आणि शेवटी प्रेतयात्रेसाठीही ताशेच.

ताशेच ताशे.



'ती ताप चढलेली बाळंतीण-' सलोमीने घाईघाईने येऊन सांगितले.

डॉक्टर त्या अर्ध्या वाक्यानेच चटकन उठल्या. मृत्यूकडे झेपावणाऱ्या त्या रुग्ण-स्त्रीपाशी जाऊन बसल्या. त्यांनी तिला तसं कबूलच केलं होतं. फार वेळ लागला नाही. अज्ञान आणि उपेक्षेने आपलं काम चोखपणे बजावलं.

संपलं.

डॉ. आयडा स्कडर तिथून उठल्या तेव्हा त्यांच्या डोक्यात विचारांचे काहूर नव्हते किंवा कसले बंड नव्हते.

होता तो फक्त दृढ निश्चय.

नर्सिंगस्कूल सुरू करायचं.

केवळ काही घरांना भेटी देऊन रुग्णस्त्रिया तपासणे; स्त्रियांसाठी रुग्णालय उभारणे किंवा काही प्रशिक्षित परिचारिका तयार करणे पुरेसे नाही. हिंदी स्त्रीनेच स्वयंसिद्ध व्हायला पाहिजे. इथे नर्सिंगस्कूल उघडून इथल्याच तरुण हिंदी स्त्रियांना प्रशिक्षित केलं पाहिजे. त्यांना खेडोपाडी पाठवलं पाहिजे. तिथं राहून त्यांनी आपल्या लोकांना आरोग्याच्या सवयी लावल्या पाहिजेत. त्यासाठी स्वत: डॉक्टरांनाच त्यांच्याबरोबरीने गेले पाहिजे. डझनवारी नव्हे शेकड्यावारी दौरे काढले पाहिजे...

'इथे नि नर्सिंगस्कूल? अशक्य!' डॉक्टरांच्या मनात शंकेची पाल चुकचुकू लागली. त्यासाठी किती अटी आणि किती सोयी पुरवाव्या लागतील! किती पूर्ण वेळ शिक्षिका लागतील! आणि पैसा? पुन्हा इथे दायांचं आणि आयांचं काम कमी प्रतीचं मानतात, ते आधी सन्माननीय ठरवावं लागेल. खेड्यांतून दौरे काढायचे म्हणजे मोटर हवी. आणखी डॉक्टर्स हवेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट- जिची नेहमीच आपल्याला चणचण भासते- वेळ. एवढी सगळी कामं उरकायला वेळ कुठून आणायचा!

पण आता या शंका-कुशंकांना अर्थच उरला नव्हता. गत्यंतरच उरलं नव्हतं. अडचण तात्पुरती सोडवून काम भागत नव्हतं. ती अडचण समूळ नष्ट करायला हवी होती.

इतर मिशनऱ्यांप्रमाणे डॉ. आयडाही दीर्घकालीन सुट्टी घेऊन अमेरिकेला जाऊन यायच्या; पण ह्या आणि नंतरच्या सुट्ट्यांचं सुख मात्र त्यांना नंतर कधीच मिळालं नाही. अधिकाधिक प्रवास करावा लागला. बोलणं करावं लागलं. संधी मिळेल तेव्हा आणि तिथे आपण हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती द्यायची आणि लोकांना मदत करायला उद्युक्त करायचं. त्यातून फावेल तेव्हा आपलं वैद्यकीय ज्ञान आणि कौशल्य अद्ययावत् राहावं म्हणून निरनिराळ्या आधुनिक रुग्णालयांना भेटी द्यायच्या, व्याख्यानं ऐकायची, ग्रंथालयात बसून नवीन माहिती मिळवायची, नव्या सुधारणांचा, आधुनिक तंत्रांचा मागोवा घ्यायचा, निरनिराळे पदव्युत्तर अभ्यासक्रम पुरे करायचे हे सारं चालूच असायचं.

त्या १९०७ च्या उन्हाळी सुट्टीत कशीबशी सवड काढून डॉ. आयडा आपल्या

कुटुंबाच्या शेतीवर नेब्रास्का येथे गेल्या. एक भाऊ आणि वहिनी शेतीवाडी पाहायचे. सारीच स्कडर मंडळी नेब्रास्काला जमली होती. हे कौटुंबिक सम्मेलन फार आनंददायी होते. भावाची छोकरी आयडाबेल. आत्याचंच नाव धारण करणारी. ही सात वर्षांची सुवर्णकेशी भारी लाजरी-बुजरी होती; पण आत्या-भाचीचं मेतकूट छान जमलं. तिच्याशी खेळताना डॉक्टरांना आपलंच बाळपण परत मिळालं. आत्या-भाचीच्या नामसादृश्यामुळे घोटाळे होऊ लागले, तेव्हा धाकटीला सारे आयडा बी. म्हणू लागले. आयडा बी. आयडाआत्याची जणू सावलीच बनून गेली होती. सारखी मागे मागे असायची. प्रत्येक बाबतीत आत्या तिचा आदर्श. आत्यालाही तिचा खूप लळा.

आपली ही छोटी सुट्टी संपवून डॉक्टर पुन्हा भाषणं, मुलाखती, सभा यांत गुरफटल्या. फेब्रुवारीत तीन महिन्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी त्यांनी न्यूयॉर्क रुग्णालयात नाव नोंदवलं.

न्यूयॉर्कमध्ये त्या गर्ट्रुड डॉडच्या घरी राहिल्या. (याच गर्ट्रुड डॉडने ॲनी हॅन्कॉकला हिंदुस्थानात पाठवण्याची सारी जबाबदारी घेतली होती.) गर्ट्रुड डॉडला 'इंडिया' आणि 'आयडा'बद्दल विलक्षण कुतूहल. दोघींचा पत्रव्यवहार नियमितपणे चालू होता. त्यामुळे एकमेकींपासून इतक्या दूर अंतरावर राहूनही त्यांच्यात जवळीक निर्माण झाली होती. अनौपचारिक स्नेहसंबंध निर्माण झाले होते. वास्तविक गर्ट्रुड डॉड डॉ. आयडांपेक्षा बारा वर्षांनी वडील; पण डॉ. आयडांच्या व्यक्तिमत्त्वाने, बुद्धिमत्तेने, सळसळणाऱ्या तारुण्याने गर्ट्रुडला प्रभावित केलं होतं. आपलंसं केलं होतं.

डॉ. आयडांकडे ज्या दोन गोष्टी नव्हत्या त्या डॉडकडे होत्या. अनुशासन आणि धन. न्यूयॉर्क सिटी मिशन आणि विमेन्स बोर्ड ऑफ मिशन या दोन्हींची ती बरीच वर्षे कोषाध्यक्षा होती. हा फार मोठा अनुभव तिच्या गाठी होता. न्यूयॉर्कच्या एका धनवान कंत्राटदाराची ती मुलगी.

'मला तुझं हिंदुस्थानातील काम नुस्तं जरी पाहायला मिळालं तर-' एके दिवशी डॉड डॉ. आयडांना म्हणाली. 'असं? का नाही? माझ्याबरोबर चल. तुला आणि कॅथेराइन व्हान नेस्टला जगातील इतर मिशन्स कशी काम करतात हेही पाहायला मिळेल. तुम्हा दोघींचंही ते कार्यक्षेत्र. शिवाय तुम्हाला येणं जमण्यासारखंही आहे.'

गर्ट्रुडला कल्पना पडली. कॅथेराइन व्हान नेस्टही तयार झाली. दोघी तयारीला लागल्या.

त्या सुट्टीत डॉ. आयडांच्या व्यक्तिमत्त्वाची भुरळ पडणाऱ्या, त्यांच्या उमदेपणाने प्रभावित होणाऱ्या या काही दोघीच नव्हत्या. डॉक्टर ठिकठिकाणी व्याख्याने देत. ती ऐकण्यासाठी बराच समुदाय जमे. त्यांच्यावर डॉक्टरांच्या सौंदर्याबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, सहज आकर्षक वक्तृत्वाचा प्रभाव पडे. त्यांच्या बोलण्यामागची आच जाणवे. त्यांचा ध्यास जाणवे.

१८१९ साली अमेरिकेतून हिंदुस्थानात प्रथमच मिशनरी डॉक्टर म्हणून त्यांचे



आजोबा आले. तेव्हापासून स्कडर घराण्यातील लोकांनी मिळून हिंदुस्थानात केलेल्या मिशनरी सेवेची बेरीज हजार वर्षं भरली असती. सेवेची अशी प्रचंड परंपरा डॉक्टरांच्या पाठीशी होती. त्या हिंदुस्थानातील दु:स्थितीविषयी हकिकती सांगत तेव्हा श्रोत्यांना गहिवरून यायचं.

अल्पवयीन मुलीला प्रसूतिसमयी आलेला अकाली मृत्यू, मेरी टॅबर, कानात खडा गेलेली मुलं, देवदासी लक्ष्मी, प्रसूतिनंतर पाण्याअभावी तडफडून मरणाऱ्या माता, अंधाऱ्या खोलीतून बाळंतिणीची सुटका करणाऱ्या त्या अडाणी सुइणी या साऱ्यांविषयी त्या सांगत आणि मग आपली स्वप्नं सांगत- नर्सिंग स्कूल आणि खेडोपाडी वैद्यकीय सेवा.

श्रोते प्रतिसाद देत. मदतीचा हात पुढे करत. थोडाफार निधी जमा होई.

'जिला मी उभ्या जन्मात पाहिली नव्हती तिच्याविषयी मला एवढं कुतूहल वाटावं याचं माझं मलाच आश्चर्य वाटतं...

'-त्या दिवशी तुम्ही चॅपलमध्ये बोललात आणि आमच्या काळजालाच हात घातलात. एखाद्याच्या आवाजाच्या प्रेमात लोक पडतात हे मी नुसतं ऐकून होते; पण माझ्या बाबतीतही तेच घडलंय!'- एका स्त्रीने डॉ. आयडांना पत्र लिहिलं होतं. सोबत मोटार घेण्यासाठी एक हजार डॉलर्सचा चेक.

□

१९०८ च्या नोव्हेंबर महिन्यात डॉ. आयडा, सोफिया स्कडर, ॲनी हॅन्काक कॅथेराइन व्हान नेस्ट, गर्ट्रुड डॉड आणि डेलिया हॉग्टन (R.N.) हिंदुस्थानात यायला निघाल्या. डॉडने साऱ्यांना या प्रवासात लंडन, पॅरिस, मिलान, व्हेनिस, फ्लॉरेन्स, रोम, नेपल्स वगैरेंचं दर्शन घडवलं.

वेलूरमध्ये पाय ठेवताच डॉ. आयडा आपल्या दोन नवीन योजना कार्यान्वित करण्याच्या खटपटीस लागल्या.

नर्सिंग स्कूल सुरू व्हायला वर्षभर तरी लागणार होतं. तोवर डॉक्टरांनी निरनिराळ्या मिशनस्कूल्सना पत्रं टाकली. काहींना भेटी दिल्या. आपल्याला हव्या तशा विद्यार्थिनी निवडल्या. रुग्णालयात आधीपासून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीही अभ्यासक्रम आखला. डेलिया हॉग्टन तामीळ भाषेचा अभ्यासक्रम पुरा करत होती. तो संपताच तीही कंबर कसून या कामी जुंपणार होती.

अपेक्षा नव्हती एवढे कष्ट डॉक्टरांना नर्सिंग स्कूलसाठी विद्यार्थिनी निवडताना पडले. बहुतेक बुद्धिमान आणि शिकलेल्या मुलींचं लग्न तरी झालेले असे किंवा त्यांनी शिक्षिकेचं काम तरी पत्करलेलं असे. या सुरुवातीच्या दिवसात परिचारिकेचा व्यवसाय उच्चकुलीन सुशिक्षित तरुणींसाठी अयोग्य मानला जायचा.

'माझी मुलगी दुसरीत तीन वेळा नापास झालीय. मला खात्री आहे ती चांगली परिचारिका बनू शकेल-' ही अशी पत्रं यायची.

आलेल्या अर्जातून डॉ. आयडांनी विद्यार्थिनी निवडल्या. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला.

डॉ. आयडांच्या गैरहजेरीत डॉ. लुईसा हार्ट यांनी वेलूरपासून २३ मैलांवर गुडियाट्टम् येथे आणि ६५ मैलांवर पुंगानूर येथे (या पुंगानूरला डॉ. आयडांचा भाऊ हॅरी मिशनमध्ये काम करत होता.) असे दोन दवाखाने सुरू केले होते. या दोन्ही ठिकाणी डॉ. आयडांना नियमितपणे जाणे भाग होते.

गुडियाट्टम्ला नुकतेच एक चर्च बांधले होते. त्याच्याच एका दालनात दवाखाना सुरू झाला होता. बहुसंख्य हिंदू आणि मुसलमान वस्ती असणाऱ्या या गावाला भेट द्यायला डॉ. आयडा उत्सुक होत्या.

बुधवारी पहाटे पाचलाच उठून डॉक्टरांनी तयारी केली. चार मैलांवरच्या काटपाडी रेल्वेस्थानकावर त्या आपल्या घोडागाडीने गेल्या. साडेदहाच्या सुमारास आगगाडीच्या डब्यात आपल्या सामानासह बसल्या, एक छोटी वळकटी, औषधांचा खोका, प्रवासी ट्रंक, पाथेय, बाटल्यांचा खोका, पाण्याचा तांब्या. कोणतेही हिंदू कुटुंब एवढ्या तयारीनिशी हजार मैलांची तीर्थयात्रा पार पाडून आले असते.

वेलूरप्रमाणेच गुडियाट्टम्चे रेल्वेस्थानक गावापासून दूर होते. त्यामुळे स्थानकावर उतरल्यावर डॉक्टरना गावात जाण्यासाठी बैलगाडी ठरवावी लागली.

या पहिल्याच दिवशी त्यांनी ५६ रुग्ण तपासले. त्यातील निम्मेअधिक कर्करोगी होते. अगदी शेवटच्या अवस्थेतले. स्त्री-रुग्ण तर एवढ्या लाजऱ्याबुजऱ्या अन भेदरलेल्या की डॉक्टर त्यांच्याजवळ तपासण्यासाठी गेल्या की त्या मागे मागे सरकायच्या.

तिथले रुग्ण तपासून झाल्यावर घाईघाईने जेवण संपवून डॉक्टर पुढच्या प्रवासाला लागल्या. अर्थात बैलगाडीने. घाट ओलांडून त्या पालमानेरला आल्या. इथे त्यांचे जेअर्डकाका राहात असत. त्यांना पुढे पोहोचायचे होते पुंगानूरला; पण रात्र काकांकडे काढून त्या पुढे जाणार होत्या. एवढ्याशा बैलगाडीत त्यांचं सगळं सामान आणि त्या स्वत:. कोंबाकोंबीच झाली होती. पाय आणि कंबर कशी भरून आली होती. जसजशी गाडी घाटाची चढण चढू लागली तसतसा धुळीचा अन डचमळण्याचा त्रास वाढू लागला.

पालमनेरला आल्यावर आपल्या काकांची वृद्धावस्था पाहून डॉक्टरांनाच धक्का बसला. जेअर्डकाका आणि ज्युलियाकाकू यांना हिंदुस्थानात आल्याला पंचावन्न वर्षं होऊन गेली होती. सतत पंचावन्न वर्षं सेवाव्रत चालूच होते. त्यांची ती सुंदर कन्या डिस्की हीही माता-पित्यासारखीच कर्तव्यदक्ष निपजली होती. खेड्यात जाऊन काम करण्याचं तिचं स्वप्नं मात्र अजून वास्तवात उतरलं नव्हतं.

रात्री बऱ्याच उशीरापर्यंत दोघी बहिणी हितगूज करीत राहिल्या. घाटमाथ्यावरच्या त्या थंड ठिकाणी डॉक्टरांना शांत झोप लागली. श्रमपरिहार झाला. पुढे २० मैलांवर पुंगानूर होते. पुंगानूरच्या दवाखान्याची देखभाल डॉक्टरांच्याच हाताखाली



तयार झालेली परिचारिका करत होती. ती आपले काम चोखपणे बजावत होती. डॉक्टरांना समाधान वाटले.

पुंगानूर सोडून डॉक्टर निघाल्या. बैलगाडीतून जात असताना त्यांना रस्त्यात एक विचित्र दृश्य दिसले. रस्त्यापलीकडे शेतातल्या एका छोट्या देवळापुढे शेकडो माणसे, हजारो शेळ्यामेंढ्या यांचा जथा दिसला. सदैव उत्सुक आणि चौकस असणाऱ्या डॉक्टरांनी लागलीच चौकशी केली.

हा प्रदेश तेलगू होता तरी तामीळ जाणणारी वृद्ध मंडळी त्या जथ्यात होतीच.

'येन्ना? काय आहे इथे?' डॉक्टरांनी विचारलं.

'देवीच्या (Small pox) देवतेपुढे बळी द्यायल्या आणल्या आहेत या मेंढ्या. घरटी एक. एक एक करून देवीच्या मूर्तीपुढे न्यायची. सुऱ्याच्या एका झटक्यात डोकं उडवायचं तिचं. मग ते मुंडकं देवापुढं ठेवून त्याच्या नाकाचा डावाउजवा कौल घ्यायचा.

खचल्या मनाने डॉ. आयडा बैलगाडीत येऊन बसल्या.

येशू ख्रिस्त प्रथमच जेरुसलेमच्या देवळात गेला तेव्हा त्याच्या मनाला काय यातना झाल्या असतील याची त्यांना कल्पना आली.

□

मार्च महिन्यात डॉ. हार्ट सुट्टीवर गेल्या तेव्हा डॉ. आयडांची फारच धावपळ उडाली. त्यातूनही सवड काढून त्या दैनंदिनी लिहीत.

| | | |
|---|---|---|
| १ एप्रिल | : | ७ शस्त्रक्रिया. ४ क्लोरोफॉर्म्स. क्युरेटिंग. डोळा काढला. |
| ९ एप्रिल | : | कसोटीचा दिवस. काही शस्त्रक्रियांतून पू. म्हणजे शस्त्रांचं निर्जंतुकीकरण नीट झालेलं नसावं. १६६ रुग्ण. |
| १० एप्रिल | : | गुडियाट्टम्. फक्त दोन तास झोप. फोरसेप्स केस. फार थकवा. |
| १७ एप्रिल | : | पहाटे ३-३० वा. उठले. गुडियाट्टम्. सोबत गर्ट्र्युड. ८३ रुग्ण. |
| १५ मे | : | दिवसभर काम. रुग्ण माझी किती प्रतीक्षा करत असतात याचं माझं मलाच आश्चर्य वाटतं. आज एक दुसरीला सांगत होती, "डॉक्टर किती कामात आहेत ते बघितलं नाहीस का! त्यांना उसंत मिळाली की त्या आपल्याला तपासतीलच. या बाईंना शंभर हात असते ना, तरी त्यांचं काम संपलं नसतंच; पण त्यांचे पडले दोनच हात. आता आपणच थोडी कळ काढली पाहिजे नाही का?" |
| ३० जुलै | : | पुंगानूर. शस्त्रक्रिया. रुग्णालयातील ढेकणांचा बंदोबस्त. |
| १५ सप्टेंबर | : | गर्ट्र्युड आणि कॅथेराइनला निरोप. गर्ट्र्युडला निरोप देताना फार वाईट वाटलं. इतकं उदास अन् एकाकी पूर्वी कधीच वाटलं नव्हतं. |

□□

# दवाखान्याला फुटले पाय



२३ सप्टेंबर १९०९. वेलूरच्या इतिहासातील त्या दशकातील सर्वात महत्त्वाची घटना.

नवीन मोटार आली. वेलूरच्या रस्त्यावर प्रथम धावली ती डॉ. आयडांची मोटार.

गाडी आली ती सुटे अवयव घेऊनच. तिची जोडणी करण्यासाठी मद्रासहून तंत्रज्ञ आला. गाडी फ्रेंच बनावटीचा प्युजो होती. एक सिलिंडरवाली. उंच घडीचा टप. चाकांना आऱ्या. दोन बैठका. फूटबोर्डातून सरळ वर आलेलं स्टिअरिंग व्हील. इंजिन सुरू झालं की कशी हिंव भरल्यागत थडथडायची.

त्या गाडीने गावात पहिलीच चक्कर मारली तेव्हाचा अनुभव काही औरच.

गाडी अगदीच इटुकली. म्हणून थोडीच औषधं आणि बाटल्या बरोबर घेतल्या होत्या. काही सामान पिशव्यांतून भरून त्या पिशव्या मोटारीच्या दोन्ही अंगांना बांधल्या. ड्रायव्हरशेजारी डॉक्टर बसल्या. सलोमी आणि इव्हँजेलिस्ट मागच्या अंगाला.

मोटार निघाली. गोंगाट करत चालली.

ड्रायव्हरचा एक हात स्टिअरिंग व्हीलवर तर दुसरा हात कर्ण्यावर. रस्त्यातील सायकली, वाटसरू, ढकलगाड्या, बैलगाड्या, गाई यांची स्वत:चा जीव वाचवण्यासाठी हीऽ धावपळ.

गाव सोडून मोटार खेड्याच्या रस्त्याला लागली. तिथले खेडूत तर यांना येताना बघून हातातली कामं टाकून सैरावैरा धावू लागले. एकच घबराट.

'भूत! भूत! राक्षस!!'

गाडी थांबवून डॉ. आयडा त्यांना समजवायल्या धावल्या. पण अंऽऽहं. त्या दिवशी शेवटी त्यांना रुग्ण तपासण्यासाठी पदयात्राच काढावी लागली. चार-दोन फेऱ्यांनंतर मात्र घबराट ओसरली. मुलं माश्यांसारखी गाडीभोवती घोंघावू लागली. टपावर, चाकावर, सीटवर, तेवढ्यात कोणी कर्णाच पळवला.

"अरे देवा! आता दुसरा बसवायला हवा."

"कशाला? गाडीचाच आवाज रगड आहे. आपण येत असल्याची वर्दी लोकांना दुरूनच मिळते" इति- हसन ड्रायव्हर.

मग दर बुधवारी डॉ. आयडा मोटार घेऊन गुडियाट्टम्ला जाऊ लागल्या. काठपाडी रेल्वेपुलावर मात्र मोटार चांगलीच पंचाईत करायची. अर्धाअधिक पूल पार



केला की ती दमेकऱ्यासारखी धापा टाकायला लागायची. मग एक मोठा सुस्कारा सोडून निपचित व्हायची; पण मनुष्यबळाला उणीव कधी नसायचीच. गाडीवान आपल्या गाड्या सोडून, शेतकरी आपल्या डोईवरच्या टोपल्या उतरवून, वाटसरू आपले बघणे थांबवून मदतीला यायचे. या साऱ्यांचा हातभार घेऊन प्युजोबाई पूल ओलांडायची.

काही फेऱ्यांनंतर खेडूत मोटारीला सरावले. पळापळ थांबली. रस्त्याच्या कडेला ते रांगेत उभे राहू लागले. आजूबाजूच्या खेड्यांतून बातमी गेली की कोणताही प्राणी न जोडलेल्या गाडीतून गोरी डॉक्टरीण औषध आणते. आजाऱ्यांची सेवा करते. सर्वांवर प्रेम करणाऱ्या देवाविषयी सांगते. त्याची छान छान रंगीत चित्रंही देते. ज्या कोणाला औषध हवं असेल त्याने रस्त्याच्या कडेला हातात एक बाटली घेऊन उभं राहायचं की बास्!

ते भोळे खेडूत औषधासाठी बाटल्या, पेले, फुलदाण्या, डबडी अगदीच काही नाही तर करवंट्या हाती घेऊन उभे राहायचे. हे पाहून डॉ. आयडांना हसू यायचं पण मन तितकंच हेलावूनही जायचं.

मोटारीच्या मार्गात कोणी कुठेही वाट पाहात उभे असायचे. त्यांच्यासाठी ठिकठिकाणी गाडी थांबवावी लागे.

डॉ. आयडांच्या नोंदी-

१० नोव्हेंबर : एका रुग्णाला बाजेवर झोपवून आणला होता. १५३ रुग्ण. घरी परतायला उशीर.

२४ नोव्हेंबर : गुडियाट्टम्मध्ये १२२ आणि रस्त्यात १०८ केसिस. वेळ असता तर आणखी काही तपासून इलाज करता आले असते. त्यांच्या गरजा पाहून हृदयाला पीळ पडतो.

१ डिसेंबर : २६९ केसिस. रात्री परतायला ८.३०.

८ डिसेंबर : ३०५ केसिस रस्त्यात. गुडियाट्टम्ला पोहोचायला उशीर. तिथे ८६ केसिस.

ही परिस्थिती पाहून डॉक्टर बेचैन व्हायच्या; पण काय करावं ते उमजत नव्हतं.

सुचला. इलाज सुचला.

डेरेदार वृक्षाच्या भरपूर सावलीची काही ठिकाणं त्यांनी ठरवून घेतली. अशा थांब्यावर आठवड्यातून एक दिवस नियमितपणे जायचं असं त्यांनी ठरवलं. म्हणजे मग एकाच ठिकाणी पाचपन्नास रुग्ण तपासायला बरे.

अशा ठराविक थांब्यांवर रुग्ण जमत. दुरून गाडीचा आवाज ऐकू आला की भराभर सगळे त्या झाडाखाली गोळा होऊन बसत. रोग तर नाना प्रकारचे. व्यक्ती तितक्या प्रकृती.

आलेले खेडूत अकलेने बाल्यावस्थेतले. डॉक्टरांनी कानात ठेवायला कापूस दिला तर हा कसा खायचा म्हणून विचारायचे.

एखाद्या प्रसूतीसाठी डॉक्टर हात धुऊ लागल्या की एखादी बापडी निष्पापपणे विचारी "आता आणिक हात कशाला धुता बाई? पुन्हा घाणेरडेच तर होणार आहेत."

□

प्युजोबाई आता भूत न उरता त्या लोकांची सखी बनली होती. खेडुतांनी डॉक्टरीणबाई आणि प्युजोबाई यांना आपलं म्हणून स्वीकारलं होतं.

गुडियाट्टम्ला परतत असताना एके रात्री अंधाराचा फायदा घेऊन काही खोडसाळांनी डॉक्टरांच्या मोटारीवर दगड मारले. त्यांनी परत अशी खोडी काढू नये, काहीतरी जरब बसावी म्हणून डॉक्टरांनी पोलिसांना बोलावणे पाठवले. अशा प्रसंगी गर्दी जमणे अटळच. जमावातील एकजण त्या खोडसाळांना मोठ्याने खडसावत होता ते डॉक्टरांना ऐकू आले- 'का रे, दगड का फेकलेत? दर बुधवारी हे लोक दवापाणी घेऊन आपल्यासाठीच येतात. इलाज करतात. त्यांना का रे असा त्रास देता?'

काही खेड्यांतून वेगळीच भीती. डॉक्टरांनी ठरवून दिलेल्या ठिकाणी लोक जमत; पण तपासून घ्यायला किंवा औषध घ्यायला कोणीच पुढे येत नसे. अशाच एका थांब्यावर डॉक्टर बुधवारी थांबल्या. चांगला डेरेदार वृक्ष. मुलं सावलीत खेळत होती. खेळणाऱ्या मुलांकडे पाहता पाहता डॉक्टरांच्या नजरेस आलं की, बऱ्याच मुलांचे डोळे आलेले आहेत. विशिष्ट प्रकारचा नेत्ररोग इथे चांगलाच फैलावला होता. अंधत्वाचं प्रमाण नक्कीच वाढलं होतं. Purulent Ophthalmia,

न राहवून, डॉ. आयडांनी रंगीत चित्राचं आमिष दाखवून एका मुलाला जवळ बोलावलं. आंजारून गोंजारून त्याच्या दोन्ही डोळ्यांत औषधाचे थेंब सोडले. हे काम उरकतं न उरकतं तोच गावचा प्रमुख तिथे आला. डॉक्टरांच्या अंगावर त्वेषाने धावून गेला. हातवारे करत, मुठी वळत तामीळमधून लाखोली वाहू लागला. दुखावलेल्या, हताश झालेल्या डॉक्टर आणि त्यांच्या सहकारी मोटारीत बसून पुढच्या थांब्यावर गेल्या.

परतीच्या प्रवासात डॉक्टर आणि त्यांच्या सहकारी यांच्या लक्षात आलं की त्या मघाच्या थांब्यावर वृक्षाखाली बरेच लोक जमा झाले आहेत. दिवट्या-पलिते घेऊन उभे आहेत. रस्त्याच्या मधोमध एक माणूस उभा आहे. जोरजोराने हातवारे करतोय. तोच तो. मघाचाच गावप्रमुख. आता काय करावं. डॉक्टर आधीच इतक्या थकल्या होत्या की आता आणखी काही वेडंवाकडं सहन करण्याची शक्ती त्यांच्यात उरली नव्हती.

'येन्ना?' डॉक्टरांनी हताश स्वरात विचारले.

तो पुढारी लवून वाकला. डॉक्टरांना नमस्कार केला. सुवार्ता ऐकवली. सकाळी ज्या मुलाच्या डोळ्यांत औषधाचे थेंब टाकले होते त्याला बराच आराम पडला होता. म्हणून लागण झालेली सारी मुले घेऊन त्यांच्या डोळ्यांत औषध टाकून घ्यायला



आला होता.

डॉक्टरांचा थकवा कुठल्याकुठे पळाला. त्यांनी मुलांना रांगेत उभं केलं. तीस. सगळ्यांच्या डोळ्यांत औषधाचे थेंब टाकले.

पुढच्या बुधवारी त्या वटवृक्षाखाली लोक डॉक्टरांची वाट पाहात उभे होते. पुढारीही हातात रिकामी बाटली घेऊन उभा होता.

लाथेरी खेड्यातला प्रकार तर आणखीनच वेगळा. हे खेडं जेवढं मोठं तेवढी त्याची वैद्यकीय गरजही मोठी.

आठवड्यामागून आठवडे डॉ. आयडा इथे थांबत होत्या. तिथल्या स्त्रियांशी मैत्री करायला पाहात होत्या. 'या बाटग्यांच्या हातची औषधं कोणी घ्या?' असं म्हणून त्यांच्या तोंडावर दारं बंद व्हायची.

नेहमीप्रमाणे डॉक्टर लाथेरी खेड्यातल्या आपल्या ठरलेल्या थांब्यावर वाट पाहात बसल्या. रुग्ण कोणी आले नाहीत; पण घडलं ते वेगळंच.

समोरून एक मोठा घोळका येत होता; पण तो घोळका पाहून डॉक्टरांना आनंद होण्याऐवजी विषादच वाटला.

एक आजारी वृषभराज घेऊन ते लोक येत होते. डॉ. आयडा त्याच्याकडे आणि त्याला आणणाऱ्या लोकांकडे बघतच राहिल्या.

त्या खेडुतांच्या जीवनात माणसापेक्षाही बैलाच्या जीविताला अधिक किंमत होती. कारण अशा बैलावरच साऱ्या कुटुंबाचं भवितव्य अवलंबून असायचं. त्याच्यावरच साऱ्यांची गुजराण व्हायची.

'बघू या कसं काय जमतं ते,' डॉक्टर त्या लोकांना धीर देत म्हणाल्या.

बैल त्यांना जवळ येऊ देईना. तेव्हा लोकांनी त्याला जमिनीवर आडवा केला. त्याच्यावर ते बसले. मग डॉक्टर जवळ गेल्या आणि त्या बैलाच्या कानाला झालेला घाणेरडा ट्यूमर कापून काढला.

आपण केलेली शस्त्रक्रिया यशस्वी व्हावी म्हणून प्रभूची एवढी करुणा यापूर्वी कधी डॉक्टरांनी भाकली नसेल.

दुसऱ्या आठवड्यात त्या लाथेरीला गेल्या त्या थोड्याशा धास्तावलेल्या मन:स्थितीतच. लोक त्यांची वाट पाहात उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहून डॉक्टर समजल्या- रुग्ण पूर्णपणे दुरुस्त झाला असावा.

लाथेरी गावाने त्यांच्यासाठी आपला दरवाजा खुला केला.

एका बुधवारी एक प्रशिक्षित अमेरिकन परिचारिका डॉक्टर आयडांच्या बरोबर निघाली. रुग्णावर तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक होतं म्हणून डॉक्टरांनी त्या अमेरिकन परिचारिकेला त्या रुग्ण-स्त्रीला भूल द्यायला सांगितली.

'काऽ य? या इथे हिच्यावर शस्त्रक्रिया करणार तुम्ही?

'हो इथेच. या झाडाखाली आणि तीही आत्ताच.' 'कमाल आहे! अहो, अमेरिकेत एकदा एका शिकाऊ डॉक्टरने मला भूल द्यायचं काम सांगितलं तर वरिष्ठ डॉक्टरांनी

केवढं फैलावर घेतलं त्याला.' 'ठीक आहे. मीही ओरडून घ्यायला तयार आहे. चल,' डॉ. आयडा मिश्किलपणे तिला म्हणाल्या आणि त्या परिचारिकेने नकार दिला असता तरी डॉक्टरांचं काहीच खोळंबलं नसतं. कंपौंडर नाही तर ड्रायव्हर होतेच हाताशी. शिवाय एक विद्यार्थिनी आणि एक शिकाऊ परिचारिकाही.

भूल द्यायचं काम त्या अमेरिकन परिचारिकेनं केलं खरं, पण बिचारी आठवडाभर धास्तावलेली होती. पुढच्या बुधवारी ती रुग्ण-स्त्री टाके काढून घ्यायला स्वत:च्या पायाने चालत आली तेव्हाच हिचा जीव भांड्यात पडला.

डॉ. आयडांना किती तरी वेळा अशा झाडाच्या सावलीत, खाली धुळीवरच स्वच्छ पांढरे कापड पसरून शस्त्रक्रियेची सोय करावी लागे. ह्या शस्त्रक्रिया पाहायला भोवती उत्सुकाचा गराडा पडायचा. मग गुडघ्यावर बसून डॉक्टर आधीच निर्जंतुक करून ठेवलेली शस्त्रं घ्यायला हात लांब करायच्या की तेवढ्यात एखादं आगाऊ पोर मध्ये कडमडायचं आणि मग पुन्हा सारं निर्जंतुक करण्याचा व्याप करावा लागायचा.

□

१९१० च्या मध्यापर्यंत या फिरत्या दवाखान्याला एखाद्या संस्थेचं स्वरूप आलं होतं.

सकाळी साडेसहालाच डॉक्टरांची मोटार निघायची. औषधं, मलमं, पावडरी, शस्त्रांनी मोटार एवढी ठासून भरलेली असायची की डॉक्टर, ड्रायव्हर आणि दोन मदतनीस यापलीकडे आत कोणाला शिरकाव नसायचा.

पहिला मुक्काम सहा मैलांवर. तिथे पन्नास-साठ जण वाट पाहात उभे असायचे. रुग्णाची नोंद व्हायची. प्रत्येकाचा कागद तयार व्हायचा. क्रमांक मिळायचा. ज्याला शक्य असेल त्याच्याकडून नाममात्र फी घेतली जायची. डॉक्टर रुग्ण तपासायच्या. रुग्णाच्या कागदावर औषध लिहायच्या. मदतीला असलेली परिचारिका औषधं बाटल्यांतून, पुड्यांतून द्यायची. ते औषध कसंकसं घ्यायचं याची पुन्हा पुन्हा सूचना द्यायची. औषधाची पुडी पुन्हा पुन्हा उघडून आतलं औषध दाखवायची. न जाणो एखादा अडाणी कागदासकट औषध घ्यायचा. इथे ड्रायव्हरची सुद्धा भूमिका बदललेली असे. रुग्णांना रांगेत उभे करायचे. डोळ्यांत थेंब घालायचे, घाबरणाऱ्या रुग्णांना धीर द्यायचा ही कामे त्याला पार पाडावी लागायची. चुळबुळ्याला नीट घट्ट धरून ठेवायला आणि रात्रीच्या वेळी कंदिलाचा उजेड देण्यासाठी ड्रायव्हरचा उपयोग फार व्हायचा.

डॉक्टरांच्या या बुधवारच्या दौऱ्यात असे दहा दहा थांबे झाले होते. सकाळी वेलूरच्या परिसरातील दहा खेडी. दुपारी गुडियाट्टम्. संध्याकाळी परतताना इतर गावठाणं. जरी हे थांबे ठराविक असले तरी प्रत्येक वेळी रुग्ण तेच ते असायचे असे नाही. नवा रुग्ण. नवा आजार. नवी समस्या.



एकदा असं झालं-

रस्त्यावर आडवं येऊन एकानं डॉक्टरांची गाडी थांबवली. त्याने डॉक्टरांना बाजूच्या आमराईत बोलावलं. तिथं बैलगाडी उभी होती. तिथे खाली जमिनीवर एक स्त्री अर्धवट प्रसूत झालेल्या अवघड अवस्थेत तळमळत होती. खेड्यातील अडाणी दाईने तिची ही दुर्दशा केली होती. आलेल्या सुजेमुळे आता तिची नैसर्गिकरीत्या प्रसूती होणे कठीण होते. रुग्णालयात घेऊन जाण्यासारखी तिची अवस्था नव्हती. डॉक्टरांनी घाईघाईने त्या बैलगाडीचंच ऑपरेशन टेबल केलं. त्या बाईला त्यावर ठेवायला लावले. रस्त्यावरून चाललेल्या वाटसरू स्त्रियांना बोलावले. त्यांना लुगड्याचे पडदे बाजूला धरायला लावून आडोसा केला. बैलांना मोकळे करून त्या बाईच्या नवऱ्यालाच जू घट्ट धरून ठेवायला सांगितले. मदतनीस हाताशी होतीच. शस्त्रक्रिया पार पडली. मूल गेलेलंच होतं. बाई मात्र वाचली.

त्या मे महिन्यातही तसंच-

शेवटच्या थांब्यावरून डॉक्टर निघाल्या तेव्हा चांगलंच अंधारलं होतं. पारा १०६° फॅ. वर चढला होता. आधीच कलकलत असलेलं मस्तक मोटारीच्या धक्क्यांनी भणभणत होतं. दिवसभर रुग्ण-रुग्ण-रुग्ण. 'नाही. आता अजिबात नाही!' त्यांच्या गाडीला थांबण्यासाठी इशारा करत असलेल्या माणसाला पाहून त्या म्हणाल्या.

पण गाडी थांबलीच.

डॉक्टरांच्या नकाराचा अर्थ हुसेन ड्रायव्हर आजवरच्या अनुभवाने जाणून होता.

गाडी थांबवणारा माणूस चांगलाच आजारी वाटत होता. आपलं अशक्त, जीर्णशीर्ण शरीर ओढत, धापा टाकत तो पुढे येत होता. त्याचा एक हात खूप सुजला होता. गळ्यात दोरी बांधून तीत तो अडकवला होता. सूज तर अगदी खांद्यापर्यंत गेली होती. तापाने तोंड तांबरलं होतं. तो हात वाचवण्यापलीकडे डॉक्टरांना पर्यायच उरला नव्हता.

काळोख चांगलाच दाटला होता तरी त्यांनी रस्त्याच्या कडेला छोटं टेबल मांडलं. आपल्या मदतनीस परिचारिकेला त्यांनी गुडियाट्टम्लाच सोडलं होतं. मदतीला आता फक्त हुसेन ड्रायव्हर. त्याला नाडीचे ठोके नेमके कुठे शोधावेत ते साधेना. म्हणून डॉक्टरांनी प्रथम त्याला ते शिकवलं. मग क्लोरोफॉर्म कसा द्यायचा ते दाखवलं. आपली अवजारं एकदा कार्बोलाईज करून कंदिलाच्या अपुऱ्या उजेडात त्यांनी शस्त्रक्रियेला सुरुवात केली. जखम खोलवर चरत जाऊन चिघळली होती. ती साफसूफ करून योग्य ते इलाज करून नीट बांधली.

त्या माणसाला खूप आराम पडला. अंधारात नाहीशा होत गेलेल्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना डॉक्टरांच्या मनात शंका येऊन गेली- 'हा आता पुन्हा नजरेस पडेल?'

पण तो पुन्हा दिसला. त्याचा हात पूर्णपणे बरा झाला होता. डॉक्टरांच्या

उपकाराचा उतराई होण्यासाठी म्हणून रुग्णालयासाठी एक गोण तांदूळ घेऊन तो आला होता.

या फिरत्या दवाखान्याचा कार्यक्रम कधी आखीवरेखीव साचेबंद असा पार पडतच नसे. कारण कधी काय अतर्क्य घडेल हे सांगता येत नसे. अगदी चिपाडांनी चिकटलेल्या पापण्यांआड काय भीषण घडलं असेल हे न सांगता येण्याइतकं अतर्क्य.

हिंदुस्थानातला हा 'डोळे येण्या'चा प्रकार डॉक्टरांना फार बैचेन करायचा. डोळे गच्च चिकटायचे. अगदी आठवडेच्या आठवडे. मुलांच्यात त्याचा प्रादुर्भाव अधिक. पण डॉक्टर हर प्रयत्नाने त्या पापण्या अलगदपणे मोकळ्या करायच्या.

सारा अंध:कार त्या पापण्यांआड.

दृष्टी केव्हाच गेलेली असे.

मग डॉक्टर त्या मुलाच्या आईला अगदी कळवळून विचारायच्या, 'बाई, का ग आणलं नाहीस याला यापूर्वीच माझ्याकडे?'

'आम्ही बघा, देवीची जत्रा करून आलो. देवीची पूजा केली. तिथला पुजारी म्हणाला सोनाराकडून चांदीचे डोळे करून आण आणि देवीला वाहा. तुझ्या लेकराचे डोळे बरे होतील.

'आता एवढा दूरचा पल्ला; पण आम्ही एक खेप पुन्हा गेलो. पैसा तर खूप खर्चला. चांदीचे डोळे वाहिले. सारं किडुकमिडुक विकलं पाहा त्यासाठी. पण या लेकराचे डोळे जसेच्या तसेच. आता काही नाही का हो करता यायचं डॉक्टर?' डॉक्टर काय उत्तर देणार?

ती दुसरी एक बाई डॉक्टरांना सांगत नव्हती का?

'मी त्याला चांगले दोन आणे दिले बघा आणि त्याने ह्याऽ मूठभर माशा कानातून काढून दाखवल्या की! पण बाई, अजूनही कानातील गुणगुण थांबली नाही. तुम्ही बघा की जरा.'

तो दोन आणे घेऊन गेलेला वैदू आता कुठे सापडणार होता हिला? तसेच ते मोतीबिंदू सुईने सरकवणारे हकीम. त्यांच्या या कसबामुळे रुग्णाला दिसू लागे हे खरे; पण अल्पकाळच. कारण ते कसब वापरताना हात, सुई, कापडीपट्टी, रुग्णाचा डोळा यांच्या स्वच्छतेबद्दल कोणतीही दक्षता घेतली न गेल्याने त्या डोळ्याला नवीनच विकार जडायचा. तो बळावायचा. शेवटी अंधत्व! 'तुला आता चांगलं दिसतं का रे?' नुकताच मोतीबिंदू सरकवून घेतलेल्याला डॉक्टरांनी विचारलं.

'नीट नाही. अर्धंमुर्धंच दिसतंय. पण याला जबाबदार मीच अम्मा! अख्खा रुपया द्यायचा सोडून अर्धाच दिला ना, म्हणून हे असं!'

दोष कोणाला द्यायचा? त्या चांदीचे डोळे वाहायला सांगणाऱ्या पुजाऱ्याचा हेतू तर काही दुष्ट नव्हता! त्याने त्याच्या अकलेने आणि श्रद्धेने उपाय सुचवला. दोष या अडाणी लोकांचाही नाही.



दोष होता त्यांचा- ज्यांना उपाय माहीत आहेत पण ते अंमलात आणण्यासाठी दक्ष नाहीत.

आणि मीही त्यांतलीच एक नाही का?

डॉक्टर बेचैन झाल्या.

फिरत्या दवाखान्यासाठी एक मार्ग निवडला तरी आजूबाजूचे दहा मार्ग उपेक्षित होते. एका गावठाणाशी थांबले तरी शेकडो गावठाणांत डॉक्टर म्हणजे काय हेही माहीत नव्हते. एक रुग्ण तपासला तरी हजारो रुग्ण तशाच यातना भोगत होते.

'आपले प्रयत्न फारच थिटे आहेत आणि अजून काय करू शकतो हे समजल्यावर तर अगदीच थिटे वाटतात.' म्हणून डॉ. आयडांनी शक्यतो लवकर नर्सिंग स्कूल सुरू करण्याचा निश्चय केला.

मद्रासमध्ये मेडिकल कॉलेजमध्ये मुली शिकत होत्याच. पण अधिकाधिक ख्रिश्चन मुली प्रशिक्षित होऊन त्यांनी खेड्यापाड्यांतून जावे, सेवा द्यावी म्हणून या नर्सिंग स्कूलची गरज फार निकडीची होती.

□

डॉ. आयडांची दोन स्वप्नं प्रत्यक्षात अवतरत होती. वेलूरजवळच्या पन्नास खेड्यांना तरी नियमितपणे- आठवड्यातून एकदा का होईना- वैद्यकीय सेवा मिळत होती आणि डेलिया हॉग्टनने आपला तामीळ भाषेचा अभ्यासक्रम पुरा करून आता नर्सिंग स्कूल पद्धतशीरपणे सुरू केलं होतं.

१९०९ च्या अखेरीस निवडक १५ विद्यार्थिनी घेऊन नर्सिंग स्कूल सुरू झालं. या पंधरा विद्यार्थिनींपैकी प्रत्येकीची डॉक्टरांनी वैयक्तिक पातळीवर दखल घेतली. संबंध प्रस्थापित केले. मोकळा मिळालेला प्रत्येक क्षण या मुलींच्या अडचणी सोडवण्यासाठी वापरला. आठवड्यातून काही तास त्या शरीरशास्त्र आणि शस्त्रक्रिया या विषयांचे अध्यापन करायच्या.

□

डोळ्यात भरण्यासारखी प्रगती दिसत असूनही डॉ. आयडा मात्र संतुष्ट दिसत नव्हत्या. वेलूरच्या जवळपासची हजारो गावठाणं मोटारीच्या आवाक्यातील असूनही तिथवर वैद्यकीय सेवा पोहोचू शकत नव्हती हे खरे दु:ख होते. त्यांच्या हाताखाली तयार झालेल्या परिचारिका; त्यांचे ते शेल रुग्णालय आणि पुंगानूर, गुडियाट्टम् येथील ते दोन दवाखाने चालवण्यास पुरेशा नव्हत्या. आणि डॉ. आयडा तर आणखी काही दवाखाने सुरू करायचा विचार करत होत्या. म्हणजे आणखी काही डॉक्टर्स हवेत. पण हे जुळवून आणायचे कसे? पुरेशी आर्थिक व्यवस्था झाली तर मिशन बोर्ड आणखी काही डॉक्टर्स पाठवू म्हणत होते. पण इथं तर दुष्काळात तेरावा महिना. डॉ. हार्ट प्रदीर्घ सुट्टीवर गेलेल्या. डॉ. आयडा एकट्याच. मिशन

बोर्ड तरी पाठवून किती डॉक्टर्स पाठवील? एक... दोन... तीन... पाच... दहा? तेवढे तरी पुरे थोडेच पडणार आहेत? नाहीच.

अमेरिकेत दर सहाशे लोकांमागे एक डॉक्टर आणि इथे दहा हजारांमागे पुरता एकही नव्हता. कधीच का पुरे पडणार नाहीत? मग इथल्या वैद्यकीय गरजांचं काय?

४ ऑक्टोबर : hydatid cyst शस्त्रक्रिया. कठीण प्रसूती. माता वय वर्षे तेराची. वारली.

७ ऑक्टोबर : रात्री रुग्णालयात बोलावणे, सकाळी न्याहारीलाही फुरसत नाही. एकदम दुपारी दोनला जेवण.

१५ मार्च : १३ वर्षांची बालिका. प्रसूतीसाठी योनिमार्ग अति अरुंद. सुलभ प्रसूतीसाठी काप देऊन वाट मोठी करावी लागली. Vaginal fistula on wee girl of 13.

१९१० साल उजाडलं ते पुढील अनेक वर्षांसाठी दुष्काळ पोटात घेऊनच.

दुष्काळाचे दुष्परिणाम सर्वत्र जाणवत होते. गोरगरीब अगदी टेकीस आले होते. जेमतेम शरीर तगवण्यापुरतं अन्न मिळत होतं. जेवण दिवसाआड व्हायचं. जेवण म्हणणं धाडसाचंच. पोटाची वखवख शांत करायला आधी काही-बाही पाला खायचा. मग त्यावर गोळाभर भात किंवा रागी. दिवस जाऊ लागले तसतशी हलाखी वाढू लागली. रोगराईत प्रचंड वाढ झाली.

त्या वर्षी डॉ. आयडांनी १०४८ स्त्री-रुग्ण शेल रुग्णालयात दाखल करून त्यावर इलाज केले आणि १४,६८४ बाह्य रुग्णांवर इलाज केले.

तशात प्युजो मोटार नादुरुस्त झाली. साफ बंद पडली. गुडियाट्टम्ला जाण्यासाठी मग डॉक्टरना रेल्वेवर अन् बैलगाडीवर विसंबावे लागे. परंतु आता त्या ठराविक दहा थांब्यांवर रुग्ण आपली वाट पाहात असतील. खरं तर त्यांना आताच आपली जास्त गरज आहे, या विचाराने डॉक्टर अस्वस्थ व्हायच्या. रेल्वेने गुडियाट्टम्ला जात असताना एखाद्या स्थानकावर ओळखीचा चेहरा आत डोकवायचा. म्हणायचा-

'माई, तुम्ही विसरलात की काय? पुन्हा कधीच का येणार नाही तुम्ही? तुम्ही यायच्या बंद झालात तेव्हापासून किती तरी माणसं दगावली. लोक तुमची फार आठवण काढतात. म्हणतात- डॉक्टर अम्माचा हसरा चेहरा पाहिला की अर्धा आजार पळून जातो.'

एकदा अशाच एका स्थानकावर एकाने त्यांच्या हातात चार आणे कोंबले. गयावया करून त्यांच्याकडे हिवतापावर औषध मागू लागला. त्या वेळी डॉक्टरांच्या हाताशी उपलब्ध असलेल्या औषधांच्या साठ्यात हिवतापावरचं औषध नव्हतं.

आपण गुडियाट्टमहून परतते वेळी हिवतापावरचं औषध आणून देऊ असे डॉक्टरांनी कबूल केले. 'मी इथेच तुमची वाट पाहात उभा असेन. माझ्याकडे तुम्ही औषधाची पुडी फेका,' तो आशेने म्हणाला.



त्या रात्री परतीच्या प्रवासात त्या स्थानकावर वाट पाहात एकाकी उभा असलेल्या रुग्णाच्या दिशेने डॉक्टरांनी क्विनाइन पावडरचे पाकिट फेकले.

रुग्णालयावर कामाचा ताण पडत होता. आता तिथे अठरा परिचारिका आणि चार कंपौंडर्स काम करीत होत्या तरी पसारा आवाक्यात नव्हता.

अध्यापनामुळे डॉक्टरांच्या जबाबदाऱ्यांत वाढच झाली होती. तीन विषय शिकवायच्या त्या.

'मेरी टॅबर-शेल रुग्णालय' आता फारच अपुरं पडत होतं. व्हरांडेसुद्धा तुडुंब भरलेले. खाटेवर आणि खाटेखाली बिछाने घालून रुग्णांची सोय लावावी लागे. रोज दीड-दोनशे बाह्यरुग्णांवर उपचार करावे लागत. डॉक्टरानी शेवटी मिशन बोर्डाला पत्र पाठवून रुग्णालय वाढविण्यासाठी तीन हजार डॉलर्सची मागणी केली.

•

खरं तर डॉक्टरांच्या डोक्यात वेगळेच विचार भराऱ्या मारत होते. नुसती रुग्णालयाची वृद्धी करून काय भागणार? चांगले पन्नास हजार डॉलर्स खर्चून आधुनिक रुग्णालय आणि नंतर त्याला जोडून वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याची योजना मिशन बोर्डाच्या गळी कशी उतरवावी या विचारात त्या होत्या.

या नवीन योजनेने त्यांना कोडाईकनालच्या उन्हाळी सुट्टीचं सुख काही लाभू दिलं नाही. नेहमीप्रमाणे यंदाही त्यांनी खेळांच्या स्पर्धात भाग घेतला. पण नेहमीप्रमाणे उत्साह आणि जोश त्यात नव्हता.

आता त्या चाळिशीला आल्या होत्या पण उत्साह आणि जोश विशीला लाजवणारा असे. चालण्यातही तडफ बरोबरच्याला धावायला लावी. घोडदौडीसाठी सर्वांत वेगवान घोडा त्यांना हवा असे. सर्वांत उंच शिखरावर ह्याच आधी चढून पोहोचायच्या. अवघड चढणीवर ह्या सर्वांत पुढे, टेनिसही तडाखेबंद खेळत. ह्या घोडदौडी, इंग्लिश-अमेरिकन क्लब्जचे टेनिस-सामने, सहली त्यांच्या सदाव्यग्र मनाला विसावा देत. सर्व काळज्या काही काळ तरी दूर राहात. पुन्हा कामाला जुंपून घेण्यासाठी मनाला हवी असणारी ताकद अन् उत्साह गोळा करायला ही उन्हाळी सुट्टी उपयोगी पडे.

या खेपेस मात्र वैद्यकीय महाविद्यालयाची कल्पना त्यांना चैन पडू देत नव्हती. त्या कल्पनेने त्यांचा जणू ताबाच घेतला होता. त्यामुळे त्यांच्या खेळण्यात, वागण्यात नेहमीचे चैतन्य नव्हते. आपली योजना प्रत्यक्षात कशी साकारावी हाच ध्यास लागला होता. न राहवून शेवटी त्यांनी आपले विचार तिथे दर वर्षी भरणाऱ्या सर्व संप्रदायी मिशनरी डॉक्टर्सच्या परिषदेपुढे मांडले. दक्षिण हिंदुस्थानात स्त्रियांसाठी वैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी करण्याचा ठराव त्यांनी सभेपुढे मांडला. या योजनेचा मसुदा आपण शक्यतो लवकर सादर करू असे त्या म्हणाल्या.

त्यांच्या या अनपेक्षित वक्तव्याने आणि मागणीने सभेत खळबळ उडाली. इतरांचे सोडाच पण डॉ. आयडांचा भाऊ डॉ. ल्यू हाही त्यांच्याकडे आश्चर्याने

पाहातच राहिला.

'अशक्य!' एक प्रतिक्रिया.

'डॉक्टर आयडा स्कडर, अशा योजना साकार करायला किती खर्च येतो, याचा काही अंदाज आहे का तुम्हाला?' दुसऱ्याने छेद दिला.

'या हिंदी स्त्रियांना वैद्यकीय शास्त्रात पारंगत करणे अजून शंभर वर्षं तरी जमणार नाही-' तिसऱ्याचा ठाम विश्वास.

'मिशन बोर्डस् अशा योजनांना पाठिंबा देणार नाहीत-' चौथ्याचा हवाला.

'दक्षिण हिंदुस्थानात पुरुषांसाठी आधीच सात वैद्यकीय महाविद्यालये असताना हे आणि कशाला?' एक संतुष्ट आत्मा.

'असं झालं तर छानच होईल. पण...!' बुडत्याला वाचवणारी काडी.

डॉ. आयडांना दोघींचा पाठिंबा मिळाला. एक ॲना कग्लर. या फिलाडेल्फिया मेडिकल कॉलेजच्या पदवीधर. १८८० च्या सुमारास मद्रासला आल्या तेव्हा त्यांच्यापाशी फक्त दोनशे डॉलर्स होते. त्यांच्याच धडपडीतून गुंटूरला ल्युथेरन्स पंथाच्या मिशनचं सुरेख रुग्णालय उभं राहिलं. दुसऱ्या, डॉ. मॅकफिल. फ्री चर्च ऑफ स्कॉटलंड मिशनच्या. यांनी डॉ. आयडांचा प्रस्ताव उचलून धरला. या दोघींच्या पाठिंब्यामुळेच त्या परिषदेत या प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी एक मंडळ नेमावे एवढे तरी कमीत कमी मान्य झाले.

या अभ्यासमंडळांची बैठक १९१२ च्या उन्हाळ्यात कोडाईकनालला भरली. डॉ. कग्लर आणि डॉ. मॅकफिल या दोघी अभ्यासमंडळात असल्याने त्यांनी सादर केलेला अहवाल डॉ. आयडांच्या मागणीस पूरक असाच होता. या अभ्यासमंडळातील पुरुष सदस्यांनीही अनुकूलता दर्शवली होती. सर्व ख्रिश्चन धर्मसंप्रदायांचे मिळून एक महिला वैद्यकीय महाविद्यालय स्थापावे या मागणीचा त्यांनीही पुरस्कार केला. आता प्रश्न उरला होता तो महाविद्यालयासाठी जागा निवडण्याचा, वसाहतवाल्या सरकारची (इंग्रज सरकारची) परवानगी आणि आर्थिक मदत मिळवण्यासाठी कमीत कमी चार ख्रिश्चन धर्मसंप्रदायांच्या मिशन बोर्डांच्या गळी ही योजना उतरवून निधी उभारण्याचा. या योजनेसाठी अनुकूल मत दर्शवूनही अभ्यासमंडळातील पुरुषवर्ग योजनेच्या यशस्वितेबद्दल साशंक होता. उलट स्त्री-वर्ग फार मोठी आशा आणि उमेद बाळगून होता.

डॉ. आयडांचा उत्साह तर उतू जात होता. त्यांनी या महाविद्यालयासाठी एक जागा कधीपासून हेरून ठेवली होती. वैद्यकीय महाविद्यालयासाठी अगदी आदर्श अशी जागा वेलूरच्या दक्षिणेस चार मैलांवर आर्नीच्या रस्त्याला लागून, चारी बाजूंनी टेकड्यांनी वेढलेली आणि वापरात नसलेली दोनशे एकर जागा. ती जागा पाहिली की डॉक्टरांच्या नजरेसमोर नियोजित महाविद्यालयाची वस्तू तरळू लागे.

'आहे तेच पुरेसं नाही का ग तुला? तुझं रुग्णालय सांभाळता सांभाळताच केवढी धावपळ होते तुझी! कशाला जबाबदाऱ्या वाढवून घेतेस एक एक?' सोफिया



स्कडर आपल्या मुलीला रागेजून म्हणाली.

'अग, तेवढं पुरेसं नाही म्हणून तर-!' डॉक्टर हसत उत्तरल्या.

१९१३ सालानं डॉक्टरांना दगा दिला. त्या चांगल्याच आजारी पडल्या. वेळेपूर्वीच त्यांना एक वर्षाच्या रजेवर मायदेशी पाठवण्याची शिफारस मिशनने केली. पण आता डॉक्टर हिंदुस्थान सोडणार तरी कशा? मेडिकल स्कूल तर गर्भावस्थेत होते. डॉक्टरांच्या धीरगंभीर अन् कुशल उपचारांची त्याला नितांत गरज होती. नाही तर त्याचा जन्मच झाला नसता. वेलूरखेरीज अन्य स्थळेही त्याच्या जन्मासाठी सुचवली जात होती- बेंगळूर, म्हैसूर, नेल्लोर, मदुरा इत्यादी. पण वेलूरची बाजू ठामपणे मांडणारी डॉ. आयडाखेरीज अन्य कोणी व्यक्ती नव्हतीच. नव्हे असूच शकत नव्हती. त्यामुळे त्यांनीच रदबदली करून अमेरिकेऐवजी कोडाईकनाललाच विश्रांतीसाठी तीन महिने राहाण्याचे मान्य केले. •

या वेळी त्या कोडाईनजीक तीन मैलांवरच्या रेस्टालरिंग या खेड्यात राहायला गेल्या. या अवेळी मिळालेल्या सुट्टीमुळे नेहमीच्या घोडदौडी, टेनिसचे सामने, सहली इत्यादींचे उत्साही वातावरण भोवती नव्हते. त्यामुळे डॉक्टरांना तिथे फार एकाकी आणि निष्क्रिय वाटलं.


रेस्टालरिगजवळ एक रुंद माथ्याची, उंच छानशी टेकडी होती. तिथे डॉक्टर रोज फिरायला जात. त्यांना ती जागा फार आवडे. त्यांनी तिला नावही दिलं होतं 'हिल टॉप'. ह्या टेकडीवर आपलं घर असावं असं त्यांच्या मनाने घेतलं आणि त्यांनी त्या टेकडीविषयी चौकशी करायला सुरुवात केली. ती टेकडी कोडाईकनाल नगरपालिकेच्या ताब्यात होती आणि तिला मागणीही खूप असल्याने किंमतही तशीच मोजावी लागणार होती.

प्रकृती सुधारताच डॉ. आयडा वेलूरला आल्या.

आता त्यांच्या डोक्यात मेडिकल स्कूलबरोबर फुगडी घालायला 'हिल टॉप' होती.

□□

# लागण



१९१३ च्या अखेरीस, सौ. पिबॉडी, सौ. मॉंटगोमरी आणि तिच्या दोन मुली पहाटे तीनच्या सुमारास काटपाडी रेल्वेस्थानकावर उतरल्या.

सौ. पिबॉडी एका खास कामगिरीवर द. हिंदुस्थानात आल्या होत्या. मद्रासमध्ये महिलांसाठी युनियन ख्रिश्चन आर्टस् कॉलेज सुरू करता येईल का याचा अभ्यास करण्यासाठी त्यांची नेमणूक झाली होती. डॉ. आयडा स्कडर यांची वैद्यकीय सेवा त्यांच्या कानी आलेली असल्याने त्यांनी वेलूरला एक धावती भेट योजली होती.

या प्रवासी पथकाला उतरून घ्यायला डॉ. आयडांचा माणूस स्थानकावर आला होता.

'आपण या आडगावात आलो आहोत तरी कशाला? आपलं वेळापत्रक इतकं काटेकोरपणे बसवलेलं आहे. त्यात तर वेलूरचा अजिबात समावेश नव्हता.' 'नाही. पण डॉ. स्कडरनी इतक्या अगत्याने आणि आग्रहाने पत्रं पाठवलीत! जास्त वेळ नाही थांबता आलं तर उभ्या उभ्या तरी भेटू. उद्या लवकरच मद्रासला जायला निघू म्हणजे झालं.' सौ. पिबॉडींनी त्या मॉंटगोमरी कन्येची समजूत घातली.

डॉक्टरांची मोटार त्यांना घेऊन बंगल्याच्या आत शिरली. बंगल्याच्या दरवाज्यात एक स्त्री दिवा हातात उंच धरून उभी होती. शुभ्र वसना. अकाली पिकलेले केस अन् त्यावर किंचित सोनेरी झाक. तिचे निळे डोळे आनंदाने कसे नाचत होते.

'तुम्ही आता प्रवासाने खूप थकला असाल नं. तुमच्या खोल्या तयार आहेत. छान आराम करा, सकाळी न्याहारीच्या वेळी बोलूच आपण,' डॉक्टर पाहुण्यांना म्हणाल्या.

दोन मुलींपैकी एकजण आपल्याभोवती मच्छरदाणी गादीखाली खोवता खोवता दुसरीला म्हणाली- 'मी आजवर पाहिलेली सर्वांत देखणी स्त्री आणि हास्य तर किती मोहक!'

सकाळी नाश्त्याच्या वेळी डॉ. आयडा आणि सौ. पिबॉडी, दोघी टेबलाच्या दोन टोकांना समोरासमोर बसल्या बसल्या एकमेकींना जोखत होत्या. त्या दोघीत बरंच साम्य होतं. निळे तेजस्वी डोळे. बांधेसूद शरीरयष्टी. चलाख हालचाली या शारीरिक साम्यापलीकडे त्यांच्या विचारप्रणालीतही साम्य होतं. दोघीही प्रगती मोजायच्या त्या मैलांच्या हिशेबात. तसू-इंचात नव्हे.

खरं तर सौ. पिबॉडींना वेलूरमधे किंवा वैद्यकीय शिक्षणात खास काही स्वारस्य



नव्हते. डॉ. आयडांची भेट आणि त्याचं रुग्णालय डोळ्यांखालून घालणं एवढाच त्यांच्या भेटीमागे हेतू होता.

आपल्या स्वप्नांना मूर्तरूप देताना या स्त्रीचा आपल्याला काही उपयोग होईल असं आयडांना वाटलं. वाटलं, सौ. पिबॉडींना आपली स्वप्नं सांगावीत. पण त्यांनी आपलं तोंड बंदच ठेवलं

नकोच. त्यापेक्षा सौ. पिबॉडींनाच माझी स्वप्नं पडू देत!

'मला वाटतं तुम्ही खूप दमल्या आहात. आजू-बाजूला हिंडून काही पाहाणं तुम्हाला झेपणार नाही आणि पुन्हा मी असणार माझ्या कामात. तेव्हा तुम्हाला कंटाळा तर नाही ना यायचा?'

'आम्हाला तुमच्याबरोबर यायला आवडेल डॉक्टर. ही इथली घरं आतून कशी असतात ते पाहायला मिळेल. चित्रात दिसणाऱ्या त्या खेड्यासारख्या खेड्यातून लोक कसे राहतात ते तरी कळेल.'

'ठीक. आता गावातल्या काही घरी रुग्ण-स्त्रिया तपासायला जायचंय. नंतर जवळच्या खेड्यातही. तुमची तयारी अन् इच्छा असेल तर चला.'

त्या चौघीजणी डॉक्टरांच्या बरोबर निघाल्या.

ही काही पूर्वनियोजित आखीवरेखीव सहल नव्हती. आपल्या दैनंदिन कार्यक्रमात जराही बदल न करता डॉक्टरांनी ड्रायव्हर आणि मदतनीस यांना बरोबर न घेता त्या चौघींना गाडीत सामावून घेतले. स्वत: गाडी चालवायला बसल्या. त्या दिवशी ज्या थांब्याचा वार होता त्या दिशेने निघाल्या.

गाडी त्या खेड्यात पोहोचली.

'डोळ्यांवर विश्वासच बसत नाही ग!' त्या दोन कन्यांपैकी एकजण परतीच्या प्रवासासाठी गाडीत बसता बसता साश्रूनयनांनी म्हणाली.

'मातीचं घर. खिडकी मातीची. मातीचीच जमीन. बाजलं, टोपल्या अन् गाडगी, हाच यांचा संसार. या लोकांकडे काहीच नसतं की काय? आणि हा हिंदुस्थान तर या अशाच खेड्यांनी भरलेला आहे म्हणे. खरं की काय?'

'खरंच, जवळजवळ सात लक्ष खेडी. अशीच सगळी,' सौ. पिबॉडी उत्तरल्या.

'नाही. अशीच नाहीत. डॉ. आयडा त्यांना दुरुस्त करत म्हणाल्या, 'त्या बहुतेक खेड्यांतून लोकांनी डॉक्टर कसा असतो तो पाहिलेलासुद्धा नाही!'

सौ. पिबॉडी मुकाट राहिल्या.

मग त्या सगळ्याजणी गावातल्या एका श्रीमंत मुसलमान कुटुंबाच्या घरी गेल्या. घर कसलं? भला भक्कम चौसोपी वाडा. त्या घरात या साऱ्यांचं आगतस्वागत छानच झालं. सुरेख पोशाख आणि भरगच्च दागिने ल्यालेल्या षोडशवर्षीय सुनेने सासूच्या आग्रहाखातर त्यांना १२१ वे साम म्हणून दाखवले. (या सुनेला इंग्रजी शिकवायला ॲनी हँकॉक यायची.)

'I will lift up mine eyes unto the hills..'

'शाब्बास मुली! हे म्हणताना तुझ्या नजरेसमोर वेलूरच्या परिसरातील टेकड्या आल्या असतील ना?' सौ. पिबॉडींनी कौतुकाने विचारले.

'मी तर त्या कधीच पाहिलेल्या नाहीत.'

पाहुण्या परतल्या.

गप्प गप्पच.

'कल्पना करवत नाही. कशा या स्त्रिया बंदिस्त अंगणात, कोंदट खोल्यांतून जगतात? या आधीच्या घरी गेलो होतो, त्या मुलाला तर किती ज्वर होता! डॉ. स्कडर, तुम्ही त्या घरी तपासायला गेला नसतात तर तिला सरकारी दवाखान्यात तरी नेलं असतं का हो?'

'कधीच नाही. कारण, त्या दवाखान्यात फक्त पुरुष डॉक्टर्स आहेत आणि हिंदु-मुस्लिम स्त्रिया- विशेषत: उच्चवर्णीय -जीव गेला तरी परपुरुषाला आपल्या शरीराला स्पर्श करू देत नाहीत!'

'या देशात स्त्रियांची संख्या किती?'

'पंधरा कोटी.'

संभाषणाची गाडी योग्य दिशेने पुढे जात होती. डॉक्टरांना आनंद वाटत होता.

'किती महिला डॉक्टर्स आहेत?'

'जवळपास दीडशे. त्यातल्या बहुधा पन्नासजणी रजेवर.'

'मग इथल्याच हिंदी स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण देऊन डॉक्टर्स का नाही बनवत?' एका कन्येने विचारलं

पोरीला उदंड आयुष्य लाभो. कसा लाख मोलाचा प्रश्न विचारलास!

डॉक्टर या प्रश्नाने आणखीनच सुखावल्या. त्या माहिती देऊ लागल्या, 'उत्तर हिंदुस्थानात लुधियाना इथे एका मिशनने ही सोय केली आहे. पण ते मेडिकल स्कूल इथून हजार मैलांवर. हिंदूच काय पण इथले धर्मांतरित ख्रिश्चन पालकही आपल्या मुली इतक्या दूर, अनोळखी वातावरणात अन् समाजात पाठवायला राजी होत नाहीत. आता काहींनी इथेच एखादं मेडिकल स्कूल सुरू करावं, असा विचार चालवलाय. खरं तर काही ख्रिश्चन संप्रदायांची मिळून एक समिती स्थापन झालीय ती यावरच विचार करण्याकरता.'

'छान कल्पना आहे ही. अनेक ख्रिश्चन संप्रदायांनी एकत्र येऊन इथल्या स्त्रियांसाठी मेडिकल स्कूल स्थापायची कल्पना खरोखरच स्तुत्य. अमेरिका आणि इंग्लंडच्या महिलाही या योजनेला पाठिंबा देतील तर अधिकच बरं. तुला कसं काय वाटतं?' सौ. माँटगोमरींनी सौ. पिबॉडींना विचारले.

'हूंऽ ठीक आहे.' सौ. पिबॉडी थंडपणे उत्तरल्या.

डॉक्टरांनी मोठा आवंढा गिळला.

कठीणच काम दिसतंय. दुसऱ्याच्या तंत्राने वागणारी ही बाई नाही हे नक्की. स्वयंप्रज्ञ अन् स्वयंसिद्ध.



डॉक्टर आयडा गप्प बसल्या.

डॉक्टरांची नेहमीची धावपळ सुरू झाली. दवाखाना, रुग्णालय उरकेपर्यंत दुपारच्या चहाची वेळ झाली. पाहुण्यांना आता परतायला गाडी नव्हती. दुसऱ्या दिवशी पहाटेची गाडी होती. तेव्हा आजची संध्याकाळ फुकट न दवडता डॉक्टरांनी चहा-पानाचा कार्यक्रम आखला. गावातील प्रतिष्ठित हिंदू-मुस्लिम स्त्रियांना बोलावलं. तामीळ जाणणाऱ्या ॲनी हँकॉक आणि डॉ. आयडा या पाहुण्याच्या दुभाष्या. समारंभ छानच झाला. 'काही वर्षांपूर्वी हे दृश्य स्वप्नातही पाहायला मिळालं नसतं,' ॲनी सांगत होती, 'मी तेरा वर्षांपूर्वी इथं आले तेव्हा या स्त्रिया आम्हाला दारातही उभ्या करत नव्हत्या. या रुग्णालयाला त्यांच्या आयुष्यात किती महत्त्वाचं स्थान आहे हे यावरूनच ध्यानात येईल.'

डॉ. आयडांनी संधी साधली- 'गावाबाहेर एक रम्य दरी आहे. तुम्ही आता थांबलाच आहात तर तीही पाहून जा.'

पुन्हा एकदा त्या साऱ्याजणी त्या छोट्या मोटारीने निघाल्या.

दक्षिणेकडचे तोरापाडी खेडे ओलांडून गाडी खडकाळ भागात शिरली. मोठं टेकाड लागलं तशी गाडी थांबली. मग त्या पायी पायी चढण चढून एका रुंद कातळावर येऊन थांबल्या.

'ती पाहा जागा,' आपले दोन्ही हात समोर पसरत डॉक्टर म्हणाल्या, 'ही दोनशे एकर जमीन आहे. कोणाच्याही मालकीची नाही. शेळ्या-मेंढ्या चरत असतात.'

'हा तर उजाड माळ!' सौ. पिबॉडी एक अख्खं वाक्य बोलल्या.

> हा उजाड माळ! अं ऽ हं! हिरवी मखमलीची हिरवळ पसरलीय. गुलमोहोर फुललाय. सुंदर लतामंडप सजलेत. ठायी ठायी फुलझाडं डोलताहेत. मध्ये मोठमोठ्या दगडी भक्कम इमारती. त्यांचे प्रशस्त व्हरांडे. पांढऱ्या साडीतल्या मुलींनी रास्ते भरून गेलेत...

'आणि पाण्याचं काय?' सौ. पिबॉडींनी डॉक्टरांची समाधी तोडली,

'पाणी?'

'पाण्याअभावी कोरडं वाळवंट हे. या दोनशे एकरात आपल्याला कुठे पाणी लागलं तर बरं होईल.'

आपल्याला? म्हणजे-!

'मला तशी शक्यता वाटते. मी इथल्या गावकऱ्यांशी त्यासंबंधी बोलले आहे. ते म्हणाले इथे झरे लागतात.'

'मला एक सुचतंय,' इतका वेळचा थंडपणा सोडून सौ. पिबॉडी बोलू लागल्या, 'मी दिवसभर त्याच विचारात आहे. आता जरा कोडं सुटलंय. वैद्यकीय महाविद्यालयासंबंधीच आपण सकाळी विचार करत होतो नाही का?'

'हो!' डॉ. आयडांचा श्वास रोधला.

'तुम्हीच ते सुरू केलं पाहिजे. डॉ. आयडा स्कडर तुम्हीच ते सुरू करणार आहात आणि तेही या इथेच!'

'पण-' डॉक्टर गोंधळून गेल्या. सकाळपासून थंड अन अनुत्सुक वाटणारी ही बाई!

'तुम्ही आता पण बिण काही आड आणू नका. संकटं, अडचणी येणारच; पण त्याविरुद्ध तुम्हाला एकाकीपणे लढावं लागणार नाही. इंग्लंड-अमेरिकेतील हजारो स्त्रिया तुम्हाला या कामी साथ देतील. फक्त त्यांना आपण या हिंदी स्त्रियांची गरज जाणवून दिली पाहिजे. मला वाटतं तुम्ही आणि मी मिळून अडचणींचे डोंगर पार करू!'

डॉ. आयडांनी रोधून धरलेला श्वास सोडला.

आलेल्या पाहुण्या उज्ज्वल भविष्याची ज्योत तेवती करून गेल्या होत्या हे खरं; पण आज तरी डॉ. आयडांना अडचणीतून पार पडावं लागत होतं. महाविद्यालय सुरू करण्याचं स्वप्न- भव्य स्वप्न बाजूला ठेवून सध्याची आत्यंतिक गरज म्हणजे रुग्णालयाचा तातडीने विस्तार करण्याकडे पाहावं लागत होतं.

मिशन बोर्डाकडे पुरेसा पैसा नव्हता. काटकसरीचं धोरण चालू होतं. रुग्णालय चालविण्यासाठीसुद्धा पुरेसा पैसा उपलब्ध होत नव्हता. गरीब रुग्णांना तरी पैसे कसे आकारायचे? ज्यांना औषध विनामूल्य मिळावे अशी डॉक्टरांची इच्छा होती, त्यांच्याकडून पैसे घेणे त्यांना मानवणारे नव्हते; पण त्यांची खरी तक्रार होती श्रीमंतांबद्दल. ज्यांना पैसे भरणे परवडत होते अशा रुग्ण-स्त्रियाही औषधोपचारानंतर देणगी तर सोडाच; पण झालेला खर्चही संपूर्णपणे देत नसत. मिशनला वर्षाकाठी जवळजवळ तीस हजार मोफत ताटे वाढावी लागत. कायम गजबजलेलं रुग्णालय चालवणं कठीण काम होतं.

येत्या सुट्टीत नव्या चार कक्षांची सोय करण्यासाठी आवश्यक निधी जमवण्याची परवानगी बोर्डाने डॉक्टरांना दिली. दोन हजार डॉलर्स मंजूर केले.

चार कक्षांसाठी फक्त दोन हजार? वैद्यकीय महाविद्यालय सुरू करायचं तर रुग्णालय दीडशे खाटांचं तरी हवं. ही सारी सोय करायची तर किमान पन्नास हजार डॉलर्स तरी हवेत. मग या दोन हजार डॉलर्सनी काय होणार? आणि पुन्हा हे एम. टी. शेल रुग्णालय कितीही वाढवलं तरी अपुरंच ठरणार होतं.

सी. पिबॉडींच्या भेटीमुळं आणि आश्वासनामुळं डॉ. आयडांच्या विचारांनी उचल खाल्ली- नवीन अद्ययावत रुग्णालय उभारायचंच.

डॉक्टरांनी मद्रास प्रेसिडन्सीकडे मदत मागितली. नकार. पण या नकारापुढे माघार खाऊन डॉक्टर गप्प बसल्या नाहीत. त्यांनी आपल्या कामाचा तपशील मांडून दाखवला. वेलूरच्या परिसरातील शेकडो खेडी, गावठाणं. तिथं जाऊन हजारो स्त्रियांवर केलेले उपचार; त्या परिसरातील लाखो स्त्रियांना असणारी वैद्यकीय सेवेची गरज, त्या साऱ्यांसाठी प्रशिक्षित परिचारिकांची गरज, सद्य:स्थितीत त्यांच्या अठरा प्रशिक्षित परिचारिका करत असलेले कार्य- हे सारं त्यांनी मुद्देसूदपणे मांडले.



पटवून दिले. त्या जिंकल्या. सरकारने त्यांच्या मागणीा तिसरा हिस्सा, परंतु जास्तीत जास्त वीस हजार डॉलर्स मदत देण्याचे मान्य केले. मात्र उर्वरित दोन-तृतीयांश म्हणजे जवळजवपळ चाळीस हजार डॉलर्स उभे करण्याची जबाबदारी डॉ. आयडांची. थोडक्यात, येत्या सुट्टीत अविश्रांत कष्टून पार पाडायचे एक जबरदस्त कर्तव्य.

डॉक्टरांनी आपल्या मिशन बोर्डाला पत्र पाठवून सारे खुलासेवार कळवले. परवानगी मागितली. बोर्डाने त्यांना जमीन खरेदीची आणि देणग्या स्वीकारण्याची अनुमती दिली. दक्षिण हिंदुस्थानच्या मिशनरी संघटनेने शिफारस केली की वेलूरच्या रुग्णालयास जोडून मेडिकल स्कूल असावे आणि त्याच्या प्राचार्या डॉ. आयडा स्कडर असाव्यात; त्या ग्रेट ब्रिटन आणि अमेरिकेतील या संघटनेच्या वतीने निधी जमा करतील.

डॉ. आयडांना संतोष झाला.

त्यांच्या अमेरिकेतील मैत्रिणी, त्यांची मोलकरीण थुंगम्माइतक्याच आपुलकीने आणि अगत्याने पुढे सरसावतील तर हे काम चुटकीसारशी पार पाडायला काय उशीर!

थुंगम्माचा पगार पाच रुपये. गेले काही महिने ती त्यातले फक्त तीन रुपयेच खर्चायची. दोन वाचवायची. एके दिवशी ती आपली साठवण घेऊन डॉक्टरांच्याकडे आली. 'हे एकूण सत्तर रुपये. आपल्या नव्या रुग्णालयासाठी!'

□

डॉ. आयडा स्कडर १९१४ च्या जुलैत मायदेशी सुट्टीवर निघाल्या त्या खूप मोठ्या आशा उराशी बाळगूनच!

पण-!

अमेरिकेत पाऊल ठेवण्यापूर्वीच सर्बियात एका आर्चड्यूकचा खून झाला आणि अवघा युरोप युद्धाच्या ज्वाळांनी वेढला गेला.

□

१४ नोव्हेंबर १९१४ ते १५ एप्रिल १९१५ डॉ. आयडा सतत बोलतच होत्या. सभांमागून सभा, व्याख्यानांमागून व्याख्यानं. आपल्या मागण्या त्या अमेरिकन जनतेपुढे मांडत होत्या, पटवून देत होत्या; परंतु अमेरिकन जनतेला बेल्जियमच्या तुलनेत हिंदुस्थान फारच परका. दूरचा. साऱ्यांचं लक्ष युरोपातील युद्धाकडे. त्यापलीकडे त्यांना काही दिसतच नव्हतं. युद्धनिधीसाठी पटकन खिशाकडे जाणारा हात डॉ. आयडांसाठी पुढे येत नव्हता. डॉक्टरांची ही अमेरिका-वारी तशी अयशस्वीच ठरली!

डॉक्टर बेचैन झाल्या. जसजसा काळ लोटू लागला तसतशी त्यांची बेचैनी वाढू लागली. सौ. पिबॉडी, डॉड, कॅथेराइन ह्या त्यांच्या मैत्रिणी त्यांना दिलासा द्यायला

नसत्या तर हे नैराश्य पचवणं त्यांना फार जड गेलं असते.

पण सुट्टी अगदीचं काही फुकट गेली नाही. चाळीस हजार डॉलर्स नाही, तरी दहा हजार डॉलर्स जमवू शकल्या आणि काही आश्वासनेही. शिवाय त्यांचे सन्मित्र डॉ. हिल (हे रिफॉर्म्ड चर्चचे प्रमुख) यांनी त्यांना एक नवीन फोर्ड मोटार भेट दिली आणि सर्वांत आनंदाची गोष्ट म्हणजे गर्ट्रुड डॉड येत्या काही महिन्यांतच हिंदुस्थानात अगदी कायमचे वास्तव्य करायला येणार होती. आपली संपत्ती, आपले सामर्थ्य यांचा खरा उपयोग डॉ. आयडांच्या कार्यात सहभाग घेण्यानेच होणार आहे असा तिला विश्वास वाटला आणि तिने हिंदुस्थानात येण्याचा निर्णय घेतला.

□

डॉ. आयडा परतीच्या प्रवासाला निघाल्या. पृथ्वीतलावरच्या एका तळहाताएवढ्या प्रदेशाला त्यांची नितांत गरज होती.

□

मिशनरी वैद्यकीय संघटनेने आणि गव्हर्नरने मेडिकल स्कूलच्या जागेला आणि इमारतीच्या आराखड्यांना हिरवा कंदील दाखवला. 'सारं सारं काही आपल्या मनासारखं झालंय नाही, आई?'

'फक्त त्यासाठी लागणारे दहा लाख डॉलर्स वगळून सारं', सोफिया स्कडरने डॉक्टरांचे पाय जमिनीला लावले.

'ते कुठे जातायत? मिळतील तेही!' डॉ. आयडांनी आईला धीर दिला.

मिळतील पण कधी?

युद्ध अजूनही चालूच होतं. सौ. पिबॉडी अगदी कसोशीने प्रयत्न करीत होत्या. सद्य:स्थितीत तर इंग्लंडमध्येही काही करता येण्याजोगं नव्हतं. नाही म्हटलं तरी डॉक्टरांचा जीव टांगणीला लागला होता. त्यात कॅथेराइन व्हान नेस्टचं पत्र आलं होतं. त्यांच्याच प्रॉटेस्टन्ट मिशनरी बोर्डाच्या अनेक सदस्यांनी हे रुग्णालय सर्व ख्रिश्चनपंथी मिशनरी संघटनेचे म्हणून स्थापायला आणि नंतर ते नियोजित वैद्यकीय महाविद्यालयाला जोडून घ्यायला हरकत घेतली होती.

इकडे हिंदुस्थानात डॉ. ॲन कग्लरला गुंटूरमध्ये अशाच विचित्र परिस्थितीला तोंड द्यावं लागत होतं. तिच्या ल्युथेरन मिशनरी बोर्डाला या वैद्यकीय महाविद्यालयाच्या भानगडीत न पडता फक्त ल्युथेरनच्याच कार्याशी निगडित राहावं असं वाटत होतं. यावर डॉ. कग्लरनं वैतागून विचारलं होतं- "ल्युथेरन आंत्रपुच्छाची शस्त्रक्रिया करणारे ल्युथेरन डॉक्टर्स तयार करण्यासाठी तुम्हाला ल्युथेरन वैद्यकीय महाविद्यालयच हवंय की काय?'

डॉ. आयडांनाही लोकांच्या या वृत्तीचं आश्चर्य वाटत होतं आणि खेदही.

□



१२ डिसेंबर १९१६ रोजी गर्ट्रुड डॉड वेलूरला येऊन पोहोचली. आठवडाभरात तिने आपला जम बसवला. रुग्णालयाच्या व्यवस्थापनातील बऱ्याचशा जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या.

मेरी टॅबरच्या स्वीकारापासून आत्तापर्यंत अशा अनाथ मुलांची संख्या पंधराच्या वर गेली होती. त्यांची देखभाल रुग्णालयाच्या परिचारिका करत. त्यांची सोय रुग्णालयाच्या व्हरांड्यात करण्यात आली होती. डॉडने त्यांची दखल घेतली. शिक्षण घेण्याच्या वयाची मुले मद्रासमध्ये वसतिगृहात ठेवली होती. मेरी टॅबरही तिथेच होती.

डॉड डॉक्टरांची सखी होती तशीच सल्लागार आणि सचिवही होती. तिच्या येण्याने डॉक्टरांवरच्या कामाचा ताण बराच कमी झाला.

दर बुधवारी नव्या फोर्ड गाडीने डॉड डॉक्टरांच्या सोबत गुडियाट्टम्ला जाऊ लागली. आता या दौऱ्यात दहाऐवजी चौदा थांबे झाले होते. प्रत्येक थांब्यावर एवढी गर्दी की जणू तिथे आठवड्याचा बाजार भरलाय. डॉक्टरांचे फूलवेड आता साऱ्यांना माहीत झाले होते. चांगल्या टवटवीत पुष्पगुच्छाच्या बदल्यात डॉक्टरांकडून तामीळभाषेत संदेश छापलेलं सचित्र रंगीत कार्ड मिळे. बुधवारी परतीच्या प्रवासात असे पुष्पगुच्छ घेऊन उभ्या असणाऱ्या मुलांमुळे वरचेवर डॉक्टरना घरी पोहोचायला उशीर व्हायचा. त्यांनी मग आपल्या ड्रायव्हरला या फुलवाल्यांसाठी गाडी न थांबवण्याची सूचना दिली.

पण हे लक्षात आल्यावर मुलांनी एका संध्याकाळी फुलांचा भला थोरला हार रस्त्यात आडवा धरला तर बिचारा हुसेन ड्रायव्हर मोटार थांबवेल नाही तर काय करील?

□

प्रत्येक थांब्यावर डॉ. आयडा गेल्या खेपेस अधिक आजारी असणाऱ्या रुग्णाची प्रथम चौकशी करीत. पण रुग्ण तरी असे, जरा बरं वाटलं की यायचे बंद व्हायचे. आता त्यांना शोधायचे कुठे आणि कधी?

सुरुवातीसुरुवातीला रस्त्याच्या दुतर्फा रांगा असत. सधन उच्चवर्णीय एका बाजूला आणि गरीब अस्पृश्य दुसऱ्या. पण डॉक्टरांनी हे फार दिवस खपवून घेतले नाही. साऱ्यांना मग एकाच रांगेत उभे रहावे लागे. दिवसभरात आताशी पाचशे तरी रुग्ण असे रस्त्यावर तपासले जात. दीड-दोन डझन किरकोळ शस्त्रक्रिया होत. मोठी शस्त्रक्रिया आवश्यक असेल तर रुग्ण गुडियाट्टम्ला नेला जायचा.

काही प्रसंगी डॉक्टरांना दोन थांब्यांमध्येही थांबावे लागे.

एकदा अशीच एक बाई आपली दुखरी दाढ सहन करत रस्त्यावर उभी होती. डॉक्टरांना आधीच उशीर झाला होता. परततेवेळी आपण तपासू असं त्यांनी तिला सांगितलं.

परतायला रात्रीचे नऊ वाजले.

दुखरी दाढ सहन करत ती बाई तिथेच वाट बघत उभी.

डॉक्टर स्वत:च आज गाडी चालवत होत्या. त्यांनी गाडी थांबवली. नेहमीची मदतनीस आज रजेवर होती. एका मिशनऱ्याची मुलगी मात्र सोबत होती. तिलाच डॉक्टरांनी फर्मावलं-

'एक कापसाचा बोळा आयोडिनमध्ये बुडवून घे!'

तिने बिचारीने आज्ञा पाळली.

ड्रायव्हरने कंदिलाचा उजेड दिला.

स्टिअरिंग व्हीलच्या मागे बसल्याबसल्याच डॉक्टरांनी चिमट्याने त्या बाईची दाढ उपटून काढली, हिरडीवर औषध लावून त्या बाईला दाढेखाली धरायला बोळा दिला. तिच्या पाठीवर थोपटलं. गाडी सुरू केली. निघाल्या.

तशीच ती भर मे महिन्यातील रणरणती दुपार... चांगला एक वाजून गेलेला. गुडियाट्टम्‌ला पोहोचायला आधीच वेळ झाला होता.

आधीच्या थांब्यावर डॉक्टरांनी ड्रायव्हरला आता कुठेही गाडी थांबवायची नाही अशी सूचना दिली तेव्हा सर्व सहकाऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला होता. ते चार मैल पुढे गेले असतील- नसतील तोच एका जोडप्याने हात दाखवून गाडी थांबवण्यासाठी हाका द्यायला सुरुवात केली. बाईच्या कडेवर मूल होतं.

ड्रायव्हरने त्यांना सांगितले, 'आता नाही. परतताना थांबवतो.' पण त्यांच्या जवळून गाडी जाताना डॉक्टरांनी जरा डोकावून त्यांच्याकडे पाहिलेच आणि ड्रायव्हरला गाडी थांबवायला फर्मावलं.

'काय झालं बाई या मुलाला?'

'ओ माई, तुम्ही माघारी फिरलात! फार उपकार झाले बघा. आम्ही कितीक कोस चालून आलोत. गेल्या आठवड्यातही आम्ही येऊन गेलो. तुमची वेळ नाही गाठता आली. या खेपी मात्र पार सकाळीच येऊन उभे राहिलो. पोटात अन्नाचा कण नाही अन् वरून ही उन्हाची आग; पण रस्त्यावरून बाजूला झालो नाही बघा. उगीच तुमची-आमची चुकामूक व्हायला नको. तुम्ही थांबत नाहीसं दिसल्यावर जिवाला फार लागलं. पण तुम्ही माघारी आलात. देव भलं करो तुमचं.'

बोलताना त्या दीन आईच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. बाप महारोगी. आई आंधळी. पोर आजारी!

त्या बाईने आपले मूल डॉक्टरांसमोर धरलं. त्या अंध स्त्रीच्या दृष्टिहीन नजरेत नुसतं निळं आकाश प्रतिबिंबित झालं होतं.

'माझं हे एकुलतं एक पोर. या आधीची आठ गेली!'

डॉक्टर गाडीतून खाली उतरल्या. मूल हातात घेतलं. चांगलंच फणफणलं होतं ते. त्यानं आपल्या मुठी डोळ्यांवर गच्च धरून ठेवल्या होत्या. डॉक्टरांनी त्या हलकेच बाजूला केल्या. पापण्या बाजूला करून पाहिल्या... सारा अंधार!



सांगण्यासारखं काहीच शिल्लक नव्हतं.

शांतात भंग करायला त्या सुन्न दुपारी कावळादेखील कुठे काव काव करत नव्हता... शेवटी त्या मातेनं धीर गोळा करून डॉक्टरना विचारलं- 'काहीच का बोलत नाही माई?'

डॉक्टरांनी आपल्या कोरड पडलेल्या ओठांवरून जीभ फिरवली.

'काय बोलू?' हळुवार आवाजात त्या उत्तरल्या.

मखमली म्यानातून काढली तरी तलवार ती तलवारच. तिची धार थोडीच बोथट होणार?

मुलाची आई समजली-

'आंधळं? काहीच का करता येण्यासारखं नाही? माझ्यासारखंच आंधळं? जन्माचं? अरे देवाऽ!' ती तिथेच तापल्या फुफाट्यात बसून रडू लागली.

डॉक्टरांनी त्या मुलाचे डोळे धुतले. औषध घातलं. शस्त्र निर्जंतुक करून त्या कुष्ठरोगी पित्याच्या जखमा साफ केल्या. ड्रेसिंग केलं.

आपलं रडणं थांबवून त्या मातेनं डॉक्टरांना विचारलं, 'गेल्या आठवड्यात भेट झाली असती तर पोराचे डोळे वाचले असते का हो माई?'

डॉक्टर गप्प बसल्या. आता जर आणि तरला काय अर्थ उरला होता?

पण वेलूरच्या अवतीभवतीच्या खेड्यांना डॉ. आयडांचा हा फिरता दवाखाना गेली आठ-दहा वर्षं जी वैद्यकीय सेवा देत होता, त्याची जाण त्या खेडुतांना होत होती नक्कीच!

भर पावसाळ्याचे दिवस. दिवसभर धो धो पाऊस कोसळल्याने सगळीकडे चिखलच झाला होता. डॉ. आयडांना गुडियाट्टम्‌हून परतायला रात्र झाली. मोटारीच्या दिव्यांच्या उजेडात त्यांना दिसलं, रस्ता अडवून बरेच लोक उभे आहेत. खरं तर आज डॉक्टर फारच थकलेल्या होत्या; पण एवढे लोक पावसात रस्त्यावर उभे आहेत त्यांना नाही तरी कसं म्हणायचं?

'काय अडचण आहे?'

'डॉक्टर, पुढचा रस्ता पाण्याखाली गेलाय. तुमची गाडी पाण्यात-चिखलात अडकून पडायला नको. आम्ही मघापासून तुमची वाट पहात उभे आहोत. गाडी नीटपणे बाहेर काढून देतो. चला!'

□

पॉलिन जेफरी. वय वर्षं २५. शिक्षण : शिक्षण शास्त्राची एम्. ए. पेशा : शिक्षिका. वडिल मदुरेत मिशनरी.

हीही दर उन्हाळ्यात सुट्टी घालवायला आई-वडिलांसमवेत कोडाईकनालला यायची.

डॉ. आयडा हिला हिच्या बालपणापासून ओळखत. त्यांना वाटे हिने डॉक्टर

व्हावं. तिच्या वडिलांनाही वाटे, मुलीनं डॉक्टर व्हावं; पण नाही. मुलीने शिक्षण शास्त्राची M.A. पदवी घेतली.

पॉलिनला डॉक्टरांच्या टेनिस नैपुण्याइतकाच त्यांच्या सेवाकार्याविषयी आदर होता. कोडाईकनालला सुट्टीत आली की डॉ. आयडांच्या कार्याविषयी इतर मिशनऱ्यांकडूनही तिला बरेच समजे.

एका उन्हाळी सुट्टीत पॉलिन डॉ. आयडांच्या सहवासात आली ती योगायोगानेच. तिची एक विद्यार्थिनी अत्यवस्थ होती. जिवापाड कष्ट करून डॉ. आयडांनी तिला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढली. त्यावेळचे डॉक्टरांचे ते कौशल्य, ती धडपड आणि ती सेवावृत्ती पाहून पॉलिन विलक्षण प्रभावित झाली.

'तुम्ही हिला मृत्यूच्या दाढेतून बाहेर खेचलीत डॉक्टर! मला सारखं वाटतंय खरंच मीही अशी डॉक्टर झाले असते तर किती बरं झालं असतं! आज तुम्ही इथे नसतात तर-?'

'मग आता तरी काय झालंय तुला डॉक्टर न व्हायला?'

पॉलिनचे डोळे क्षणभर लकाकून गेले. मग कसनुसं हसत ती म्हणाली-

'आता या वयात?'

'त्यात काय बिघडलं? मी वैद्यकीय कॉलेजात गेले तेव्हा जवळपास तुझ्याच वयाची होते की!'

पॉलिनच्या मनात चलबिचल झाली.

'समज, तुझ्या शिक्षणासाठी पैशाची सोय केली तर तू अमेरिकेला जाऊन डॉक्टर होऊन यायला तयार आहेस?' डॉक्टरांनी खडा टाकला.

पॉलिनच्या छातीचे ठोके वाढले.

'केव्हा?'

'आत्ता. मी सारा खर्च, सारा भार उचलायला तयार आहे.' इतका वेळ या दोघींचं संभाषण शांतपणे ऐकत बसलेल्या डॉडने तोंड उघडले.

'म्हणजे?' पॉलिनला काही उलगडेना.

'म्हणजे तुझी सर्व योग्य सोय करायला गर्ट्रयुड डॉड तयार आहे. मग? काय विचार आहे?'

पॉलिनने ओठांवरून जीभ फिरवली.

'आता लागलीच नाही जमणार. तीन वर्षांचा करार केलाय मी. मग बघू.'

काही महिने गेले. पॉलिनची कराराची मुदत संपत आली. आता काही निर्णय घेण्यापूर्वी एकदा जातीनं जाऊन डॉ.आयडांचं कार्य प्रत्यक्ष पाहून समजून घ्यावं म्हणून ती वेलूरला आली.

डॉ. आयडांबरोबर ती दवाखान्यात बसली. रुग्णालयात फिरली. शस्त्रक्रियागृहात उभी राहिली. बुधवारी फिरत्या दवाखान्याबरोबर दौऱ्यावर गेली.

डॉक्टरांच्या बरोबर गाडीत असणाऱ्या प्रत्येकीला काही ना काही काम त्यांनी



नेमून दिलेलं असेच. पॉलिनलाही काम करावे लागले. एका खेडूताचा जेमतेम लटकत असलेला दात तिला डॉक्टरांच्या सूचनेप्रमाणे उपटावा लागला. बिचारी पॉलिन नंतर किती तरी वेळ थरथरत होती.

गुडियाट्टमूला पोहोचायला त्यांना दुपारचे दोन वाजले. तिथे जमलेल्या गर्दीत एक फासेपारधी कुटुंबही होतं. अगदी भुके-कंगाल. दोन्ही लहान मुलांचा नुसता सापळा उरला होता. डॉक्टरांनी विचार केला या दोन मुलांना वाचवायचं तर त्यांना वेलूरच्या रुग्णालयात दाखल करणं भाग होतं.

त्या दोन मुलांना मातेसह मोटारीत सामावून घेणं म्हणजे एक समस्याच होती. पण डॉक्टरांनी औषधाची खोकी आणि काही सामान गुडियाट्टमूच्या दवाखान्यात उतरवून ठेवलं. एकूण नऊ जण त्या इवल्याशा गाडीत कोंबले. डॉक्टर, ड्रायव्हर, पॉलिन, परिचारिका, धर्मोपदेशिका, दोन मुले आणि त्यांची माता. एक मूल पॉलिनने मांडीवर घेतले होते आणि दुसरे खाली गुडघ्यात पकडले होते. इतक्या कोंबाकोंबीत पॉलिनने पूर्वी कधी प्रवास केला नव्हता आणि इतका आनंदही पूर्वी तिला कधी झाला नव्हता.

पॉलिनने निर्णय घेतला.

तीन वर्षांचा करार संपताच ती अमेरिकेला गेली. वयाच्या तिसाव्या वर्षी, तब्येत नाजूक, दुबळी असतानाही, पाच वर्षांचा प्रदीर्घ वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरता तिने येल मेडिकल कॉलेजात प्रवेश घेतला.

एम्.बी.बी.एस्. नंतर ती नेत्रविशारद झाली. वेलूरला आली. डॉ. आयडांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्या कार्यात सहभागी झाली. अगदी निवृत्त होईपर्यंत.

□□

# इलाज



'तर तुम्हाला खात्री आहे की स्त्रियांसाठी वैद्यकीय महाविद्यालय उघडण्यासाठी आवश्यक ती तयारी झाली आहे,' कर्नल ब्रायसनने डॉ. आयडांना विचारले.

'महाविद्यालय नव्हे विद्यालय' डॉक्टरांनी दुरुस्ती केली. 'आम्हाला ठाऊक आहे की इतक्यात आम्ही विद्यापीठाची मान्यता मिळवू शकत नाही. पण लवकरच त्या दर्जाला पात्र होऊ. या घटकेला आमची मागणी आहे ती हिंदी स्त्रियांना L.M.P. चा डिप्लोमा देता यावा या दृष्टीने मान्यता मिळावी.'

घटना आपोआप घडत असतात. आपण नुसता धीर धरून वाट पाहावी हे डॉक्टरांच्या स्वभावात न बसणारं. केल्याशिवाय होत नाही हेच खरं! १९१८ च्या सुरुवातीला डॉ. आयडा मद्रास प्रेसिडेन्सीच्या ब्रिटिश मेडिकल डिपार्टमेंटचे प्रमुख क. ब्रायसन यांच्या कार्यालयात दाखल झाल्या त्या मेडिकल स्कूलसाठी परवानगी घेण्यासाठी.

'तुमच्याकडे इमारत नाही-'

'लवकर होईल-' डॉ. आयडांनी खात्री दिली,-

'इमारत होईपर्यंत सध्याच्या रुग्णालयाशेजारची घरं भाड्याने घेऊ.'

'पैसाही नाही तुमच्या हातात.'

'प्रयत्न चालू आहे. चार ख्रिश्चन संप्रदायांच्या स्त्रिया अमेरिकेत अहोरात्र धडपडताहेत आणि युद्ध संपताच इंग्लंडमध्येही सुरुवात होईल.'

'-आणि अध्यापनाची व्यवस्था काय?'

'प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींना आवश्यक ते बहुतेक सर्व विषय मी शिकवू शकते. Anatomy शिकवताना परिचारिका हाताशी असेलच. पदार्थ व रसायनविज्ञान शिकायला मुली वेलूरच्याच आमच्या मिशन कॉलेजमध्ये- वुऱ्हीसमध्ये- जातील. पुढच्या वर्षी आमच्या गरजेनुसार....'

'कमाल आहे! इमारत नाही, पैसा नाही, शिक्षकवर्ग नाही. अशा परिस्थितीत हिंदी स्त्रियांसाठी मेडिकल स्कूल सुरू करायचं म्हणता? मोठं नवल आहे. आपला हेतू उदात्त आहे यात वाद नाही; पण आपलं धाडस मला-'

'एखाद्या आत्यंतिक निकडीनं कर्तव्य पार पाडण्याच्या प्रयत्नास लागणे यात उदात्त वगैरे काही नाही. या देशाला महिला डॉक्टरांची किती गरज आहे हे तर तुम्ही जाणताच.'



'मला त्याची पूर्ण जाणीव आहे, डॉ. आयडा स्कडर. मी आपल्या धाडसाचा आदर करतो. तरीही प्रामाणिकपणे सांगतो- हिंदी स्त्रियांसाठी मेडिकल स्कूल हे जरा मला अवघडच वाटतंय. त्यांना आपण नर्सिंग कोर्ससाठीसुद्धा वळवू शकलो नाही. आणि समजा, काही विद्यार्थिनी आल्याच या कोर्सला तरी त्यांना इतर सात मेडिकल स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीने कसोटीस उतरावे लागेल त्याचे काय?'

'पुरुषांना शह देण्याइतकी अक्कल स्त्रियांना नसते असंच वाटतं काय आपल्याला?'

'आपण हिंदी स्त्रियांविषयी बोलत आहोत!'

'-आणि हिंदी पुरुष बोलेल त्याच रीतीने.'

'ठीक आहे. आपण जिंकलात. आता असं करा- कमीत कमी सहा तरी विद्यार्थिनी मिळवा आणि स्कूल सुरू करा. मी आपल्याला सरकारी परवानगी मिळवून देण्याची व्यवस्था करतो.'

'संतोषम्!'

डॉ. आयडा आनंदाने उल्हसित झाल्या.

दुसऱ्याच दिवशी त्यांनी वृत्तपत्रात वेलूरमध्ये स्त्रियांसाठी मेडिकल कॉलेज सुरू होत असल्याची जाहिरात दिली. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींचे अर्ज मागवले. ६९ अर्ज आले. त्यांतले त्यांनी चोखंदळपणे १८ अर्ज निवडले.

स्कूल सुरू व्हायला वातावरण फारसं उत्साहवर्धक लाभलं नव्हतं. युरोपात अजूनही युद्ध चालू होतं. हिंदुस्थानात तर महागाईने कळस गाठला होता. पावसाळा कोरडाच गेला. त्यात भर पडली ती कॉलरा आसि फ्ल्यूच्या साथींची.

हा इन्फ्ल्युएंझा काही वेगळाच आजार, नव्या दमाचा. देवी, प्लेग, पटकी यांची मालकी सांगणारी काही दैवतं होती, तसंच या फ्ल्यूचीही मालकी सांगणारं एखादं अपरिचित दैवत असणारच. म्हणून त्या अनामिकेला- अपरिचिताला खूष करण्यासाठी हिंदूंची धावपळ सुरू झाली. गावाबाहेरच्या झाडाला झाडू, डबडी, टोपल्या बांधल्या. काही खेड्यांतून छोट्या लाकडी खटाऱ्यात देवी बसवून तिचा फेराही गावाबाहेर सोडण्यात आला. देवीला भेटीही चढवल्या गेल्या.

ख्रिश्चनांनीही प्रभूची करुणा भाकली. परंतु हिंदू पूजा- नवससायासांनी काय किंवा ख्रिश्चनांच्या प्रार्थनांनी काय, फरक कशातच पडला नाही. त्या साथीने आपले घ्यायचे ते बळी घेतलेच.

डॉ. आयडांना एका मोठ्या दु:खाला सामोरे जावे लागले. सतत बारा वर्षे त्यांना साथ देणारी नर्स ज्ञानसुंदरम् या साथीने नेली!

□

१९ ऑगस्ट १९१८ रोजी मद्रास प्रांताच्या गव्हर्नरांच्या हस्ते Union Missionary Medical School for women चे उद्घाटन झाले.

या मेडिकल स्कूलमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींच्या निवासाची सोय करण्यासाठी डॉक्टरांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे काही रिकामे बंगले भाड्याने घेतले. स्वत:च्या बंगल्यातल्या काही खोल्या रिकाम्या करून दिल्या. भाड्याने घेतलेल्या एका बंगल्यामागची पडवी बंदिस्त करून शवविच्छेदनाची सोय केली. अध्यपनाची सोय रुग्णालयातच केली.

डॉ. आयडांसमोर अडचणी अनंत. जागेची टंचाई, अपुरा शिक्षकवर्ग. सोयींची कमतरता. त्यात भर म्हणून, आलेल्या विद्यार्थिनी नाना धर्मांच्या, नाना जातींच्या आणि नाना भाषांच्या.

अठरापैकी चार विद्यार्थिनी या ना त्या कारणाने स्कूल सोडून गेल्या. उरल्या चौदा. या विद्यार्थिनी हेच डॉक्टरांचे काम, आनंद आणि बेचैनीही. उठता-बसता त्यांचाच विचार. या चौदाजणी फार नशिबवान! डॉक्टरांचे प्रेम, डॉक्टरांचा अदम्य उत्साह यांच्या वाट्याला भरपूर आला.

प्रथम वर्षासाठी डॉक्टर Histology, Anatomy आणि Physiology हे तीन विषय शिकवायच्या. त्यासाठी पहाटे तीनलाच उठून अध्ययनाची पूर्वतयारी करायच्या. त्यांचं दवाखान्यातील काम किंवा रुग्णालयातील काम, त्यात काटकसर करता येण्यासारखी नव्हती. त्यामुळे मध्यरात्रीपर्यंत जागून आणि पुन्हा पहाटे तीनलाच उठून अभ्यास करीत बसायच्या.

सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत वर्ग चालत. साडेदहा वाजता त्या आपल्या विद्यार्थिनींना घेऊन रुग्णालयात फेरी टाकण्यास जात. या फेरीत विद्यार्थिनींना विविध रोगांचे, शस्त्रक्रियांचे नमुने पाहायला मिळत. अभ्यासायला मिळत. औषधोपचार, त्यांची प्रमाणं यांचे पुस्तकी दाखले घेण्यापेक्षा हा कार्यानुभव, प्रत्यक्ष प्रमाण त्यांच्या ज्ञानात भर टाकी. प्रत्येक रुग्ण म्हणजे जिवंत वस्तुपाठ. प्रत्येक शस्त्रक्रिया म्हणजे ज्ञानाचं नवं दालन. ड्रेसिंग, शस्त्रांचं निर्जंतुकीकरण, रुग्णालयीन स्वच्छता, रुग्णाची शारीरिक व मानसिक जपणूक यांसारख्या अनेक गोष्टी केवळ पुस्तकातून शिकण्यावर न थांबता त्यांना प्रत्यक्ष अनुभवाने शिकता येई.

अभ्यासाइतकंच डॉक्टरांचं त्यांच्या खेळावरही लक्ष असे. रोज संध्याकाळी डॉक्टर या मुलींबरोबर तासभर तरी बॅडमिंटन किंवा बास्केटबॉल खेळत. फोर्डगाडीत कोंबून त्यांना फिरायला नेत. गुडियाट्टम्लादेखील या मुली गटागटाने जात. गावात ज्या मेजवानीस या विद्यार्थिनींना निमंत्रण नसे त्या ठिकाणी डॉक्टर एकट्या कधीच जात नसत.

या मुलींच्या भोजनाची व्यवस्था ही एक डोकेदुखीच. भोजनाचे प्रकार तीन-मांसाहारी, शाकाहारी आणि अंडाहारी.

बहुतेक मुली खेड्यांतून आलेल्या. पंक्तीत कसं जेवावं हे त्यांना कळत नसे. न आवडलेला पदार्थ सरळ तसाच टाकत. वक्तशीरपणाचा अभाव. पोषाखाबाबतीत औदासीन्य. पण त्यांना यावर टोचून बोलत न बसता डॉक्टरांनी त्यांना वळण



लावले. तीन-तीन-चार-चारच्या गटाने स्वत:च्या घरी जेवायला बोलवून पद्धतशीर जेवायला शिकवले. पाश्चात्य पद्धतीने काटे-चमचे, नॅपकिन् वापरायलाही शिकवले.

या पहिल्यावहिल्या विद्यार्थिनींकडून डॉक्टरांच्या अपेक्षा खूप होत्या. त्यांनी आपला जास्तीत जास्त वेळ त्यांच्यावर खर्च केला. वेलूरवरून जाणारा एकही तज्ज्ञ डॉक्टर एक तरी व्याख्यान दिल्याखेरीज किंवा खास वैद्यकीय तंत्र दाखवल्याखेरीज पुढे जाऊ दिला नाही. प्रत्येक ज्ञानमेघ इथं बरसलाच पाहिजे!

मेडिकल स्कूलच्या प्रथम वर्षाची वार्षिक परीक्षा जवळ आली. अंतिम परीक्षा चार वर्षांनंतर असली तरी हीही परीक्षा महत्त्वाचीच. परीक्षा मद्रासला होती. या मुलींना घेऊन डॉक्टर स्वत: मद्रासला गेल्या. केवढ्या बेचैन होत्या त्या! काही पुस्तके, एक मानवी सापळा आणि एक मायक्रोस्कोप यांच्या आधारे मेडिकल स्कूल सुरू केलं होतं.

शिक्षण घ्यायला आलेल्या मुली अशिक्षित घरांतल्या. त्यांना हाताशी धरून, सर्व सोयींनी सुसज्ज असणाऱ्या सरकारी मेडिकल स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीने शर्यत लावण्यात त्यांनी फार मोठं धाडस दाखवलं होतं.

परीक्षाकेंद्रावर त्यांना कर्नल ब्रायसन भेटले.

'वा! डॉ. स्कडर, तुमचा पहिला वर्ग परीक्षेला आणलात तर; पण डॉक्टर, यांपैकी एकीलाही यश मिळू शकलं नाही तरी तुम्ही खचून जाऊ नका. फार कठीण असते ही परीक्षा. या मुली वयानं लहान, तेव्हा त्यांना फिरून प्रयत्न करता येईलच. पण काहीही झालं तरी तुम्ही प्रयत्न सोडून देणार नाही हे मात्र कबूल करा!'

'कबूल!' आधीच बेचैन असणाऱ्या डॉक्टर आणखीनच खचल्या.

आशंकांनी आणि काळजीने व्यापलेले दिवस संपले. निकालाचा दिवस उजाडला. बहुतेक स्कूल्सचे निकाल वीस टक्केच लागल्याच्या बातम्या येत होत्या.

दुपारच्या डाकेने कर्नल ब्रायसनचे पत्र आले. शंभर टक्के निकाल. डॉ. आयडा आनंदाने वेड्या झाल्या. चौदाही मुली उत्तीर्ण तर झाल्या होत्याच; पण त्यातल्या चौघी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या होत्या. मद्रास प्रेसिडेन्सीतील इतर सर्व मेडिकल स्कूल्सला वेलूरच्या मेडिकल स्कूलने मागे टाकलं होतं.

'तुमच्या विद्यार्थिनींनी एवढं यश मिळवलंय की तिथवर मजल मारणं आमच्या विद्यार्थ्यांना भारी पडणार आहे-' क. ब्रायसनने डॉ. आयडांना पत्र पाठवून कबूल केलं.

□

१९२० साल उजाडलं होतं. स्वातंत्र्य, लोकशाही, चळवळी या विचारांनी अवघा हिंदुस्थान भारून गेला होता. म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळींना जोर चढला होता. डॉ. आयडा मात्र राजकारणापासून अलिप्त होत्या. ग्रामीण जीवन आरोग्यसंपन्न करण्याच्या त्यांच्या कार्यात त्या गळ्यापर्यंत बुडाल्या होत्या.

त्यांच्या या सेवेबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना 'कैसर-ए-हिंद' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.

□

शेल रुग्णालयात कधी नव्हे एवढी गर्दी झाली होती. प्रत्येक विद्यार्थिनीमागे तीन खाटा पाहिजेत या सरकारी अटीमुळे शेल रुग्णालयात आणखी साठ खाटांची सोय करावी लागली. हे रुग्णालय आता मेडिकल स्कूलचेच अंग बनले होते. या स्कूलच्या उभारणीला ज्या इतर संप्रदायांच्या मिशन बोर्डांचा हात लागला होता त्या मिशन बोर्डातील काही अध्यापिकांना या स्कूलमध्ये अध्यापनासाठी घेतले होते. युनायटेड फ्री चर्चच्या डॉ. मॅकफिल, अमेरिकन बॅप्टिस्टस्च्या डॉ. किनामन, डॉ. जेसी आणि डॉ. एलिझाबेथ फिंडले या भगिनी कॅनेडियन बॅप्टिस्टस्च्या, डॉ. ॲना डेजनरिंग वगैरे.

अमेरिकेत सौ. पिबॉडी, कॅथेराईन व इतरजणी प्रॉटेस्टंट मिशनतर्फे निधी गोळा करत होत्या. अर्थात् त्यांच्या नजरेसमोर केवळ वेलूरचेच मेडिकल कॉलेज नव्हते. पूर्वेकडील देशात अशी एकूण सात महिला कॉलेजे काढली जाणार होती. तीन चीनमध्ये, एक जपानात, तीन हिंदुस्थानात. पैकी एक वेलूरमध्ये. रॉकफेलर मेमोरियल फंडाकडे त्यांनी दहा लाख डॉलर्सची याचना केली होती, त्याचं उत्तर अजून यायचं होतं.

'प्रॉव्हिडन्स चर्चने ऑपरेशन थिएटरसाठी दहा हजार डॉलर्स दिलेत. श्री. फिल ब्राउन यांनी त्यांच्या लेकीच्या विवाहाप्रीत्यर्थ दहा हजार डॉलर्स परिचारिका-निवासासाठी दिलेत. एलन कोल या भगिनीने वेलूरमध्ये नवा दवाखाना उघडण्यासाठी पुरेसे पैसे दिलेत'- अशा उत्साहवर्धक पत्रांनी डॉक्टरांना कार्यशक्ती मिळत होती.

आता डॉक्टर पन्नाशीला आल्या होत्या. सोनरी केस चंदेरी झाले होते. मात्र अजूनही त्या डोंगरचढणीवर किंवा टेनिसकोर्टवर तरुणांना भारी ठरत होत्या. ते झपाझप चालणं अजूनही तसंच होतं. उत्साहही तसाच अदम्य. अमाप.

आतापर्यंत त्यांनी एकूण २३ मुले दत्तक घेतली होती. नुकतंच त्यांनी मेरी टॅबरचं लग्न लावून दिलं होतं.

'कुणाचंही आणि कसंही मूल असलं तरी मला टाकवत नाही. मानानं जन्मण्याचं भाग्य एखाद्याच्या नशिबी नसलं तरी त्याला प्रेमाचं आणि मायेचं वातावरण लाभलं तर त्यातूनच पुढं खंबीर व्यक्तिमत्त्व विकसतं. आपण या अनाथ बालकांची दखल घेतली नाही तर ती विकली जातील. नको त्याच्या हाती पडून वाममार्गाला लागतील.'

'मोठ्या जागेची सोय करता आली तर तेवीसच काय शंभर मुले दत्तक घेईन-' असा त्यांचा जोम अन् उत्साह.

□



वेलूरमध्ये डॉक्टरांच्या आणि परिचारिकांच्या निवासस्थानी इमारती उभारणीचे काम चालू होते. तिथून हाकेच्या अंतरावर नव्या दवाखान्याच्या भिंती वर येत होत्या. त्याला लागून बाल-रुग्ण विभाग, प्रसूति-विभाग होणार होते. वेलूरमधल्या थोटापालयम् भागात ह्या इमारती साकारत होत्या. काही इमारतींच्या नियोजित कामाचे आराखडे अजून सरकारी पातळीवरून मान्य होऊन यायचे होते.

मद्रास प्रांताच्या गव्हर्नरनी पाच लाख रुपये देऊ केले होते. अट एकच. डॉक्टर आयडांनी आधी तेवढीच रक्कम उभारायची. रॉकफेलर फंडाकडून सात महिला महाविद्यालयांसाठी दहा लाख डॉलर्स मिळणार होते; पण त्यासाठी आधी वीस लाख डॉलर्स वर्ष संपायच्या आत जमा करून दाखवायचे होते.

म्हणजे विनाअट कोणतीच मदत मिळत नव्हती! या साऱ्या इमारती पूर्ण व्हायला अजून कमीत कमी तीन वर्षं तरी लागणार होती आणि २०० एकर जागेवरचं स्वप्नं साकार व्हायला... दहा वर्षं...?

□


मेडिकल स्कूलचा पहिला पदवीदान समारंभ. अध्यक्ष होते कर्नल ब्रायसन. स्कूलला साशंक मनाने परवानगी देणारे कर्नल ब्रायसन.

समाधान वाटावं असंच घडलं होतं. नव्हे, अभिमान वाटावं असं!

डॉ. आयडांची एक विद्यार्थिनीही सर्वप्रथम आली होती. सरकारकडून तिला सुवर्णपदक मिळालं. पाचजणी प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाल्या. यश तर शंभर टक्के मिळालं होतं.

□□

## 'निधी' ध्यास



१९२२ च्या जून महिन्यात डॉ. स्कडर बॉस्टन बंदरात उतरल्या. सौ. पिबॉडींनी आखलेल्या कार्यक्रमानुसार त्या व्याख्यानांच्या दौऱ्यावर निघाल्या. प्रचंड निधी उभारायचा होता.

व्याख्यानांच्या दौऱ्यावर असतानाच त्यांना मनस्ताप देणारं एक पत्र आलं. अर्काट मिशन असेंब्लीने वार्षिक बैठकीत वेलूरमधील त्या दोनशे एकर जमिनीवर वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यास विरोध दर्शवला होता. ही जागा डॉक्टरांनी मद्रास सरकारच्या सहकार्याने 'युनियन मिशनरी मेडिकल स्कूल' च्या नावे घेतली होती. मिशनचा हा विरोध अवचितपणे पुढे येऊन ठाकला होता.

पण खरा आघात झाला तो सौ. पिबॉडींच्या पत्राने- '-घेतल्या निर्णयाने मलाही समाधान वाटले. दोन दोन ठिकाणी (वेलूरगावातील थोटापालयम् विभागातील २० एकर जागा व गावाबाहेरची २०० एकर जागा) इमारती विभागल्या जाव्यात हे पटत नव्हतेच. ती २०० एकर जागा आपण काही हातची दवडणार नाही आहोत. तिचाही अन्य काही उपयोग करू.'

डॉ. आयडांना हे कसं मान्य व्हावं?

> उराशी इतकी वर्षं जपलेलं स्वप्न असं सहजासहजी उद्ध्वस्त होऊ द्यायचं! कोणी काहीही निर्णय देवो- कॉलेज त्या २०० एकरांतच उभं राहणार. गावातल्या भर वस्तीत दवाखाना किंवा रुग्णालय ठीक आहे. वैद्यकीय महाविद्यालय उभारायला कशी निवांत जागाच हवी. काय लोक हे! नाकापलीकडचा भविष्यकाळ त्यांना दिसतच नाही का? भरवस्तीत का कोणी ताजमहाल उभारतं?

डॉ. आयडा बेचैन झाल्या. आपले म्हणणे पटवून देण्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी पत्रं पाठवली. अनेकांशी चर्चा केली.

आणि हे सारं करत असताना उत्तम सहकारी निवडण्याकडेही त्यांचं लक्ष होतंच. सुप्रसिद्ध मेयो क्लिनिक्मधून त्यांनी डॉ. कॅरॉल जेम्सन्ला बोलावून घेतले. या युवतीची पेकिंग मेडिकल स्कूलमध्ये मिशनरी डॉक्टर म्हणून निवड झालेली होती.

'तू तर खरं आमच्याकडे असायला हवीस. तुला अध्यापनाचा काही अनुभव?'

'विशेष काही नाही. पण रसायनशास्त्र शिकवलंय मी थोडे दिवस.'



'छान. तू वेलूरला येऊन आमच्याकडे तेच शिकव.'

-आणि डॉ. कॅरॉल जेम्सनने ऐकलं.

ट्रेव्हा माईल. ही आहारशास्त्राचा अभ्यास करीत होती. डॉ. आयडांची निरनिराळ्या सभेतील व्याख्यानं ऐकता ऐकता त्यांच्या प्रेमात पडली. भेटली. डॉ. आयडा तिला म्हणाल्या, वेलूरमध्ये आम्हाला आहारतज्ज्ञाची फार गरज आहे.

ट्रेव्हा माईलने मानलं.

अभ्यासक्रम पुरा होतोय न होतोय तोच डॉ. आयडांची तिला तार आली- 'क्ष किरण-चिकित्सा शिकून ये!' तसं तर तसं. वेलूरला ज्याची गरज असेल ते. एक वर्ष अधिक घालवून ट्रेव्हाने तोही अभ्यासक्रम पार पाडला. वेलूरला येऊन डॉक्टरांचं स्वप्न साकारण्याच्या कामी कित्येक वर्षं कार्यमग्न राहिली.

□

•

रॉकफेलर फंडाचे दहा लाख डॉलर्स पदरात पाडून घेण्यासाठी वीस लाख डॉलर्स जमवायचे होते. त्यासाठी देशव्यापी मोहीम आखली. 'डॉलरदिन.' माणशी एक डॉलर. तारीख ठरली ९ डिसेंबर. डॉक्टर आयडांचा जन्मदिवस. चर्चेस, क्लब्ज, निरनिराळ्या संस्था यांनी मदतीचा हात पुढे केला.

वर्ष होते आर्थिक मंदीचे. २० लाख डॉलर्स जमवणे पोरखेळ नव्हता. ३१ डिसेंबर रोजी रॉकफेलर फंडाची मुदत संपत होती.

डॉक्टरांची धावपळ तर विचारायलाच नको. डॉलरदिनाने पदरात फारसं काही पडलं नाही. पण सुदैवाने रॉकफेलर फंडाने मुदतवाढ दिली. एक महिना अधिक मिळाला. सर्व संप्रदायांच्या स्त्रीप्रतिनिधी कंबर कसून कामाला लागल्या. दिवसरात्र एक झाले.

तरीही हार खायची वेळ आली.

अजूनही पन्नास हजार डॉलर्स कमीच पडत होते. शेवटचा प्रयत्न म्हणून सौ. पिबॉडी कॅलिफोर्नियास गेल्या. तिथल्या एका ऐंशी वर्षांच्या वृद्धेशी त्यांची भेट ठरली. सौ. पिबॉडींना फारशी आशा नव्हती- पण भेटीला गेल्या.

भेटीच्या दुसऱ्याच दिवशी त्या वृद्धेचं- श्रीमती एलन स्क्रिप्स्चं- पत्र आणि चेक आला. वेलूरमध्ये बालरुग्णालय उभारण्यासाठी देणगी पाठवली होती- पन्नास हजार डॉलर्स.

ती तारीख होती ३१ जाने. १९२३. मुदतीचा शेवटचा दिवस. सौ. पिबॉडी जिंकल्या होत्या.

□

अमेरिका सोडण्यापूर्वी डॉ. आयडांना हिंदुस्थानातून भावाचं पत्र आलं होतं. ज्या दिवशी कोडाईकनाल नगरपालिकेने रेस्टालरिंग टेकडीचा लिलाव पुकारला, त्या दिवशी नियोजित वेळेवर फक्त वॉल्टर स्कडरच हजर होता. अन्य कोणी हजर नसल्याने

कायदेशीर कारण दाखवून ती जागा त्याने अवघ्या ३४० रुपयांत मिळवली होती.

डॉ. आयडा संतोषल्या.

□

ऑक्टोबर १९२३ मध्ये डॉ. आयडा हिंदुस्थानात परतल्या. पाठोपाठ दोनच महिन्यांनी डॉ. कॅरॉल जेम्सन् आल्या.

डिसेंबर महिना चालू होता. हवामान सुखद होतं. काटपाडी स्टेशनवर त्यांना घ्यायला डॉ. आयडांची मोटार आली होती.

वेलूर!

डॉ. कॅरॉल सारं काही एका दमात पाहून घ्यायला हपापल्या होत्या. त्या टेकड्या, ते मंदिराचे कळस, ती छोटी छोटी उपाहारगृहे. वेगळी भाषा. वेगळी वेषभूषा.

गाडीतळाला डावी घालून फोर्ड गाडी पुढे निघाली.

उघडी खोल गटारं, बैलगाड्या, सायकली, पादचारी, गुरं या साऱ्यांतून वाट काढत गाडी चिंचबनात आली. चिंचबनात लपली होती ती पांढरीधोप इमारत.

'हा कोल दवाखाना', 'हे फिलब्राउन परिचारिकाभवन'- ड्रायव्हर डॉ. कॅरॉलना परिचय करून देत होता.

कौतुकाने ओतप्रोत भरलेली डॉ. कॅरॉल यांची नजर एकाएकी विस्फारली. एक गाय आरामात त्या भवनाच्या व्हरांड्यातून बाहेर पडत होती. काहीही अनपेक्षितपणे पुढे ठेवणाऱ्या भूमीशी त्यांचा प्रथम परिचय होत होता. त्यामुळे थोड्याच वेळानंतर सुप्रसिद्ध डॉ. आयडा स्कडर डोणीत बसून आपल्या कुत्र्याला धूत आहेत या दृश्याचा फारसा तीव्र धक्का बसला नाही. डॉ. कॅरॉलना या नवभूमीचा अनुभव चवचवीने घ्यायला मिळत नव्हता. अगदी ठसका बसेल इतक्या घाईने घटाघटा गिळावा लागत होता.

दुसऱ्याच दिवशी त्या डॉ. आयडांच्या सोबत फिरत्या दवाखान्याबरोबर निघाल्या तेव्हा तर त्यांच्यावर अनुभव कोसळलेच.

पहिल्या दोन थांब्यांवर त्या मुकाट राहून असहाय्यपणे सारं पाहात होत्या. पण द्वितीय वर्षाची एक विद्यार्थिनी मात्र डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण होऊन कार्यानुभव घेणाऱ्या विद्यार्थिनीइतकी आत्मविश्वासाने आणि कुशलतेने हात चालवत होती. त्यापेक्षाही शुभ्रवेषधारी डॉ. आयडा किती चटपटीतपणे जादूच्या करामती करत होत्या.

तिसऱ्या थांब्यावर मात्र डॉ. कॅरॉलना मुकाट बसवलं नाही. डॉ. आयडांच्या शेजारी उभं राहून कामाला लागल्या... बैलगाडीतल्या बैलगाडीत स्त्रीला तपासणं जमू लागलं... रुग्णाच्या पोटरीतला नारु गुंडाळत गुंडाळत काढणं जमू लागलं.

सर्व थांब्यांवरचं काम संपवून परतायला त्यांना रात्र झाली. डॉ. कॅरॉल कमालीच्या थकल्या होत्या.

मेयो क्लिनिकमध्ये डॉ. कॅरॉल जेम्सन्ना दिवसाकाठी जास्तीत जास्त सहा रुग्ण तपासावे लागत. इथे दोन शेकडा. आता या फिरत्या दवाखान्यातून सर्वच प्रकारच्या



दुखण्यावर अगदी काटेकोरपणे शास्त्रशुद्ध वैद्यकीय इलाज होणे शक्य नव्हते हे खरे. पण त्या दुखण्यावर काही इलाज होत होता, त्याची दखल घेता येत होती, काही उतार देता येत होता हे तरी काय कमी होतं! आपली आत्यंतिक गरज आहे अशाच ठिकाणी आपण आलो आहोत याचे डॉ. कॅरॉलना समाधान वाटत होते.

डॉ. आयडांनी Clinical laboratory सांभाळायची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.

'...पण मला तर Clinical lab ची काहीच माहिती नाही.'

'हरकत नाही. आपोआप समजेल. सारं शिकशील-' डॉ. आयडांनी त्यांना धीर दिला.

(पुढच्या प्रदीर्घ सेवेत वेळेनुसार त्यांनी प्रसूतिविभाग, संपूर्ण रुग्णालय, काही काळ वैद्यकीय महाविद्यालय यांचा सांभाळ केला. वीस वर्षांच्या सेवेनंतर त्यांना 'हिंदुस्थानातील प्रदीर्घकालीन निरलस सेवेबद्दल' 'कैसर-ए-हिंद' किताब मिळाला.)

□

डॉ. आयडांना खऱ्या अर्थाने सार्थकता वाटत होती ती त्यांच्या हाताखाली शिकून तयार होऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थिनी खेडोपाडी जाऊन वैद्यकीय सेवा करू लागल्या याची. मेडिकल स्कूलही आता स्वतंत्रपणे वाढीस लागलं होतं.

□

१९२४ च्या फेब्रुवारी महिन्यात डॉ. आयडांना फार दुःखद प्रसंगाला सामोरं जावं लागलं. गेल्या पाव शतकाची त्यांची जिवलग मैत्रीण, सहकारी ॲनी हँकॉक कॉलऱ्याने वारली!

वेलूरच्या अंधाऱ्या घराघरांतून ती गेली होती. घाणेरड्या तुरुंगाच्या स्त्रीकक्षात गेली होती. ईश्वराचा संदेश पोहोचवण्याचं काम तिने प्रामाणिकपणे केलं होतं. उत्साहानं केलं होतं.


पाचच वर्षांपूर्वी तिने इथे महिला समाजसेवा संघ स्थापन केला होता. तिथे वेलूरच्या भगिनींना वाचन, शिवण, आरोग्य, बालसंगोपन, विविध खेळ शिकवले. कोंदट वाड्यांतून त्यांना बाहेर काढून मोकळ्यावर सहज जीवन जगायला शिकवले.

या ॲनीला वाचवण्याचे डॉ. आयडांनी शर्थीचे प्रयत्न केले. रात्रभर त्या तिच्या शेजारून हलल्या नाहीत; पण ती गेलीच!

हा घाव भरून निघण्यापूर्वीच डॉक्टर आयडांची आई, सोफिया स्कडर, वारली. हिंदुस्थानात सतत त्रेसष्ट वर्षं काढल्यानंतर तिने शेवटचा श्वासही तिथेच घेतला. डॉ. आयडांचा 'हिलटॉप' टेकडीवरचा बंगला बांधून पूर्ण होत आला होता; पण त्यात राहायला जायची सोफिया स्कडरची इच्छा मात्र अपूर्णच राहिली. आपल्या लेकीच्या कर्तृत्वानं तृप्त होऊन जाण्याचं भाग्य तिला लाभलं...

□□

# आजोबा, जरा धीर धरा!



एका नव्या औषधामुळे डॉ. आयडा आणि त्यांच्या सहकारी यांना आनंद झाला होता. ते औषध होतं कुष्ठरोगावर.

चौलमुग्रा तेलाचा कुष्ठरोगावर वापर हा काही हिंदुस्थानसाठी अपरिचित इलाज नव्हता. पुष्कळ वर्षांपर्यंत हे तेल पोटात घेण्यासाठी दिले जाई; पण आता त्यावर अधिक संशोधन होऊन त्याची अधिक परिणामकारक इंजेक्शन्स तयार झाली होती.

डॉ. आयडांच्या दवाखान्यात हा नवीन इलाज सुरू झाल्याचे समजताच कुष्ठरुग्णांची गर्दी वाढली. ह्या रोगाचे प्राथमिक अवस्थेत निर्मूलन करणे शक्य असते म्हणून अशांना शोधून त्यांच्यावर इलाज करणे आवश्यक होते. पण हे सारे जमावे कसे? फिरत्या दवाखान्यातून तरी अशा किती जणांवर उपचार होणार?

आता केवळ फोर्ड गाडीच फिरत नव्हती. चार रुग्णवाहिका दर आठवड्याला चार दिशांनी बाहेर पडत होत्या.

कुष्ठरुग्णांची रांग प्रत्येक थांब्यावर वाढली होती. ब्रिटिश सरकारनेही अधिक आस्थेचे धोरण ठेवून ही इंजेक्शने चार-आठ आण्यांत उपलब्ध करून दिली होती; पण अनेक रुग्णांना तेवढेही देणे शक्य नसे.

एका थांब्यावर डॉ. आयडांनी एका चौदा वर्षाच्या मुलावर सतत तीन महिने इलाज केले. त्याच्यात बरीच सुधारणा झाली; पण तो यायचा एकाएकी बंद झाला. डॉ. आयडांनी त्याचा शोध घेऊन त्याला बोलावणे पाठवले. चौकशी केली तेव्हा मुलाने उत्तर दिले-

'इंजेक्शनसाठी पैसे भरणं जमत नाही. त्यासाठी एवढी पायपीट आणि उपासमार घडते की मला इथवर येणंही साधत नाही.'

फिरत्या दवाखान्यातून इंजेक्शने देण्यानेही खास काही साधत नव्हते. कारण कुष्ठरुग्णांच्या अंगात मुरलेले हिवताप, कृमिविकार, कदन्नामुळे झालेले दुष्परिणाम काढून टाकल्याखेरीज ही इंजेक्शने देता येत नसत आणि समजा महिनोन्महिने इलाज करून एखादा कुष्ठरोगी दुरुस्त झालाच तर कॉलरासारखी एखादी साथ त्याला न्यायला होतीच.

न्यू हेवन, अमेरिका येथून कुष्ठरोगांसाठी एक खास बनावटीची रुग्णवाहिका आली होती. तिच्यात सर्व सोयी होत्या; पण तरीही प्रयत्न अपुरेच पडत होते.



वस्तुत: या कुष्ठरोगपीडितांसाठी वेगळ्या कुष्ठधामांचीच गरज होती.

चौलमुग्राच्या इंजेक्शनचा जादूसारखा झटकन परिणाम होतो अशा समजुतीने आलेल्या कुष्ठरोग्यांना प्रदीर्घ इलाजांना सामोरं जावं लागलं की ते निराश होऊन यायचे बंद व्हायचे. डॉक्टरांना याचे फार वाईट वाटे.

(नंतर आलेल्या डॉ. कोचरेन यांनी तर कुष्ठरोगांवर इलाज करता करता त्यांच्या पुनर्वसनासाठीही प्रयत्न केले. डॉ. पॉल ब्रॅण्ड यांनी कुष्ठरोगमुक्त झालेल्यांची शारीरिक विकृती काढून टाकणाऱ्या स्नायुरोपणाच्या शस्त्रक्रिया केल्या. त्यांच्या पुनर्वसनासाठी खास व्यवसाय मार्गदर्शन केंद्रे सुरू केली. केंद्रातून तयार झालेल्या मालाला बाजारपेठ मिळावी म्हणून तो माल निर्जंतुक करण्याची खबरदारीही घेतली. अशी केंद्रे उभारण्यात वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचाही सहभाग होता. त्यांनी स्वत: खपून कुष्ठरोग्यांसाठी झोपड्या उभारल्या. गांधी मेमोरिअल ट्रस्ट फंडाकडूनही या उपक्रमासाठी मदतनिधी आला.)

खेड्यापाड्यांतून प्रामुख्याने आढळणारा आणखी एक आजार म्हणजे नारू. गुडघागुडघा चिखलात उभं राहून भाताची रोपं लावणाऱ्या पुरुषांच्या पोटरीवर आणि कमरेवर कळशी किंवा माठ घेऊन पाणी भरणाऱ्या स्त्रियांच्या कटिप्रदेशात या नारूचे घर असायचे. एलावमपाडी गावठाणाला या नारूने नुसते ग्रासले होते. शेवटी मेडिकल स्कूलच्या विद्यार्थिनी आणि काही परिचारिका यांना हाताशी घेऊन डॉ. कॅरॉल जेम्सन् यांनी एक योजना आखली. एलावमपाडी येथील पाण्याचे नमुने गोळा केले. त्यातील कृमींच्या, नारूच्या, रोगजंतूंच्या स्लाईडस बनवल्या. एके दिवशी गावकऱ्यांना तिथल्या शाळेच्या पडवीत जमवून नारूसंबंधी माहिती दिली. स्लाइडस् दाखवल्या. प्रतिबंधक उपाय सांगितले.

स्वयंपाकाला जळण पुरण्याची मारामार तिथे पाणी उकळवायचं कौतुक कोण करत बसणार! म्हणून त्यांना पाणी चांगल्या जाड कापडाने गाळून घ्यायला सांगितले. गावकऱ्यांना सुदैवाने ते पटले. नारूचा त्या गावठाणात प्रतिबंध झाला.

या फिरत्या दवाखान्यांनी वेलूर आसपासच्या खेड्यात, खेडूतांच्या जीवनात फार महत्त्वाचं स्थान मिळवलं होतं. त्यांच्यात इतके नजीकचे आणि जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले होते की खेडूत या डॉक्टर-मंडळींकडे पीकपाण्यासंबंधी, जमीनमशागतीसंबंधी, पथ्यपाण्याविषयी सल्ला मागत. डॉ. के. एल. बटरफील्ड, (प्रेसिडेंट, ॲमहर्स्ट ॲग्रि. कॉलेज, मॅसा) यांनी अर्काट मिशनला खास पत्र पाठवून कळवलं होतं-

'You may quote me freely as you care to with regard to the Value to Village life of the work of the mission at Vellore... I was especially impressed with Dr. Ida Scudder's service for the Village folk...'

**ग्रामीण समाजाला असलेली वैद्यकीय सेवेची गरज लक्षात घेऊन ग्रामीण**

**विभागात डॉक्टर्स नेण्याचा यशस्वी प्रयत्न जगात प्रथमच केला तो डॉ. आयडांनी.**

□

मेडिकल स्कूलचा लौकिकही वाढत होता. हिंदुस्थानाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थिनी इथे प्रवेश घ्यायला येऊ लागल्या. आतापर्यंत या स्कूलमधून L.M.P. Diploma घेऊन सत्तरजणी बाहेर पडल्या होत्या.

१९२८ साली म. गांधींनी या स्कूलला आणि 'शेल रुग्णालयाला' भेट दिली. कौतुक केलं.

पण डॉ. आयडांना इथे नुसत्या L.M.P. तयार करायच्या नव्हत्या. त्यांना हव्या होत्या Bachelors of Science and Surgery. आणि केवळ सत्तरच नव्हेत त्यावर आणिक पूज्ये!

□

थोटापालयम्ची ती २० एकर जागा नवे रुग्णालय आणि इतर इमारतींनी भरून गेली. आता तिथं अधिक काही बांधता येण्याजोगं नव्हतं.

डॉक्टर आयडाला आता गावाबाहेरच्या त्या दोनशे एकर जागेत वैद्यकीय महाविद्यालय उभारायला परवानगी मिळाली होती. तिथे त्यांनी पाण्याचा शोध घेतला आणि इमारतींच्या आराखड्यांना सुरुवात केली.

'मिशनरी मेडिकल स्कूल फॉर विमेन'चं संचालक मंडळ तयार झालं. दोन व्यवस्थापकीय मंडळे बनली. एक ब्रिटिश आणि दुसरे अमेरिकन. या कार्याशी संबंधित असणाऱ्या मिशनरी संघटनांच्या प्रतिनिधींचे मिळून एक कॉलेज कौन्सिल बनले. दोन्ही व्यवस्थापकीय मंडळांनी आणि कॉलेज कौन्सिलने जागेच्या निवडीला मान्यता दिली. डॉक्टरांचा मार्ग सुकर झाला.

'इमारती झपाट्याने साकार होत आहेत... विजेमुळे जीवन किती सुसह्य झालंय...' त्यांच्या डायरीतील १९२६ सालची ही नोंद.

त्या वर्षी त्यांचं 'हिलटॉप' वरचं घर पूर्ण झालं. गर्ट्रुड डॉडने पदरचे पाच हजार डॉलर्स खर्चून त्या प्रशस्त बंगल्याला साजेसं प्रशस्त फर्निचर बनवून दिलं. वाटावं, हा बंगला सरळ न्यूयॉर्कवरून उचलून इथे आणून ठेवलाय.

□

नव्या रुग्णालयाच्या नव्या इमारतीचं उद्घाटन केलं मद्रासच्या गव्हर्नरनी.

वेलूरच्या समाजजीवनातील हा एक अपूर्व सोहळा. अपूर्व घटना. अवघ्या गावाने त्या समारंभात उत्साहाने भाग घेतला. 'वेलूर मिशनरी मेडिकल स्कूल हॉस्पिटल' हे लांबलचक नाव उच्चारता न येणारी पोरंटोरंसुद्धा यात सामील झाली होती.



सारे रस्ते पाना-फुलांनी, केळीच्या कमानींनी नटले होते. आपल्या घरचाच समारंभ असावा तसे गावकरी सजून आले होते. आणि मुख्य म्हणजे हजाराच्या संख्येत उपस्थित असलेल्या स्त्रिया. आपल्यासाठीच तयार झालेली ही वास्तू म्हणून त्यांना अपूर्वाई आणि अभिमान वाटत होता.

या रुग्णालयाच्या उभारणीत वेलूरच्या गावकऱ्यांनीही हातभार लावला होता. जमेल तशी वर्गणी काढून जमलेल्या पैशातून रुग्णालयाला एक भेट दिली होती. या पैशातून रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराशी मनोरा उभारला आणि त्यावर मोठे घड्याळ बसवणे. हे घड्याळ दिले होते डॉडने.

समारंभ चालू असताना आनंद आणि नवी जोखीम या खेचाताणीत डॉ. आयडा वावरत होत्या. समारंभ सुरळीतपणे पार पडला. डॉक्टरांना वाटलं आता आपण या साऱ्यापासून थोडं दूर जावं. या साऱ्यापासून अलिप्त व्हावं. दूर उंचावरून हे सारं न्याहाळावं. आपलं स्वप्न कितपत साकार होतंय याचा अंदाज घ्यावा.

'...वेलूर एकदा समग्रपणे पाहावं म्हणून आज पहाटे मी गावाबाहेरच्या उंच टेकडीवर चढून गेलो... काय नयनरम्य दृश्य! मिशनरी कार्यासाठी उत्तम गाव-डझनभर कार्यकर्ते मात्र हवेत.'

डॉ. जॉन स्कडर (पहिले) यांच्या डायरीतील २५ सप्टें. १८२४ ची ही नोंद. बरोबर शंभर वर्षांनंतर त्यांचीच नात आयडा त्याच जागेवरून त्यांचं साकार झालेलं स्वप्न न्याहाळत होती.

आता डझनच काय, त्याच्या बारा पटीत मिशनरी कार्यकर्त्यांची संख्या गेली होती.

समोरच्या नव्या कोऱ्या इमारती डॉ. आयडांच्या नजरेत मावत नव्हत्या. मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणात न्हाऊन निघणाऱ्या त्या इमारती डॉक्टरांची नजर आपल्यावरून ढळू देत नव्हत्या. डॉक्टरांच्या डोळ्यांसमोर 'ती २०० एकर जमीन' आली.

आजोबा, जरा धीर धरा. अजून तर तुम्हाला खूप पाहायचंय.

□

नव्या रुग्णालयाची कामगिरी पार पाडल्यानंतर डॉक्टर आपली मोठी रजा घेण्यास मोकळ्या झाल्या. डॉडच्या इच्छेस मान देऊन डॉक्टर तिच्यासह काश्मीर दर्शनला गेल्या. डॉडचा विचार होता, एखादा शिकारा भाड्याने घेऊन काश्मीरच्या सरोवरात आरामात विहार करीत विश्रांती घ्यायची. पण डॉ. आयडांना तर कुठं नुकतीच साठी लागलेली. त्यांचं तारुण्य आणि तडफ ओसरायलाच तयार नव्हती. मग उगीच असं म्हाताऱ्यासारखं शांत शांत राहाणं कसं मानवणार? त्यांनी पायी भटकंती करायचे आयोजले. त्यात डॉ. हार्टही सामील झाल्या. सोबतीला सुप्रसिद्ध मार्गदर्शक अली गुसानी. साठीतल्या डॉ. आयडांचा उत्साह तरुणाला लाजवणारा असला तरी सत्तरीतल्या डॉडने मात्र आपला वकूब ओळखून डोली पसंत केली.

डॉ. आयडांनी काश्मीरात ५०० मैलांचा पायी प्रवास केला. त्यातला बहुतेक कठीण चढणीचा. तीन महिने पदयात्रा चालली होती.

मग त्या युरोपच्या यात्रेला निघाल्या. मात्र ही यात्रा काश्मीर-सफरीप्रमाणे मौजमजेसाठी नव्हती.

व्हिएन्ना.

डॉक्टरलोकांची काशी. महिनाभर इथे डॉक्टरांनी अध्ययन केलं. शस्त्रक्रिया आणि प्रसूतिशास्त्रावरची व्याख्यानं ऐकली. शस्त्रक्रिया अभ्यासल्या.

प्राग. बर्लिन, ड्रेस्डेन. पॅरिस.

इथे त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात होत असलेल्या सुधारणा पाहिल्या. तिथल्या खेड्यापाड्यांतून मिळणारी वैद्यकीय सेवा पाहून त्यांना त्यांच्या कल्पकतेला चालना मिळाली.

मग त्या दोघी अमेरिकेच्या यात्रेला निघाल्या. अमेरिकेची यात्रा ही निधी जमवण्यासाठी खास करून होती.

या खेपेस त्यांना काही मनासारखा पैसा जमवता आला नाही. घरोघरी कपडे धुण्याची यंत्रे आणि रेडिओ खरेदी केले जात होत. त्यामुळे 'हिंदुस्थानातील प्रत्येक खेड्यासाठी डॉक्टर आणि परिचारिका' वगैरे विचार करायला तिथे कोणाला वेळच नव्हता.

१९३० च्या जानेवारी महिन्यात डॉ. आयडा परतल्या. त्यांच्यामागोमाग एका वर्षाने त्यांची भाची डॉ. आयडा बी. स्कडर मिशनरी बनून आली. आल्या आल्या तिने तामीळ भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

तिच्या आणि डॉक्टरांच्या नावात साम्य. उलट आणखी 'बी' (B) वाढलेला. त्या 'बी'-ला वेगळं न धरता लोकांनी तो आदरार्थी बनवला. आयडा बी. मुसलमान लोकांना तिच्या या 'बी' असण्याने ती जवळची वाटायची.

लहानपणापासूनच आयडाआत्याचा प्रभाव आयडा बी. वर होताच. आता तर आत्या-भाची खांद्याला खांदा लावून कामाची मजा लुटीत होत्या.

☐

डॉ. आयडांचे स्वप्न मंद गतीने पण निश्चितपणे साकारत होते. कॉलेजची प्रशस्त दगडी इमारत, वसतिगृह, वर्ग, प्रयोगशाळा, भोजनगृह, सभागृह, उद्यानतज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या सुरेख बागा. सारं काही आखीव-रेखीव बांधेसूद. सुंदर! उपयुक्त!! कला आणि विज्ञानाचा हृद्य संगम.

आता डॉक्टर कॉलेज आवारातील प्राचार्य-निवासात राहायला आल्या. सोबत आयडा बी. आणि डॉड होतीच.

☐



गेली काही वर्षे डॉ. आयडांचे नाव विशेष गाजत होते ते त्यांच्या Vesico Vaginal fistula शस्त्रक्रियेतील नैपुण्यामुळे. अडाणी सुइणींनी केलेल्या बाळंतपणात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी ही शस्त्रक्रिया डॉक्टरांना अनेक स्त्री रुग्णांवर करावी लागली. त्यासाठी आपलं कौशल्य व ज्ञान पणाला लावावं लागलं. 'अमेरिकन कॉलेज ऑफ सर्जन्स' मध्ये दिलेल्या अहवालात त्यांनी अशा हजारावर शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्याची नोंद आहे. ह्या शस्त्रक्रिया करताना त्यांना मस्तक झुकवून ओणव्या स्थितीत तासन्तास उभं राहावं लागे. जखम शिवण्याची सुई अर्धा इंची, या सुईचे टाके घालताना मानेपासून पाठीपर्यंत कणा अवघडून यायचा. इतका की शस्त्रक्रिया संपल्यावरही त्यांना बराच वेळ ताठ उभं राहता येत नसे. या शस्त्रक्रिया करवून घेण्यासाठी इतर पौर्वात्य देशातील स्त्री-रुग्णही त्यांच्याकडे येऊ लागल्या.

☐

डॉ. आयडांना पासष्टावं वर्ष लागलं होतं; त्यांच्या आयुष्यातील सर्वांत कटकटीच्या दशकात त्यांना आता उतरायचे होते.

☐☐

# वारसा



१९३६ साल सुरू झालं होतं. आर्थिक मंदीच्या तडाख्यातून जग नुकतंच सावरत होतं. हिंदुस्थानातील राजकीय स्थित्यंतरास सुरुवात झाली होती. स्वायत्त प्रांतिक सरकारे येत होती. मद्रास प्रांतात असे स्वायत्त सरकार आल्यावर सामाजिक आणि राजकीय स्तरांवर जे बदल घडणार होते त्याचा परिणाम डॉ. आयडांच्या मेडिकल स्कूलवर आणि रुग्णालयावर होण्याची शक्यता होती.

कधी नव्हे एवढी आर्थिक चणचण सोसून, जिद्दीने रुग्णालय चालू होते. पगारात दहा टक्के कपात करावी लागली. आजूबाजूचे छोटे दवाखाने बंद करावे लागले. पाच फिरते दवाखाने चालू होते. त्यांतला एक बंद ठेवावा लागला. रुग्णालयातील रुग्णांना जेवण कसे पुरवावे ही एक गंभीर समस्याच होऊन बसली. शेवटी डॉ. आयडांनी जाहीर करून टाकले- 'रुग्णांनी आपापला भोजनखर्च सोसावा. अत्यंत गरीब रुग्णांनाच फक्त चार आण्यांत ताट मिळेल.' वणव्यासारखी ही बातमी पसरली. रुग्णालयात शुकशुकाट झाला. डॉ. आयडांना मनस्वी दुःख झाले.

अशा पडत्या काळातही 'रुग्णालयदिनी,' रुग्णालयाचा लाभ घेणाऱ्या स्त्रिया, त्यांची पुरुषमंडळी, गावातील हिंदू स्त्री-पुरुष या साऱ्यांनी मिळून एक समिती स्थापली. कामाचा आराखडा तयार केला. रुग्णालयाला रंगरंगोटी झाली. पानाफुलांची सजावट झाली. येणाऱ्या भेटी जमवण्यासाठी टेबले आणि करंड्या ठेवल्या गेल्या.

सूर्योदयापूर्वीपासूनच लोकांची रीघ सुरू झाली. बैलगाड्या, खटारे यांवरून तांदूळ, रागी, साखर अशी गाठोडी येऊ लागली. पायी येणाऱ्यांच्या हातात कॉफीची, डाळीची, चिंचेची, फळांची गाठोडी. बदकं, कबुतरं, अंडी, कोंबड्या, साबण, कापड, लहान बालकांसाठी कपडे, काडेपेट्या, पिना, टॉवेल्स, खेळणी, बाटल्या, पैसे... लवकरच त्या करंड्या शिगोशीग भरल्या. त्यांच्या जागी दुसऱ्या आल्या.

एक माता आपल्या मुलाबाळांसह आली होती. तिच्या एका काखोटीला धाकटे मूल आणि दुसऱ्या काखोटीला कोंबडी. तिच्यामागोमाग मुलं. एकाच्या हातात बदकं. दुसऱ्याच्या हातात भाजीपाला, अंडी वगैरे. त्या कुटुंबाने दिलेली भेट त्या कुटुंबाच्या मासिक मिळकतीच्या अर्ध्याने होती. किती तरी लोक मैलच्या मैल पायी चालत आले होते. जे परवडेल ते देऊन, रुग्णालयाबद्दलची, डॉ. आयडांविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करत होते.



पैशाची अडचण होती तरी रुग्णालय चालवणं अशक्य मात्र नव्हतं; पण असा काही आघात झाला की महाविद्यालय अस्तित्वातच उरणार आहे की नाही याची चिंता पडली.

सार्वजनिक आरोग्य खात्याच्या मंत्र्यांनी- डॉ. राजन् यांनी- फतवा काढला की मद्रास प्रांतातील Diploma in Medicine and Surgery चा पाच वर्षांचा अभ्यासक्रम चालू असणाऱ्या मेडिकल स्कूल्सनी जुलै १९३८ नंतर नवीन अर्ज स्वीकारू नयेत. त्यानंतर मेडिकल स्कूलमध्ये प्रवेश घेणाऱ्यांना मद्रास विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या शिक्षणसंस्थांतूनच वैद्यकीय पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम पुरा करावा लागेल.

डॉ. आयडा आपल्या मेडिकल स्कूलचा दर्जा वाढवून कॉलेजच्या दर्जाला आणायला धडपडत होत्या. पण पैशाअभावी सर्वच अडले होते. आता प्रसंग असा होता की मेडिकल स्कूलचा दर्जा तातडीने वाढवून तरी द्यायला हवा होता किंवा ते बंद तरी करायला हवं होतं.

आयुष्यात प्रथमच डॉक्टर एवढ्या चिंताक्रांत झाल्या होत्या.

□

सर्जन जनरल वेलुरला येऊन सारा अंदाज घेऊन गेले. नंतर आले डॉ. राजन्. आरोग्य खात्याचे मंत्री. डॉक्टरांची भीती खरी ठरली.

इमारती चांगल्या पण शिक्षकवर्ग अपुरा. एम्. डी. वर्गांना शिकवण्यास शैक्षणिक पात्रता व अनुभव असणारी एकही प्राध्यापिका सध्याच्या अध्यापकवर्गात नव्हती. M.B.B.S.ला शिकवण्यासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम पुरा केलेले बारा डॉक्टर्स तरी हवेत. रुग्णालय अद्ययावत् व सुसज्ज हवे. आणखी काही labs हव्यात. खाटांची संख्या २६८ आहे ती ५०० हवी-!

दिसामासांनी डॉ. आयडांची चिंता वाढतच होती.

□

ब्रिटिश चर्चचे डॉ. ह्यूम आणि अमेरिकन चर्चचे डॉ. मॉट All India Christian Medical College स्थापण्याच्या दृष्टीने भारत दौऱ्यावर आले होते. वेलुरातही ते आले. वेलूरची ती २०० एकर भूमी पाहून त्यांनी डॉ. आयडांपुढे प्रस्ताव मांडला- नुसत्या महिलांसाठी वैद्यकीय महाविद्यालय काढण्यापेक्षा सहशिक्षणाने इथे उत्तम डॉक्टर्स का घडवू नयेत? त्यासाठी योग्य ख्रिश्चन वातावरण असणारी ही जागा आहे.

डॉ. आयडांना पटलं. नाही तरी आता जमाना बदलला होता. स्त्री-पुरुषांनी खांद्याला खांदा लावून प्रगती करायचे हे युग. हिंदी स्त्रीही आता पूर्वीची राहिली नव्हती. सहशिक्षणाचा प्रस्ताव उचलून धरण्यात आणखीही एक महत्त्वाचा फायदा होता- सर्व संप्रदायांचे स्त्री-पुरुष एकजुटीने सहशिक्षणाच्या बाजूचे होते. त्यामुळे

निधी जमवण्यात त्यांचा हातभार मोठ्या प्रमाणावर लागला असता.

सौ. पिबॉडी व त्यांच्या सहकारी स्त्रियांना मात्र हे मान्य नव्हते. आजवर लक्षावधी डॉलर्सचा निधी उभारून उठवलेल्या त्या नव्या कोऱ्या इमारती पुरुषांच्या हातात आयत्या तयार द्यायला त्या तयार नव्हत्या.

□

मेडिकल स्कूलच्या विसाव्या वर्धापनदिनी खास पाहुण्या म्हणून डॉ. हिल्डा लाझारस आल्या होत्या. (ह्या भारतीय ख्रिश्चन. त्यांच्या दोन्हीकडच्या आजोबांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता.) मद्रासच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयाच्या त्या सुवर्णपदकविजेत्या. इंग्लंड व आयर्लंडमधून पदव्युत्तर शिक्षणक्रम पार पाडून आलेल्या. 'प्रसूतिशास्त्र आणि शस्त्रक्रिया' यांच्या तज्ज्ञ. नव्यानेच सुरू झालेल्या 'लेडी विलिंग्डन मेडिकल स्कूल फॉर विमेन'च्या प्राचार्या.

ह्यांच्या रूपाने भारतीय स्त्री-बद्दलचं आपलं स्वप्नं साकारल्याचं डॉ. आयडांना भासलं. डॉ. लाझारस यांचं भाषण ऐकता-ऐकता डॉ. आयडांच्या मनात विचारतरंग उठत होते. 'शेल रुग्णालय' सुरू झालं तेव्हा तिथे तीन परदेशी डॉक्टर्स आणि एक हिंदी सहकारी होती. आता तिथे नऊ परदेशी आणि अकरा हिंदी डॉक्टर्स होत्या. चौदा हिंदी परिचारिका होत्या. अकरा हिंदी परिचारिकांनी पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला होता... २४० मुलींनी मेडिकल स्कूलमधून L.M.P. Diploma मिळवला होता. पैकी ८७ मिशनरी सेवा देत होत्या. ११४ सरकारी सेवेत होत्या. तीसजणी खाजगी प्रॅक्टिस करत होत्या. नऊजणी स्वर्गवासी झाल्या होत्या.

> हे असंच व्हायला पाहिजे... पुढेही असंच घडत राहिलं पाहिजे. आम्ही हळूहळू हे सारं यांच्याच हाती दिलं पाहिजे... यांचंच तर आहे हे सारं...

सहकाऱ्यांमुळे डॉ. आयडांच्या जबाबदाऱ्या खूपशा कमी झाल्या होत्या. रुग्णालय आणि अध्यापनाच्या कामातून त्या पूर्णपणे मोकळ्या झाल्या होत्या. आपल्या स्वप्नपूर्तीच्या मागे लागायला त्यांना भरपूर वेळ मिळणार होता. शिवाय आता त्यांचं वय अडुसष्ट वर्षांचं होतं. डॉ. लाझारसच्या रूपात त्या आपला वारस पाहात होत्या. त्यांच्यावर सारी जबाबदारी टाकयला डॉ. आयडांना कसलाच संदेह वाटत नव्हता.

□

१९३८ चा जुलै महिना. खरं तर नवीन विद्यार्थिनींना प्रथम वर्षासाठी प्रवेश देऊन वर्ग सुरू व्हायचा; पण या वर्षी सरकारी आदेशामुळे डॉक्टरना काहीच करता येत नव्हते. आहेत त्या वर्गांचाच अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर म्हणजे अजून तीन वर्षांनी, मेडिकल कॉलेज सुरू करता आलं नाही तर हे मेडिकल स्कूलही बंद करावं



लागणार होतं.

आठ लाख डॉलर्स तर नुसत्या नवीन इमारतींवर खर्च झाले होते. विद्यापीठाच्या अटी पूर्ण करण्यासाठी रुग्णालयात पुरुषांनाही प्रवेश द्यायला हवा म्हणजे खाटांची संख्या दुप्पट करणे आलेच. चार नवीन विभाग सुरू करायला हवेत. नवीन बारा प्राध्यापकांची नेमणूक- या साऱ्यांसाठी मिशनरी बोर्डाच्या मदतीखेरीज प्रचंड निधी उभारता येणं अशक्यच होतं आणि बहुतेक संप्रदायांचे मिशनबोर्डस् केवळ महिलांसाठी स्थापल्या जाणाऱ्या महाविद्यालयांना मदत द्यायला नाराज होते. --ख्रिश्चन मेडिकल असोसिएशनकडे इमारतनिधी शिल्लक नव्हता. आता त्यासाठी निधी गोळा करायचा म्हटले तर विद्यापीठाच्या मान्यतेसाठी जेव्हा अटींची पूर्तता करावी लागेल तेव्हा हे लोक पुन्हा आणखी दोन वेगवेगळ्या- पुरुष आणि महिला- महाविद्यालयांसाठी वेगवेगळी मदत द्यायला तयार होतील? डॉ. आयडांनी सौ. पिबॉडींना खूप समजावण्याचा प्रयत्न केला; पण त्या पटवून घेईनात.

□

पैशाअभावी पुरुषांच्या ताब्यात जाऊ पाहणारं नियोजित मेडिकल कॉलेज वाचवण्याचा एक निकराचा प्रयत्न करून पाहण्याचे सौ. पिबॉडींनी ठरवले. श्रीमंत भारतीयांना आवाहन केले. संस्थानिकांना विनवून पाहिले; पण पदरी निराशाच आली. मुंबईच्या उद्योगपती टाटांकडेही त्यांनी विनंती करून पाहिली; पण टाटा फाउंडेशनने नुकतेच 'कर्करोग संशोधन केंद्र व रुग्णालय' उभारण्याचे काम हाती घेतले होते. त्यांनाही इकडे लक्ष घालायला जमणार नव्हते.

सौ पिबॉडी थकल्या शरीराने आणि खचल्या मनाने मायदेशी परतल्या!

□

गर्ट्र्युड डॉड कधी आपला वाढदिवस साजरा करू देत नसे; पण तिच्या ऐंशीव्या वाढदिवशी मात्र डॉ. आयडांनी तिचे काही चालू दिले नाही. १५ ऑगस्ट हा तिचा जन्मदिवस रुग्णालयाने, स्कूलने आणि वेलूरच्या ख्रिश्चन समाजाने साजरा केला.

डॉडचा समाजकल्याणाचा आवाका मोठा. मदनापल्लीच्या बालभवनाला आणि गुडियाट्टम्च्या दवाखान्याला आश्रय हिचाच. शेल रुग्णालयातील अनेक खाटांची तरतूद हिचीच. दोन मिशनऱ्यांचा खर्चही तीच पाहात होती. पॉलिन जेफरीसह अन्य सातजणींनी आपले संपूर्ण वैद्यकीय शिक्षण केवळ हिच्याच आर्थिक बळावर पुरं केलं होतं.

पण ही धनलक्ष्मी उभ्या आयुष्यात कधी दागिन्यांनी बाटली नाही. आवश्यक म्हणून एक साधंसच घड्याळ जवळ बाळगायची. तिने सारी आभूषणे नाकारली; पण भवतीच्या समाजाला अलंकृत केलं.

डॉ. आयडांशी तिची मैत्री झाल्याला पाव शतक होऊन गेलं होतं. दोघींचे

मिळून एकत्र पत्र-व्यवहार व्हायचे तेव्हा खाली संयुक्त सही असायची Scuddod.

तिच्या वाढदिवशी तिला कोणी विचारलं, 'तुम्हाला ऐंशी वर्षं झाली तरी तुम्ही एवढ्या उत्साही आणि चपळ कशा?'

'माझाही नाइलाज आहे. ही आयडाच मला कशी ती चिरतरुण ठेवते खरी!'

□

जानेवारी १९४१ मध्ये प्राथमिक तपासणीसाठी तज्ज्ञमंडळ वेलूरला येऊन गेले. त्यांच्या अनुकूल अहवालामुळे डॉक्टरांना पदवीपूर्व दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाची सुरुवात करायला परवानगी मिळाली. तीही तात्पुरती. त्या दोन वर्षांत पुरेसा आणि लायक शिक्षकवर्ग आणि इमारती यांबाबतच्या अटी पूर्ण होऊ शकल्या तरच पुढची काही आशा! आणि एवढं होऊनही पुन्हा त्या स्कूलला कॉलेजचा दर्जा देण्याची जबाबदारी उरत होतीच. म्हणजे प्रचंड निधीची जमवाजमव करण्यासाठी महाप्रचंड उद्योग करणे!

अशा परिस्थितीत आपण इथे थांबण्यापेक्षा अमेरिकेत जाऊन काही साधतं का पाहावं म्हणून डॉ. आयडा आणि डॉड प्रयाणाला निघाल्या.

या वेळी डॉक्टर सत्तरीच्या आणि डॉड ब्याऐंशीची.

□

१९४१

युद्धाच्या बातम्यांबरोबर डॉ. आयडांच्या व्याख्यानांचे, मोहिमांचे वृत्तांत वृत्तपत्रांतून झळकू लागले. दहा लाख डॉलर्स हवे असणारी स्त्री सापडणे दुर्मिळ नव्हते; पण एक स्त्री तिसऱ्यांदा दहा लाख डॉलर्स जमवायला येते हे जरा विलक्षणच. त्यात पुन्हा ह्या स्त्रीची सत्तरी उलटलेली; पण लोकमन युद्धात गुंतलेलं. डॉक्टरांची मागणी कितीही वाजवी असली तरी तिकडे लक्ष द्यायला कोणाला फुरसत नव्हती. डॉ. आयडांना युद्धजन्य संस्थांशी तर टक्कर द्यावी लागत होतीच. शिवाय ज्यांचा सहशिक्षणाला विरोध होता त्यांनाही तोंड द्यावं लागत होतं. बरं, वेलूरमध्ये सहशिक्षण सुरू न करावं तर हेच कॉलेज मिरजेत उघडले जाण्याची शक्यता बोलली जात होती. त्यामुळे सारी जुळवाजुळव अतिवेगाने करणे भाग होते.

डॉलरदिन झाले. त्यानेही फारसं काही साधलं नाही. त्यात आणखी दोन दु:खद घटना घडल्या. डॉडचा मृत्यू. सतत वीस दिवस डॉ. आयडा आपल्या या प्रिय मैत्रिणीच्या रुग्णशय्येजवळ बसून होत्या. तिची सेवा करत होत्या. तिच्या मृत्यूने दु:खाचा तीव्र धक्का डॉ. आयडांना बसला; पण तशाही स्थितीत आपलं भळभळतं मन सावरून त्या कामाला लागल्या- तोच दुसरा धक्का बसला. सौ. ल्युसी पिबॉडी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सहशिक्षणाला विरोध म्हणून आपले राजीनामे सादर केले. डॉ. आयडांना याचे मनस्वी दु:ख झाले; पण वेलूरच्या भवितव्यासाठी हा



आघात सोसणं त्यांना भागच होतं.

डॉ. आयडांची सतत चार वर्षं धावपळ चालू होती. आपल्या आयुष्याचं ध्येय साकार करण्यासाठी ही त्यांची शेवटची आणि निकराची धडक होती.


अमेरिकेतील वीस संप्रदायांच्या स्त्री-पुरुषांनी वेलूरच्या All India Christian Medical College च्या उभारणीसाठी सक्रिय मदत दिली. ग्रेट ब्रिटन, डेन्मार्क, ऑस्ट्रेलियातूनही हातभार लागत होता. निधी उभा राहात होता.

□

मद्रास विद्यापीठाच्या तज्ज्ञ मंडळाची दुसरी भेट १९४५ च्या ऑक्टोबर महिन्यात व्हायची होती. त्या वेळी डॉ. आयडांना उपस्थित राहाणं भाग होतं. वेळ वाचवण्यासाठी डॉक्टरांनी कैरो ते मुंबई अंतर विमानाने काटलं. पहिलीच हवाई सफर त्यांची. आपल्या झपाट्याला साजेशा वेगवान वाहनातून त्यांनी प्रथमच प्रवास केला. हे वाहन त्यांना फार आवडलं.

□□

# लाख मोलाची भेट



१९४५.

पुन्हा हिंदुस्थान.

तोच तो ओळखीचा गंध. तीच ती दृश्ये. तोच आवाज. त्याच बैलगाड्या. रंगांची उधळण. नगारे, ताशे, देवळातील घंटानाद, बाजारातील मसाल्यांचा वास.

रुग्णही तेच असणार... अशक्त आणि दुबळे. त्यांना बघितल्यावर त्यांची सेवा करायला बोटं कशी फुरफुरतात!... परमेश्वरा! थोडी अधिक ताकद दे...

डॉ. आयडांना उतरवून घ्यायला डॉ. आयडा बी. मोटार घेऊन आल्या होत्या. त्यांना वेलूरला यायला रात्र झाली.

मोटार कॉलेजच्या आवारात आली. फाटकापासून प्राचार्य-निवासापर्यंत विद्यार्थिनी, अध्यापिका, कर्मचारी रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. हातात पेटत्या मशाली. मुखाने डॉ. आयडांचा जयजयकार.

डॉ. आयडांचे डोळे भरून आले.

आयडा स्वगृही परतली.

पण त्यांनी सोडलेला हिंदुस्थान हा नव्हता. त्याचा चेहरामोहरा साफ बदलला होता. कायदेभंग, सत्याग्रह, उपोषणे, असहकारितेच्या चळवळी. सारा देश आशा, भीती, राष्ट्रीय भावना, धार्मिक तणाव अशा काहीशा विचित्र मिश्रणाने खदखदत होता.

त्यात पडला दुष्काळ!

कॉलेजच्या, रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांना, खेड्यातील शिक्षकांना एकभुक्त राहावं लागत होतं.

कॉलेजची प्रगती अतिशय मंद गतीने का होईना; पण चालू होती. १९४२ च्या उन्हाळ्यात पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी पंचवीस विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला. प्रथमच पुरुष डॉक्टर्स आले- डॉ. गाल्ट, डॉ. मॅकफेरसन आणि डॉ. आशीर्वादम्. रुग्णालयात पुरुषांसाठी ओ. पी. डी. (Out Patient Dept.) आणि Inpatient dept. स्त्रीरुग्णालयात सुरू झाले तेव्हा वेलूरचे वातावरण केवढं खळबळून गेलं!

Clinical Subjects शिकवायला मद्रास विद्यापीठाने परवानगी दिली आणि आणि नंतर काही दिवसांतच विद्यापीठाने वेलूर वैद्यकीय महाविद्यालयाला काही



काळापुरती मान्यता दिली. १९४७ मध्ये एक तज्ज्ञमंडळ पाहाणी करून विद्यापीठाच्या सर्व अटींची पूर्तता झाली आहे की नाही ते पाहून मगच अंतिम निर्णय देणार होते.

त्या दृष्टीने रुग्णालयाच्या इमारतीत किती तरी फेरबदल करावे लागले. नवीन विभाग सुरू करावे लागले. दहा पुरुष विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचा म्हणजे Clinical Space वाढवायला हवी.

निरनिराळे विभाग सांभाळण्यासाठी ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इंग्लंड, आयर्लंडहून तज्ज्ञ डॉक्टर्स आले होते. हिंदी डॉक्टर्सही होतेच.

□

९ डिसेंबर १९४५.

डॉ. आयडा पंच्याहत्तर वर्षांच्या झाल्या. मिशनरीज्नी निवृत्त होण्याचं वय दहा वर्षांपूर्वीच पार पडलं होतं; पण त्यांच्या स्वत:च्याच विनंतीवरून त्यांच्या निवृत्तिवयाची अट शिथिल करण्यात आली. सन्माननीय प्राचार्या म्हणून त्या कारभार पाहात होत्या.

युद्धकालीन तणाव संपलेले असल्याने डॉक्टरांच्या कामाने वेग घेतला होता. त्यांची आणखीही एक इच्छा पूर्ण झाली. प्रथमत:च नर्सिंग स्कूलमध्ये पदवी अभ्यासक्रम (B.Sc.) सुरू झाला.

पुढच्याच वर्षी डॉ. आयडांनी निवृत्ती स्वीकारली. कॉलेजपासून दूर तरीही जवळ अशा 'हिलटॉप'वर राहायला जाण्याची तयारी सुरू झाली.

त्यांच्या गौरवार्थ मेजवान्या देण्यात आल्या. संध्याकाळी फार मोठा निरोपसमारंभ घडून आला. वेलूरगाव प्राचार्यनिवासासमोर लोटले होते.

वेलूरचा निरोप घेताना त्यांचा ऊर भरून आला. आपल्या आयुष्याची सलग पन्नास वर्षे त्यांनी वेलूर आणि परिसर यांसाठी वेचली होती. त्यांचा निरोप घेताना डॉक्टर हेलावल्या.

□

ले. क. डॉ. हिल्डा लाझारस भारतीय लष्करातील आपली कामगिरी संपवून 'वेलूर ख्रिश्चन मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल' च्या प्राचार्या आणि संचालिका म्हणून रुजू झाल्या.

डॉ. लाझारसना काही डॉ. आयडांची निवृत्ती पटली नाही. आपल्या प्राचार्य भवनातील एक दालन डॉ. आयडांसाठी सुसज्ज ठेवून त्या वरचेवर वेलुरात येतील याची व्यवस्था केली. डॉ. आयडा वरचेवर यायच्या पण वेगळ्या भूमिकेतून. नव्या डॉक्टरांची पाठ कौतुकाने थोपटण्यासाठी, रुग्णांसाठी प्रार्थना करण्यासाठी. बायबलचे वर्ग घेण्यासाठी. रुग्णांना धीर देण्यासाठी.

□

१ जानेवारी १९५०. डॉ. आयडा स्कडर M.D. होऊन हिंदुस्थानात आलेल्याला पन्नास वर्षं झाली. त्यांच्या आगमनाचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. या प्रसंगी राज्यपाल, डॉ. लाझारस, माजी विद्यार्थिनी यांची गौरवपर भाषणं झाली.

एका महिला डॉक्टरने सुरू केलेले रुग्णालय... आता कॉलेजच्या प्राध्यापकवर्गात ४३ डॉक्टर्स होते. रूग्णालयात ४४ डॉक्टर्स. 10 x12 च्या छोट्या खोलीत सुरू झालेल्या रुग्णालयाचे रुपांतर आता पाचशे खाटांच्या प्रशस्त रुग्णालयात झाले होते. या रुग्णालयात आणि फिरत्या दवाखान्यात मिळून वर्षाकाठी दोन लाख रुग्ण तपासले जात होते. औषधोपचार होत होते; पण डॉक्टरांचं प्रदीर्घ काळचं स्वप्न साकार होत नव्हतं... गेली दहा वर्षं तर त्यांनी फार जिकिरीची आणि धावपळीची काढली होती... पण अजूनही विद्यापीठाकडून कायम स्वरूपाची मान्यता मिळत नव्हती.

डॉ. हिल्डा लाझारस डॉ. आयडांना आलेले संदेश वाचून दाखवत होत्या. मद्रास विद्यापीठाच्या उपकुलगुरूंचा संदेश आला होता. डॉ. आयडांसंबंधी गौरवपर लिहून त्यांनी शेवटी त्याच संदेशात विद्यापीठाचा निर्णय कळवला होता. 'वेलूर ख्रिश्चन मेडिकल कॉलेज'ला कायम स्वरूपाची मान्यता दिली होती.

डॉ. आयडांना या समारंभात मिळालेली ही लाखमोलाची भेट. प्रदीर्घ स्वप्नांची पूर्तता.

या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने जमलेला गौरवनिधी आणि स्वत:ची मिळकत विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या उभारणीसाठी त्यांनी संस्थेस अर्पण केली.

त्याच वर्षी त्यांनी सोळा मैलांवरच्या कवनूर येथील 'ग्रामीण आरोग्य केंद्रा'चे उद्घाटन केले. रोग झाल्यावर मग त्यावर इलाज करत बसण्यापेक्षा रोगप्रतिबंधकता वाढवणे इष्ट असते. महाविद्यालयाने ग्रामीण आरोग्य आणि सार्वजनिक आरोग्य याबाबतीत लक्ष घालून प्रत्यक्ष कार्यास सुरुवात केली.

९ डिसेंबर १९५० रोजी त्यांचा ऐशीवा वाढदिवस साजरा झाला. ठिकठिकाणांहून गौरवनिधी आला. गोळाबेरीज अर्ध्या लाखावर गेली! बाईसाहेबांनी ते रुपये दगडविटांत बदलून घेतले. विद्यार्थ्यांचे वसतिगृह तयार झाले.

□

मद्रास विद्यापीठाच्या शतसांवत्सरिक महोत्सवासाठी पं. नेहरू मद्रासला आले होते. डॉ. आयडा या कार्यक्रमास निमंत्रित होत्या. पहिल्याच रांगेत बसल्या होत्या.

पं. नेहरू, उपकुलगुरू आणि मान्यवर मंडळी सभागृहात प्रविष्ट होत होती. डॉ. आयडांना पाहून उपकुलगुरूंनी सारा औपचारिकपणा बाजूला ठेवला पंतप्रधानांना घेऊन ते डॉ. आयडांच्या खुर्चीपाशी गेले. परिचय करून दिला. पंतप्रधान म्हणाले-

'I am honoured, Doctor!'

□



एखादा वटवृक्ष विस्तारला जात असताना त्याला फुटलेल्या पारंब्या जमिनीत घुसून पुन्हा नव्या वटवृक्षाला जन्म देतात. वटवृक्षांना मूलाधार देतात, तसंच या वेलूर ख्रिश्चन मेडिकल कॉलेजचं चाललं होतं. ग्रामीण आरोग्यसंवर्धनाबरोबरच आता Community Development चा कार्यक्रम हाती घेतला होता.

वैद्यकीय शिक्षण आणि ग्रामीण-आरोग्यसमस्या यात मेळ घातला. ग्रामीण भागात सहजासहजी उपलब्ध होतील अशीच साधनसामग्री वापरून आरोग्यकेंद्रे सुसज्ज केली. ग्रामीण आरोग्यसंवर्धनाचा एक नवा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला. प्रत्यक्ष अनुभवावर भर दिला. या उपक्रमामुळे डॉ. आयडांना फार समाधान वाटले.

आपल्याच हयातीत आपले स्वप्न साकार होताना पाहून कोणाला धन्य वाटणार नाही?

□

खेडोपाडी वैद्यकीय सेवा देण्यासाठी परिचारिका आणि L. M. P. तयार झाल्या होत्याच; पण वेलूर ख्रिश्चन मेडिकल कॉलेजच्या स्थापनेमुळे निरनिराळ्या मिशन रुग्णालयांतून काम करण्यासाठी तरुण पुरुष आणि महिला डॉक्टर्स तयार होत होत्या. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांतून बहुसंख्य हिंदू आणि मुसलमान यांच्या बरोबरीने अल्पसंख्य ख्रिश्चनांना प्रवेश मिळत नसे. त्यांची सोय इथे झाली.

पण केवळ ख्रिश्चन विद्यार्थ्यांनाच इथे प्रवेश असे, असे मात्र नाही. १९४७ साली देशाची फाळणी झाली. त्या वेळी पाकिस्तानातून आलेल्या वैद्यकीय शास्त्राच्या २४ हिंदू आणि शीख निर्वासित विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाने सरकारच्या विनंतीवरून, आपल्या प्रवेशाबाबतीतील सर्व काटेकोर अटी शिथिल करून प्रवेश दिला.

□

कोणत्याही दु:खाचा परिहार करायचा किंवा त्याची तीव्रता कमी करायचे मार्ग तीन. एक, तिकडे संपूर्ण दुर्लक्ष करायचे. दुसरा, देवाची इच्छाच ती असे मानून मुकाट्याने सहन करायचे आणि तिसरा मार्ग- त्या दु:खावर इलाज शोधून त्याची तीव्रता कमी करायची. डॉ. आयडांच्या मते हा तिसरा मार्ग ख्रिस्ताचा. तोच त्यांनी स्वीकारला. यशस्वीपणे चोखाळला. 'Cure it, God gives the means.' जीवनमृत्यूचा खेळ, रोगराईचं आक्रमण दुरून बघत न बसता डॉ. आयडा स्वत: त्यात उतरल्या. एखाद्या योद्ध्याप्रमाणे झगडल्या. कोणाही रुग्णाचा मृत्यू त्यांना वैयक्तिक हानीप्रमाणे वाटे. आपल्या प्रयत्नांमागे भावना एकच, 'We clean the wounds and God heals them.'

□

डॉ. आयडांनी साठ वर्षांपूर्वी ज्या कार्नेल कॉलेजमधून M.D. घेतली त्या कॉलेजने त्यांचा गौरव करण्याचे ठरवले. परंतु डॉक्टरांचं आता अठ्ठ्याऐशीवं वय चालू होतं. त्यांना वेलूर सोडणे शक्य नव्हते. म्हणून मग कार्नेल कॉलेजने डॉ. आयडांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम वेलूर मेडिकल कॉलेजात घडवून आणला. त्याचे चित्रीकरण करून मग ते न्यूयॉर्कमध्ये दाखवले.

□

खरं तर शरीराची चीरफाड वगैरे डॉ. आयडांच्या स्वभावात नव्हतं. काही काही वेळा तर त्या भित्र्या वाटाव्यात इतक्या हळव्या होत. सहकाऱ्यांच्या हातावरचं साधं गळू कापतानाही त्या कमालीच्या व्यथित होत. म्हणत- 'तुला जखम करून दुखवायची हिंमत होत नाही माझी.'

डॉ. लाझारस प्राचार्या म्हणून वेलूरला येण्यापूर्वी एकदा एक शस्त्रक्रिया स्वत:वर करवून घेण्यासाठी आल्या होत्या. शस्त्रक्रियेच्या दिवशी पहाटे त्या सहज रुग्णालयाच्या व्हरांड्यात फेरी मारायला म्हणून आल्या. पायऱ्यांवर कोणीतरी येऊन बसलेलं होतं. कोण एवढ्या पहाटे आलंय म्हणून पाहातात तो स्वत: डॉ. आयडा अश्रू ढाळत बसलेल्या.

'काय झालं, डॉ. आयडा? काही वाईट बातमी?'

'कसं सांगू?' ओशाळून डॉ. आयडा उत्तरल्या-

'तुम्हाला शस्त्र लावायचं या कल्पनेनेच मला दु:ख होतंय.'

'तुमच्या अश्रूंनीच माझ्या सर्व दु:खाचा परिहार केलाय डॉक्टर!' डॉ. लाझारस गहिवरून म्हणाल्या.

डॉ. आयडांनी डॉक्टरी एक व्रत म्हणून स्वीकारली होती. त्या मार्गाने पैसा ओढणं हे तर त्यांचं ध्येय कधी नव्हतंच. पहिल्या महायुद्धाच्या वेळी रॉकफेलरने युरोपात सैनिकांसाठी रुग्णालय उभारायचं ठरवलं, तेव्हा ह्या कामाची सूत्रे डॉ. आयडांनी हाती घ्यावीत अशी त्यांना विनंती करण्यात आली; पण डॉ. आयडांची आपल्या कार्यावर निष्ठा एवढी की त्या वेलूर सोडून गेल्याच नाहीत. त्या वेळचं वेलूर म्हणजे Fort without garrison, river without water, hills without trees and temple without God (टिपू सुलतानच्या आक्रमक सैनिकांनी किल्ल्यातील देवळात गाय कापली म्हणून हिंदूंनी आपले देव तिथून हलवले होते.) या वेलूरला उभं जग ओळखू लागलं ते डॉ. आयडांमुळे.

डॉ. आयडांनी त्यांच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत किती रुग्ण तपासले, कितींवर इलाज केले, कितींवर शस्त्रक्रिया केल्या आणि किती जीव वाचवले याची पद्धतशीर नोंद ठेवण्याइतकी उसंत त्यांना मिळाली नाही. त्या पुढे पुढे जातच राहिल्या, झपाटल्यासारख्या. कोणाच्या धन्यवादासाठी खोळंबल्या नाहीत की उपेक्षेने अडखळल्या नाहीत. स्वत:ला विसरून निरलस सेवेत मग्न राहिल्या. दक्षिण हिंदुस्थानात मोपल्यांचं



बंड झालं. वेलूरमध्येही संचारबंदी लागू झाली होती. त्या परिस्थितीतही साठी उलटलेल्या डॉ. आयडा बुरखा पांघरून मस्लिम वस्तीत जाऊन रुग्णांवर इलाज करून आल्या. प्रत्येक दुखणाइतात ख्रिस्त पाहून त्यांनी त्यांची सेवा केली.

स्वत:च्या अंतर्मनाची दाद मात्र त्यांनी कोणाला केव्हाही येऊ दिली नाही. आपलं उभं आयुष्य अविवाहित राहून का काढलं हेही कधी मोकळेपणी कोणाला सांगितलं नाही. नाही म्हणायला बर्चफील्ड मिलिकेनची पत्रं मात्र त्यांनी अखेरपर्यंत जपून ठेवली होती.

आपल्या या जीवनाकडे त्यांनी कायमची पाठ फिरवली होती. प्रणय, विवाह यांविषयी विचार करण्याइतका अवसर पुढे त्यांना कधी मिळालाच नाही. त्यांचा आवडता छंद म्हणजे बागकाम. तोही त्या दिवसभराची सारी कामे संपल्यावर रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पुरवून घेत. दिव्याच्या, कंदिलाच्या उजेडात खणाखणी करून बागेची मशागत करत. कोणी सहकाऱ्याने धाडस करून त्यांना त्यांच्या एकाकी आयुष्याविषयी टोकलं तेव्हा त्या हसून एवढंच म्हणाल्या,

'मला माझा संसार असता तर ह्या रुग्णालयाचं आणि मेडिकल स्कूलचं एवढं सारं काम मला पार पडताच आलं नसतं.'

डॉ. आयडा स्वत: वेलूरमध्ये कार्यरत राहिल्या. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून अर्काट मिशनमध्ये नंतर किती तरी डॉक्टर्स आल्या. विवाहित आणि अविवाहित सेवाव्रती बनून कित्येक वर्षे वेलूरमध्ये कार्य करीत राहिल्या आणि हेच विशेष.

□

९ डिसेंबर १९५९ रोजी त्यांनी नव्वदाव्या वर्षात पदार्पण केले. अवघ्या वेलूरकरांनी पारंपरिक पद्धतीने त्यांचा हा जन्मदिन साजरा केला. नव्वदीत प्रवेश करणाऱ्या महनीय व्यक्तीस देण्यात येणारी सुवर्णकशिद्याची शाल त्यांना सन्मानपूर्वक अर्पण करण्यात आली. हा त्यांचा शेवटचाच वाढदिवस!

□

कोणा ओळखीच्या रुग्णाला भेटायला म्हणून डॉ. आयडा रुग्णालयात आल्या आणि तिथेच पाय घसरून पडल्या. कमरेचे हाड मोडले.

डॉक्टर प्रथमच 'पेशंट' बनल्या.

पूर्वी त्या नेहमी आपल्या विद्यार्थ्यांना गंमतीने म्हणत- 'डॉक्टर आणि परिचारिका यांनी मधून मधून आजारी पडलेलं बरं. म्हणजे मग रुग्णाशी कसं वागावं ते आपोआप समजतं.' अर्थात डॉक्टरांना काही अशा अनुभवाची गरज नव्हती.

त्यांना वाईट वाटत होते ते एकाच गोष्टीचे. त्या आता कायमच्या पंगू झाल्या होत्या. दृष्टीही मंदावली होती. त्यांच्या हालचालींवर मर्यादा पडल्या होत्या. सदैव

दुसऱ्याचे ओझे आपल्या खांद्यावर वागवणाऱ्या डॉक्टरांना स्वत:च ओझे बनल्याची जाणीव त्रस्त करी. 'परमेश्वरा! आता मला ने!'

अशा अपंग अवस्थेतही त्या चाकाच्या खुर्चीवरून रुग्णालयात येत. रुग्णांना भेटत. त्यांना धीर देत. त्यांच्यासाठी प्रार्थना करत.

□

उन्हाळा सुरू झाला. उन्हाळी सुट्टीत त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना हिलटॉपवर नेलं. तिथेच त्यांनी २४ मे १९६० रोजी सकाळी सव्वासात वाजता वेलूरचा आणि या जगाचा निरोप घेतला!

□

पूर्णपणे विकसित झालेल्या फुलातील परागकण वाऱ्याच्या झुळकेने इतस्तत: विखुरलेत... आता त्यातून बीजधारणा होईल... नवीन वृक्ष जन्म घेतील... बहरतील...

□□



# संदर्भ


1. Dorothy Clarke Wilson :
   Dr. Ida
   The Story of Dr. Ida Scudder of Vellore.
   (1959 edn)

2. M. Pauline Jeffery :
   Ida S. Scudder and her gleam.
   (1950 Golden Jubily Edn.)

3. Sheila Smith :
   Doctor Ida
   (C. M. C. Vellore)

4. The Illudtratedd Weekly of India-
   Vol. CIII 2 Jan. 24-30, 1982.

# अभिप्राय

*"चरित्र लेखनाचे निकष, त्याची व्याप्ती-मर्यादा याचे माप या चरित्राला लावता येणार नाही, एवढे डॉ. आयडा स्कडर यांचे जीवन देदीप्यमान आहे. त्याचे झळाळणारे सुवर्णतेज वीणा गवाणकरांनी एकशेवीस पानात तेवढ्याच समर्थपणे मांडलं आहे...*

*...आपण दुसऱ्यासाठी काय करतो ...आणि ते किती आत्मीयतेने करतो? हे तपासण्यासाठी हे पुस्तक प्रत्येकाने वाचावे असे आहे."*

१४.४.८५ **लोकसत्ता** (रविवार)

*"...आपले लक्ष्य आहे ५०० लोकांस एक डॉक्टर! आपली घोषणा आहे २००० साली सर्वांना आरोग्य. या सर्व मोहमयी आकड्यांच्या जाळ्यातून जरा मागे बघायला हवं.... किती डॉक्टरांना आयडाचं नाव व वेलूरच्या कॉलेजचा इतिहास माहीत असेल. निदान प्रत्येक डॉक्टराने आरोग्याच्या या कार्यात सामाजिक चळवळीशी संबंध असणाऱ्यांनी तरी हे पुस्तक वाचावयास हवे."*

२४.६.१९८४ **मराठवाडा** (रविवार)

*"हे पुस्तक वाचलं आणि शंभर वर्षांपूर्वीच्या हिंदुस्थानातील समाजजीवनाचा-रूढी - परंपरांचा व अंधश्रद्धांचा कठोर परिचय झाला... अशिक्षित स्त्रीसमाजासाठी आयुष्यभर झटणाऱ्या डॉ. आयडांचा परिचय करून घेताना वाटलं की अजूनही अशा काही आयडा भारतातून व्हायला हव्यात. त्यांची आज समाजाला गरज आहे."*

२५.३.१९८४ **विवेक साप्ताहिक**

*"डॉ. आयडांनी ध्येयनिष्ठा आणि चिकाटी यांचा आदर्श घालून दिला आहे... हे चरित्र वाचनीय झाले आहे."*

१२.८.१९८४ **रविवार सकाळ**



*"प्रत्येकाने वाचलेच पाहिजे असे हे पुस्तक... लोकसेवा, जनसेवा 'म्हणजे काय', हे जाणून घेण्यासाठी तरी हे पुस्तक प्रत्येकाने वाचावे...*

*सौ. वीणा गवाणकर यांची शैली वेधक आहे. डॉ. आयडांची प्रचंड सेवागाथा कोठल्याही तऱ्हेची गुंतागुंत न करता त्यांनी सरळपणे हळुवारपणे सांगितली आहे... चरित्र जास्तीत जास्त वास्तव आणि स्वाभाविक करण्याचा प्रयत्न केला आहे... चरित्रलेखन कंटाळवाणे होत नाही... एका ज्वलंत लोकसेवेचे दर्शन वाचकांना लेखिकेने घडवले..."*

अंक २२ वा : ऑगस्ट १९८४ **विद्याविकास**

(शिक्षकांसाठी शैक्षणिक मासिक पत्रिका)

*"पुस्तकाची मांडणी व लिखाण चांगले परिणामकारक झाले आहे... सर्वच वैद्यकीय व्यावसायिकांनी अवश्य वाचून त्यावर चिंतन करावे असे आहे... डॉ. आयडा स्कडर यांच्या जीवनातून व पुण्यातील ज्ञानप्रबोधिनीचे संस्थापक कै. अप्पासाहेब पेंडसे यांच्या मार्गदर्शनातून काही डॉक्टर्स संघ-स्वयंसेवक एकत्र येऊन लातूर येथे एक भव्य हॉस्पिटल सुरू केले आहे..."*

**डॉ. एस. बी. कुलकर्णी,** सांगली

*"पुस्तक छान झालंय... पुस्तक वाचताना डॉ. अशोक दयालचंद यांच्या कामाची आठवण येते... (यांचं) शिक्षण वेलूर मेडिकल कॉलेजलाच झालंय. औरंगाबादजवळ पाचोड गावी त्यांनी आयडा स्कडरसारखं काम उभं केलंय..."*

**शोभा भागवत,** पुणे

*"... एका झपाट्यात वाचून काढलं. मुखपृष्ठापासूनच पुस्तक अगदी देखणं आहे... या जीवनचरित्रानं जितकी स्फूर्ती दिलीय तेवढीच त्या काळच्या आपल्या देशाच्या परिस्थितीची खंत निर्माण केली... या पुस्तकानं ध्येयवादाला खतपाणी घातलं..."*

**आनंद फाटक**, विद्यार्थी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद

*"आपल्याला ही आभाळाएवढी मोठी माणसं कशी मिळतात याचे आश्चर्य वाटले... कधीही न पाहिलेल्या, न ऐकलेल्या माणसांबद्दल वाचले म्हणजे आमचे आयुष्य आम्ही किती निरर्थक जगतो आहोत ते जाणवते..."*

**प्रशांत कांडरकर**
गोरेगाव, मुंबई.

# शब्दांच्या पलीकडे

डॉ. आयडांवरची इंग्रजी पुस्तकं वाचल्यानंतर मी काही टिपणं काढली, नोंदी केल्या. त्या वह्या सहज म्हणून श्री. ग. माजगावकरांना दाखवल्या. त्यांच्याशी झालेल्या चर्चेचं फलित म्हणजे मी वेलूरला जाऊन आले. हे चरित्र लिहायला उत्साह लाभला तो त्यांच्याच प्रेरणेतून. ज्या इंग्रजी पुस्तकांचा वापर मला या चरित्रासाठी करायचा होता त्याची परवानगी मिळवून देण्याचा खटाटोप वेलूरच्या ख्रिश्चन मेडिकल कॉलेजने केला, शिवाय डॉ. आयडांवरील पुस्तिका व फोटोही दिले. माझ्या या पुस्तकाचे लिखाण सुरू करण्यापूर्वी प्रत्यक्ष वेलूरला भेट देणं नितांत आवश्यक होतं. ही माझी भेट सुखद आणि सुरळीतपणे झाली ती डॉ. श्री. व सौ. आपटे यांच्या योजकतेमुळेच. C. M. C. चे डॉ. कारमन, डॉ. झकारिया, जे. व्हिक्टर कोईलपिलाई आणि विशेषत: मेरी टॅबर (सॅबॅस्टिअन) यांनी दिलेली माहिती आणि सहकार्य यांखेरीज हे पुस्तक पुरं होऊच शकलं नसतं.

या पुस्तकाचे हस्तलिखित तयार होत असताना मजकुरात आणि लिखाणात शुद्धता आणि सुसूत्रता राखण्याच्या कामी चारु देशपांडे, जया वेलणकर, माधुरी गोखले आणि विनायक वालावलकर यांनी फार सोशिकतेने मदत केली. त्यांच्याशी वेळोवेळी केलेल्या चर्चेतून माझा उत्साह आकार घेत गेला. मी 'अपत्य-प्रेमा' त गुरफटणार नाही याची त्यांनी खबरदारी घेतली. एका फटक्यात पुस्तक लिहून हातावेगळं करण्याइतकी मी प्रतिभासंपन्न नाही. त्यामुळे एकूण तीन वेळा संपूर्ण लिखाण लिहिले आणि प्रत्येक वेळी ते या चौघांपैकी कोणी ना कोणी वाचून काढले, ते जास्तीत जास्त निर्दोष राहील याची दक्षता घेतली. या माझ्या स्नेह्यांनी ज्या आपुलकीने सहयोग दिला तो सारा अनुभव हृद्यच.

मुद्रिते तपासण्याच्या किचकट कामापासून ते अल्पावधीत पुस्तक प्रकाशित करण्यापर्यंतची सारी किमया दिलीप माजगावकरांची!

व्यक्त शब्दांपलीकडची माझी कृतज्ञतेची भावना ही सर्व मंडळी जाणून घेतील अशी मनोमन खात्री आहे.

धन्यवाद!

**वीणा गवाणकर**